रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८७ । अंक ३११ । पृष्ठे ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)

www.krushival.in

# कृषीवल

रायगड, बुधवार, दि. १७ एप्रिल २०२४

किंमत ४ ₹

## लग्नाचे आमिष दाखवून अतिप्रसंग

**महाड :** अल्पवयीन मुलीला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर वारंवार अतिप्रसंग करण्याऱ्या तरुणाला महाड शहर पोलिसांनी गजाआड केले. आरोपी वैभव पवार याला अटक करुन त्याला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने १९ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणी अधिक तपास सहाय्यक पोलीस निरिक्षक खाडे करीत आहेत. पिडीता आणि आरोपी तरुण दोघेही महाड शहरातील आहेत. वैभव भूपेंद्र पवार (रा. काकरतळे, महाड) याने पिडीत अल्पवयीन मुलीला लग्नाचे आमिष दाखवून त्याने सप्टेंबर २३ ते एप्रिल २४ या कालावधीत तिला पान ५ वर

## पिस्तुल, पाच काडतुसांसह एक अटक

**पनवेल:** पनवेल एसटी डेपो परिसरातून पोलिसांनी एकाला अटक करून त्याच्याकडील पिस्तुल व पाच काडतुसे जप्त केली आहेत. हा तरुण गाझियाबादचा असून त्याठिकाणी तो पिस्तूल विक्रीसाठी आला होता. त्याच्यावर पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. पनवेल बस डेपो परिसरात एकजण अग्निशस्त्रासह येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्याद्वारे परिसरात गस्तीवर असलेले उपनिरीक्षक विनोद लभडे, हवालदार नितीन वाघमारे, परेश म्हात्रे, प्रसाद घरत यांनी रविवारी रात्री सापळा रचला होता. त्यामध्ये एक पान ५ वर




आजचा अग्रलेख

**फसवणूकनामा**

## वेधक

### यूपीएससीचा निकाल जाहीर

**नवी दिल्ली :** केंद्रीय लोकसेवा आयोगाचे निकाल जाहीर झाले असून आदित्य श्रीवास्तव देशात पहिला तर अनिमेश प्रधान देशात दुसरा आला आहे. गेल्या दोन परीक्षांमध्ये यूपीएससीचे पहिले तीन क्रमांक मुलींनीच पटकावल्याचे दिसून आले होते. यंदा मात्र मुलांनी बाजी मारली आहे. देशात तिसऱ्या क्रमांकावर डोनुरू अनन्या रेड्डी आहे. यंदा यूपीएससीच्या परीक्षांमध्ये १०१६ उमेदवार उत्तीर्ण झाले आहेत. यामध्ये ३४७ उमेदवार खुल्या प्रवर्गाचे, ११६ उमेदवार आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गाचे, ३०३ उमेदवार ओबीसी प्रवर्गाचे, १६५ उमेदवार अनुसूचित जाती प्रवर्गाचे तर ८६ उमेदवार अनुसूचित जमाती प्रवर्गाचे आहेत.

### तिसऱ्या दिवशी एक उमेदवारी अर्ज

**रायगड :** लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मध्ये ३२ रायगड लोकसभा मतदारसंघांसाठी नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या तिसऱ्या दिवशी (दि.१६) एका अपक्ष उमेदवाराने आपला उमेदवारी अर्ज दाखल केला, असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी किशन जावळे यांनी दिली. मतदानाच्या तिसऱ्या टप्प्यात ३२ रायगड लोकसभा मतदारसंघात ७ मे रोजी मतदान होणार आहे. मंगेश पद्माकर कोळी (अपक्ष) असे उमेदवारी अर्ज दाखल केलेल्या उमेदवाराचे नाव आहे.

### तीन अपघातात एकाचा मृत्यू

**सुधागड-पाली :** पाली-खोपोली राज्य महामार्ग मृत्यूचा सापळा बनत आहे. सोमवारी (दि.१५) एकाच दिवसात या मार्गावर भालगुल, वऱ्हाड व नानोसे या ठिकाणी तीन अपघात झाले आहेत. या अपघातात एकाचा मृत्यू झाला आहे, तर इतर जण गंभीर जखमी आहेत. वाकण-पाली-खोपोली राज्य महामार्गाचे नुकतेच रुंदीकरण पूर्ण झालेले आहे. त्यामुळे भरधाव वेगाने वाहने जात असतात. या मार्गावर वऱ्हाड गावच्या हद्दीत सायंकाळच्या सुमारास पालीकडून परळीकडे जाणाऱ्या एका मोटरसायकलस्वाराने खोपोली बाजुकडून पान ५ वर

# नेत्यांचे खुर्चीमिलन

# प्रचार केंद्राचे स्थलांतरण

**आविष्कार देसाई**

**। रायगड ।**

राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार) जिल्हा कार्यालय अलिबाग शहरातील ब्राम्हण आळीमध्ये आहे. लोकसभा निवडणुकीत या कार्यालयाची पायरी चढताना भाजपा आणि शिंदे गटाच्या कार्यकत्यांचे पाय जड होत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे एकमेकांची तोंड न बघणाऱ्या महायुतीमधील कार्यकर्त्यांच्या सोयीसाठी अलिबाग बायपासमार्गावरील चर्चसमोर संपर्क कार्यालय सुरु करावे लागले आहे. नेत्यांचे मनोनिलन झाले असले, तरी कार्यकर्त्यांचे






झालेले नाही याची प्रचिती या कृतीतून दिसून येते.

रायगड लोकसभा निवडणुकीत इंडिया आघाडीचे शिवसेना (ठाकरे गट) उमेदवार म्हणून अनंत गीते यांनी आपला उमेदवारी अर्ज १५ एप्रिल रोजी भरला आहे. त्यांच्या विरोधात महायुतीचे राष्ट्रवादी काँग्रेस पान ५ वर

## उरणकरांसाठी खासदार बारणे ठरले निष्क्रिय

**। उरण । वार्ताहर ।**

जेएनपीटी येथे महायुतीचे शिवसेनेचे उमेदवार श्रीरंग बारणे यांची प्रचार सभा संपन्न झाली. त्या सभेत त्यांनी सर्वाधिक विकासकामे ही आपण उरण मतदारसंघात केली असल्याचा दावा केला होता. त्यांनी सर्वाधिक विकास केला असता तर आजच्या घडीला सर्वसामान्य जनतेला भेडसावणाऱ्या समस्या कमी होण्याऐवजी त्यात दिवसेंदिवस वाढ होत आहे. अशी चर्चा मतदारांमध्ये आहे. यावरून उरणकरांसाठी गेली १० वर्षे खासदार म्हणून श्रीरंग बारणे हे निष्क्रिय ठरले असल्याची चर्चा उरण मतदारसंघात सुरू आहे.

खासदार श्रीरंग बारणे हे गेली १० वर्षे मावळ या लोकसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करीत आहेत. मावळ मतदारसंघात उरण विधानसभा मतदार संघ येत आहे. परंतु या उरण मतदार संघाकडे त्यांनी स्वतःच्या माध्यमातून कोणता विकास केला हे दाखवावे असे उरणचे मतदार सांगतात. जी काही शासकीय पातळीवर विकासकामे झाली आहेत, ती आधीच मंजूर झाली होती. ती फक्त त्यांच्या कारकिर्दीत पूर्णत्वास गेली आहे. जेएनपीए बंदरानजीक सर्वात मोठ्या पार्किंगचा ठेका स्वतः घेऊन तो त्यांचा माऊली व येथील शिवसेनेचा (उबाठा) गटाचा पदाधिकारी सांभाळण्याचा काम इमानदारीने करीत असल्याचा आरोप मतदार करीत आहेत. त्यांच्या प्रयत्नामुळेच बारणे यांना प्रचारासाठी जेएनपीएचा हॉल मिळाला असल्याची चर्चा सुरू आहे.

बारणे यांनी विकासकामे केलीत मग अपघात होऊन अनेकजण जखमी झाले. वेळीच उपचार न मिळाल्याने मृत्यू होण्याच्या घटना वारंवार घडत आहेत. सर्वाधिक कंपन्या असतानाही याठिकाणी एक सुसज्ज हॉस्पिटल खासदार बारणे यांना का उभारता आले नाही. त्याचबरोबर येथील सर्वाधिक जमीन सिडकोने संपादित करूनही उरणकरांसाठी पान ५ वर

## रायगड तापला



**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

ऐन लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराने रायगड जिल्ह्याचा पारा चढला असतानाच आता आकाशातूनही सूर्याने आग ओकण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे उन्हाच्या झळांनी जिल्हा चांगलाच तापला आहे. मंगळवारी आणि बुधवारी मुंबईसह रायगड जिल्ह्यात उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. उष्माघातासारख्या समस्या निर्माण होऊ शकतात, हे लक्षात घेऊन नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले आहे. रायगड जिल्ह्यात अलिबाग शहरामध्ये तब्बल ४२.४ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद करण्यात आली.

पेणमध्ये ४२ अंश सेल्सिअस, सुधागड ४१ अंश सेल्सिअस, कर्जत ४० अंश सेल्सिअस एवढ्या तापमानाची नोंद करण्यात आली आहे. पान ५ वर



### लक्षणे आढळल्यास काय कराल

**डोकेदुखी, ताप, उलट्या, जास्त घाम येणे आणि बेशुध्द पडणे, अशक्तपणा जाणवणे, शरीरात पेटके येणे, नाडी असामान्य होणे ही उष्माघाताची लक्षणे आहेत. उष्माघाताची लक्षणे आढळल्यास अशा व्यक्तीला सावलीच्या ठिकाणी झोपवा, व्यक्तीचे कपडे सैल करा, त्याला द्रव पदार्थ, कैरीचे पन्हे पाजा, तापमान कमी करण्यासाठी थंड पाण्याच्या पट्ट्या ठेवा. बाधिताला तात्काळ जवळच्या आरोग्य केंद्रात घेऊन जा आणि वैद्यकीय सल्ला घ्या. अतिकष्टाची कामे सकाळी किंवा संध्याकाळी करावीत, जेव्हा सूर्यप्रकाश प्रखर नसेल तेव्हाच अशी कामे करावीत.**

## कर्मचाऱ्यांचे ९४ अर्ज अमान्य



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

रायगड लोकसभा मतदार संघातील मतदान येत्या ७ मे रोजी होणार आहे. त्या निमित्त कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मात्र यातून सुटका करण्यासाठी कर्मचाऱ्यांनी तीनशेहून अधिक अर्ज दाखल केले आहेत. मात्र यातील ९४ अर्ज अमान्य ठरविण्यात आले आहे.

रायगड लोकसभा निवडणुकीचे मतदान प्रक्रिया सुरळीत व शांततेत पार पाडण्यासाठी जिल्ह्यातील वेगवेगळ्या विभागातील अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याचे काम सुरु करण्यात आले आहे. वेगवेगळ्या ठिकाणी कार्यशाळा घेतल्या जात आहेत. एप्रिल व मे महिना हा सुट्टीचा दिवस आहे. या कालावधीत काम करावे लागणार आहे. त्यामुळे या निवडणूक, मतदान प्रक्रियेच्या कामातून सुटका करण्यासाठी कर्मचाऱ्यांकडून जिल्हा प्रशासनाकडे वेगवेगळी कारणे पुढे केली जात आहेत. नियुक्ती रद्द करण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी आदींकडे अर्जांचा पाऊस पडत आहे. गेल्या ४ एप्रिलपासून हे अर्ज येण्यास सुरुवात झाली आहे. आतापर्यंत ३२३ अर्ज जिल्हा प्रशासनाकडे दाखल झाले आहेत. त्यामध्ये नातेवाईकांसह घरामध्ये लग्न असल्याचे कारण दाखवित आहेत. त्यासाठी पुरावा म्हणून खोट्या लग्न पत्रिका अर्जासोबत जोडल्या जात आहेत. वेगवेगळ्या फंडा उपयोगात आणून नियुक्तीतून सुटका करण्याचा प्रयत्न काही कर्मचारी करीत आहे.

मात्र याबाबत जिल्हा प्रशासनाने कठोर भूमिका घेतली आहे. येणाऱ्या प्रत्येक अर्जाची छाननी करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभी केली आहे.

### निवडणूक ड्यूटी रद्द करण्यासाठी खोटी लग्न पत्रिका

**लोकसभा निवडणुकीत नियुक्ती करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांपैकी काही कर्मचाऱ्यांनी ड्युटी रद्द करण्यासाठी वेगवेगळी कारणे दाखविली आहेत. त्यामध्ये काही कर्मचाऱ्यांनी लग्नाची खोटी पत्रिका बनवून आपल्या अर्जासोबत नोडल अधिकाऱ्यांकडे सादर केली आहे. त्याचे प्रमाण दहा टक्के असल्याचे जिल्हा प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. या कर्मचाऱ्यांवर कारवाई होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.**

> **निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याचे काम सुरु आहे. मात्र काही कर्मचाऱ्यांनी वेगवेगळी कारणे सांगून निवडणूक ड्युटीपासून दूर राहण्याचा प्रयत्न केला आहे. आलेल्या अर्जाची रितसर छाननी केली जाते. ते कारण योग्य आहे. ते मान्य केले आहे. जे योग्य नाही, ते अर्ज अमान्य केले आहे. खोटी कारणे दाखविणाऱ्यांवर कारवाई केली जाईल.**
>
> **– संदेश शिर्के, निवासी उपजिल्हाधिकारी, रायगड**

नेरळ हुतात्मा चौकातील घटना

## विजेच्या धक्क्याने मोराचा मृत्यू

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नेरळ येथील हुतात्मा चौक परिसरातून टाटा कंपनीची वीज वाहिनी जाते. त्या भागातील फॉरेस्ट टेकडी आणि मोरोशी भागात मोठ्या प्रमाणात मोरांचा संचार असतो. त्यातील एका मोराची वीज वाहिनीला धडक लागल्याने त्याचा मृत्यू झाला.



मृत झालेला पक्षी हा राष्ट्रीय पक्षी असल्याने त्या पक्षावर शासकीय नियमानुसार अंतिम विधी करण्यात आले. फॉरेस्ट टेकडी येथून हा मोर मोरोशी भागाकडे जात असताना तेथून वाहणाऱ्या टाटा कंपनीच्या वीज वाहक तारांना धडकला. त्या धडकेत मोर जमिनीवर कोसळला. त्यावेळी हुतात्मा चौकात असलेले नेरळ ग्रामपंचायतीचे कर्मचारी बाळू लिये आणि नेरळ माथेरान टॅक्सी संघटनेचे किशोर भोईर यांनी त्याची माहिती वन विभागाला दिली. त्यानंतर तात्काळ वन कर्मचारी हे घटनास्थळी पोहचले. त्यानंतर त्यांनी मोराला उचलून टॅक्सी स्टँड कार्यालयात आणले.

## ‘जय’साठी राजकीय दबाव

**। उरण । वार्ताहर ।**

उरण रेल्वे स्थानकाजवळ झालेल्या भीषण अपघातातील आरोपी जय चंद्रहास घरत रेगणार हॉस्पिटल सेक्टर २३, उलवे येथील हॉस्पिटलमध्ये अतिदक्षता विभागात उपचार घेत असून त्याला अद्याप अटक करण्यात आली नसल्याची माहिती उरणचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतीश निकम यांनी दिली. यावरून आरोपी जय घरत यास वाचविण्यासाठी राजकीय यंत्रणेचा दबाव सुरू असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

उरण शहरातील रेल्वे स्थानकात समोर शनिवारी (दि.६) रात्री ११ वाजता क्रेटा चारचाकी चालकाने भरधाव वेगात स्कुटरला धडक दिल्याने पती, पत्नीचा मृत्यू तर तीन वर्षांची चिमुरडी जबर जखमी होण्याची दुर्दैवी घटना घडली. चारचाकी गाडीचा चालक चरस, गांजा सारख्या पदार्थांचे सेवन करून नशेत असल्याचे प्रत्यक्षदर्शनी सांगतात. या घटनेनंतर चालकांनी रेल्वे पोलिसांशी अरेरावीकरून शिवीगाळ व मारहाण केल्याची घटना घडली. काही व्हिडीओ व्हायरल झाले. त्यामध्ये घटनास्थळी पोलीस व वाहतूक पोलीस दाखल असतानाही आरोपी चालक जय चंद्रहास घरत हा पळून जाण्यात कसा यशस्वी झाला अशी चर्चा सुरू आहे. याचा गाजावाजा होऊनही आजतागायत पोलीस आरोपी जय घरत यास अटक करू शकली नाही.

अपघातानंतर दोन दिवसांनी झालेल्या दुर्दैवी घटनेचा व्हिडीओ व्हायरल झाले आहेत. त्यामध्ये वाहतूक पोलीस व पान ५ वर

**एवढी मोठी दुर्घटना होऊनही कोणा राजकीय पक्षांनी अथवा नेतेमडळींनी याबाबत दुःख व्यक्त केले नाही. ही घटना घडल्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी लोकसभा उमेदवार श्रीरंग बारणे यांची प्रचार सभा जेएनपीए येथे संपन्न झाली. त्याठिकाणी कोणताही शोक व्यक्त करण्यात आला नाही. आज आठ दिवस उलटून ही कोणताही राजकीय नेता अथवा लोकसभा उमेदवार यांनी मृतांच्या कुटुंबियांची भेट अथवा साधी विचारपूस ही केलेली नसल्याने उरणच्या जनतेत संतापाची लाट पसरली आहे.**

## रसायनीत अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**। रसायनी । वार्ताहर ।**

पोटच्या मुलीचे आरोपींकडून लैंगिक शोषण होत असतानादेखील पालकांची मूकसंमती असल्याचा प्रकार रसायनीत उघड झाला आहे. पीडित मुलीने धैर्य दाखवून तक्रार दाखल केल्याने आरोपी निर्मल चौधरी (रा.त्रिपुरा) याच्यासह पीडित मुलीच्या आई-वडिलांना पोलिसांनी अटक केली.

पीडितेचे कुटुंब कराडे खुर्द गावचे असून बेलेंत्रा सोसायटीमध्ये, त्यांनतर काही काळ पावणे गाव तुर्भे येथे वास्तव्यास होते. पीडिता १४ वर्षांची अल्पवयीन असल्यापासून तिचे लैंगिक शोषण सुरू होते. निर्मल चौधरी हा पीडित मुलीच्या आईचा मित्र होता. जुलै २०२२ पासून



आरोपीने पीडितेवर जबरदस्तीने शारीरिक संबंध प्रस्थापित केले. तसेच त्याने पीडितेच्या मोबाईलवर स्वतःचे अश्लील व्हिडीओ पाठविले. या सर्व प्रकारास पीडितेच्या आई व वडिलांनी प्रोत्साहित केले. पीडितेने असह्य झाल्यावर रसायनी पोलीस ठाणे गाठत निर्मल कुमार आणि आई-वडिलांविरोधात तक्रार दाखल केली आहे. याबाबत रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून आरोपींना पोलिसांनी अटक केली.

## प्रवाशांच्या समस्या सोडवणार ‘प्रवासी मित्र’

**सुयोग आंग्रे**


**। रायगड ।**

उन्हाळी सुट्टीत गावी जाणाऱ्या प्रवाशांच्या समस्या, तक्रारींचे निवारण करण्यासाठी एसटी महामंडळाने ‘प्रवासी मित्र’ ही अभिनव संकल्पना राबवली आहे. याच अनुषंगाने रायगड जिल्ह्यातील काही प्रमुख थांब्यावर १५ एप्रिल ते १५ जूनदरम्यान सकाळी ८ ते ११ आणि दुपारी ४ ते रात्री ९ वाजेपर्यत विभागीय कार्यालय व कार्यशाळेतील सर्व पर्यवेक्षक व प्रशासकीय कर्मचारी ‘प्रवासी मित्र’ म्हणून तैनात राहणार आहेत.

जिल्ह्यातील राज्य परिवहन महामंडळाच्या रामवाडी विभागीय कार्यालयांतर्गत ८ आगारांमधून दररोज सुमारे ४५० एसटी रस्त्यावर धावतात. १५ एप्रिलपासून उन्हाळी हंगाम सुरू झाला आहे. एसटीच्या प्रवासाला नागरिक प्राधान्य देत असल्याने चालक, वाहक बसमध्ये क्षमतेपेक्षा कमी प्रवासी असतानाही

**सर्व विभाग नियंत्रक यांनी विभागीय कार्यालय व विभागीय कार्यशाळेतील सर्व पर्यवेक्षक व प्रशासकीय कर्मचारी (सर्व शाखांमधील लिपिक, वरिष्ठ लिपिक लेखाकार इत्यादी) व आगार व्यवस्थापक यांनी त्यांचे आगारातील पर्यवेक्षकीय कर्मचारी/प्रशासकीय कर्मचारी (लिपिक, वरिष्ठ लिपिक, लेखाकार, वाहतूक नियंत्रक इ.) यांची ‘प्रवासी मित्र’ म्हणून निवड करण्यात आली आहे.**

मार्गातील नियोजित थांब्यावर थांबत नाहीत. प्रवाशांना नियोजित ठिकाणी उतरता येत नसल्याने विविध अडचणींना सामोरे जावे लागते. त्यामुळे प्रवाशांची गैरसोय होऊन महामंडळाचे होणारे आर्थिक



> **रायगड जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून नावारूपाला येत आहे. यामुळे रायगड जिल्ह्यात सागरकिनारा, गड–किल्ले पाहण्यासाठी पर्यटक येत असतात. त्याचबरोबर विद्यार्थी, नोकरवर्ग आणि कोकणात जाणारी प्रवासी संख्या अधिक आहे. या प्रवासी वर्गाला उत्तम प्रवासी सुविधा मिळावी, यासाठी राज्य परिवहन मंडळ नेहमीच सतर्क असते. आता प्रवाशांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी ‘प्रवासी मित्र’ थांब्यांवर तैनात असणार आहे.**
>
> **–दीपक घोडे विभागीय नियंत्रक, रायगड**

### येथे चुकविला जातो थांबा

**रामवाडी, वडखळ, इंदापूर, महाड, वाकण, वडखळ, कार्लेखिंड**

नुकसान टाळण्यासाठी महामंडळाने प्रवाशांची वाढणारी गर्दी लक्षात घेऊन ‘प्रवासी मित्र’ ही योजना राबवली आहे.

महामंडळाची ‘प्रवासी मित्र’ ही योजना चांगली असली तर थांब्यावर संध्याकाळी सात वाजेपर्यंतच कर्मचारी कार्यरत असणार आहेत. सायंकाळी ७ ते ११ या वेळेत मोठ्या संख्येने प्रवासी लांब पल्ल्याच्या एसटीने प्रवास करतात. या वेळेत प्रवाशांच्या मदतीला एसटीचे कर्मचारी असणे आवश्यक आहे.

कारण या वेळेत वाहतूक कोंडीत अडकलेल्या गाड्या नेमक्या थांब्यावर कधी येणार, याची माहिती प्रवाशांना मिळत नाही. परिणामी, महामंडळाने संध्याकाळी सातनंतर कर्मचाऱ्यांची नेमणूक करावी, अशी मागणी प्रवासी करीत आहेत.

## कांदळेपाडा ग्रामस्थांचा गाव बंदीचा एकमुखी ठराव

**। पेण । प्रतिनिधी ।**

सांडपाणी व सेवा रस्त्याचा प्रश्न सोडविण्यात चालढकलपणा करणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या धोरणाचा निषेध करून कांदळेपाडा ग्रामस्थांनी लोकसभेच्या मतदानावर बहिष्कार टाकण्याचा आणि राजकीय पुढाऱ्यांना गावबंदीचा एकमुखी ठराव घेतला आहे. याबाबतचे निवेदन उपविभागीय अधिकारी तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी पेण यांना १२ एप्रिल रोजी देण्यात आले आहे.

कांदळेपाडा ग्रामस्थांनी दिलेल्या निवेदनानंतर मंगळवारी (दि.१६) उपविभागीय कार्यालय



पेण येथे कांदळे ग्रामस्थ व राष्ट्रीय महामार्ग प्राधिकीकरण यांच्यामध्ये संयुक्त बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. मात्र या बैठकीला प्राधिकरणाचे अधिकारी तसेच प्रतिनिधी सोडून स्वतः उपविभागीय अधिकारी प्रविण पवार, तहसिलदार तानाजी शेजाळ, पेण पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक देवेंद्र पोळ उपस्थित होते. कांदळेपाडा ग्रामपंचायतीकडून सरपंच मुरलीधर भोईर, उपसरपंच अविनाश भोईर, दिलीप भोईर यांच्यासह प्रमुख कार्यकर्ते हजर होते. उपविभागीय अधिकारी प्रविण पवार यांनी संबंधित अधिकाऱ्यांना भ्रमणध्वनीवरून संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. परंतु, अधिकाऱ्यांनी त्यांचा फोन घेतला नाही. राष्ट्रीय प्राधिकरणाकडून जाणीवपूर्वक चालढकलपणा पान ५ वर




वे|ध|क

### भाजप नाराज पदाधिकाऱ्यांचे राजीनामे

**अहमदनगर :** महाराष्ट्र भाजपमधील नाराज पदाधिकारी राजीनामा देण्याच्या तयारीत आहेत. अहमदनगर जिल्ह्यातील शेवगावचे जवळपास शंभर कार्यकर्ते आणि पदाधिकारी सामूहिक राजीनामे देणार आहेत. स्थानिक पातळीवरील राजकारण, खा. सुजय विखेंना पुन्हा दिलेली उमेदवारी ही राजीनाम्यामागील कारणे कार्यकर्त्यांनी प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांना पत्राद्वारे नाराजी कळवली. भाजपच्या प्रदेश कार्यालयाबाहेर सामूहिक राजीनामे देण्याचा इशारा पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.

### धुळ्यात डॉ. शोभा बच्छावांना उमेदवारी

**धुळे :** लोकसभा हा एकेकाळी काँग्रेसचा बालेकिल्ला होता. मात्र, गेल्या तीन निवडणुकांपासून हा मतदारसंघ भाजपने काबीज केला. डॉ. सुभाष भामरे आता हॅटट्रिकच्या तयारीत आहेत. तर दुसरीकडे काँग्रेसतर्फे आ. कुणाल पाटील यांचे नाव चर्चेत होते. परंतु, त्यांनी नकार दिल्याने पक्षाचे जिल्हाध्यक्ष श्यामकांत सनेर, जिल्हाध्यक्ष डॉ. तुषार शेवाळे यांची नावे चर्चेत आली होती. मात्र अचानक धुळ्याच्या प्रभारी असलेल्या डॉ. शोभा बच्छाव यांच्या नावाची काँग्रेसने अधिकृतपणे घोषणा केली. डॉ. बच्छाव यांना उमेदवारी दिल्यामुळे मतदार संघात

### शाहू छत्रपतींचा अर्ज दाखल

**कोल्हापूर :** कोल्हापूर लोकसभा मतदार संघातील महाविकास आघाडीतील काँग्रेसचे उमेदवार शाहू छत्रपती यांनी मंगळवारी जोरदार शक्तीप्रदर्शन करून तीन अर्ज दाखल केले. तत्पूर्वी त्यांनी दसरा चौकातील राजर्षि शाहू महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करून मिरवणूकीस सुरुवात केली. जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातून आलेले लोक त्यामध्ये सहभागी झाले होते. त्यामध्ये महिलांचीही संख्या लक्षणीय होती. मिरवणूकीत सजवलेल्या गाडीवर शाहू छत्रपती, आ. सतेज पाटील, आ. पी. एन. पाटील, आ. जयश्री जाधव, व्ही. बी. पाटील, विजय देवणे, विश्वास पाटील, ए.वाय.पाटील, स्वाती शिंदे, आपचे संदिप देसाई, मधुरिमाराजे आदींसह आघाडीतील घटक पक्षांचे प्रमुख नेते सहभागी झाले.

# वरिष्ठ नेत्यात वाक्‌युद्ध

**। नाशिक । प्रतिनिधी ।**

लोकसभेच्या नाशिक मतदार संघाचा तिढा अद्याप सुटत नसला तरी मात्र दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेनेच्या नेत्यांमध्ये वाक्‌युद्ध रंगले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाचे नेते प्रफुल्ल पटेल यांनी नाशिकची जागा आमचीच असा दावा केल्यानंतर शिवसेनेच्या शिंदे गटाचे प्रवक्ते संजय शिरसाठ यांनी मात्र नाशिकची जागा आम्हाला मिळावी असा आमचा आग्रहच नाही तर हट्टसुद्धा आहे असा प्रतिदावा केल्याने नाशिकच्या जागेवरून वाद टोकाला गेला आहे.



नाशिक लोकसभा मतदारसंघाची जागा शिवसेना की राष्ट्रवादी काँग्रेस यावर अद्याप निर्णय झालेला नाही. सुरुवातीला शिवसेनेने नाशिकच्या जागेवर दावा करताना शिवसेनेचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी विद्यमान खासदार हेमंत गोडसे यांना तयारीला लागण्याच्या सूचना देतानाच विजयाची हॅटट्रिक करण्याचे आवाहन केले होते.

मात्र त्यानंतर लगेचच भारतीय जनता पक्षाच्या स्थानिक नेत्यांनी वरिष्ठांकडे तक्रार करत महायुतीचा प्रोटोकॉल शिंदे यांच्याकडून तोडला जात असल्याच्या तक्रारी केल्या. त्याच्या दुसऱ्या दिवशीच राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी नाशिक जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार गटाचे पाच आमदार असल्याने नाशिकच्या जागेवर आमचा देखील दावा असल्याचे सांगितले.

त्यानंतर मात्र नाशिकच्या जागेवरून वाद निर्माण झाला. छगन भुजबळ यांचे अचानक नाव चर्चेत आल्याने नाशिकची जागा राष्ट्रवादी काँग्रेसच्या खात्यात जमा होईल, असे बोलले जात होते. त्यानंतर मात्र अद्याप महायुतीच्या घटक पक्षांनी एकत्रितपणे नाशिकच्या जागेचा निर्णय घेतला नाही. भारतीय जनता पक्ष नाशिकच्या जागे संदर्भात एक पाऊल मागे आल्याचे दिसत असले तरी राष्ट्रवादी काँग्रेसचा अजित पवार गट व शिवसेनेच्या शिंदे गटात मात्र नाशिकच्या जागेवरून वाक्‌युद्ध रंगले आहे.

### शिंदे यांच्या शिवसेनेला धक्का

**करमाळा :** करमाळ्याचे शिवसेनेचे माजी आ. नारायण पाटील यांनी पक्षाच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. त्यामुळे माढा लोकसभा मतदासंघात शिवसेना शिंदे गटाला चांगलाच धक्का बसला आहे. लोकसभेची निवडणूक जाहीर झाल्यापासून माजी आमदार नारायण पाटीलयांनाराष्ट्रवादीकाँग्रेसशरदचंद्र पवार पक्षाकडून माढा लोकसभा निवडणूक लढवण्यासंदर्भात विचारणा करण्यात आली होती. तेव्हापासून नारायण पाटील हे महायुतीसोबत राहणार की आघाडीत जाणार? याविषयी चर्चा रंगल्या होत्या. पाटील हे शिवसेनेमध्ये फूट झाल्यानंतर मुख्यमंत्री शिंदे यांच्या शिवसेनेबरोबर गेले होते. नारायण पाटील यांनी शिवसेनेला सोडणे हे माढा मतदारसंघात महायुतीला एक मोठा धक्का बसला आहे.

# अखेर उदयनराजेंना उमेदवारी जाहीर

**। सातारा । प्रतिनिधी ।**

अनेक दिवसांच्या प्रतिक्षेनंतर अखेर उदयनराजे भोसले यांना भाजपकडून साताऱ्यातून उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून उदयनराजेंच्या नावाची चर्चा सुरु होती. उदयनराजे यांनी देखील आपल्यापरीने तयारी सुरु केली होती. अखेर भाजपकडून त्यांना मंगळवारी उमेदवारी जाहीर केली आहे. साताऱ्यातून लोकसभेसाठी तिकीट मिळावे यासाठी उदयनराजे आग्रही होती. यासाठी त्यांनी दिल्लीत जाऊन भाजपच्या वरिष्ठ नेत्यांची भेट घेतली होती. उदयनराजे दिल्ली भेटीनंतर राज्यात आल्यानंतर त्यांच्या समर्थकांनी साताऱ्यात जल्लोष सुरु केला होता. मात्र,



तरीही पुढील काही दिवस त्यांच्या नावाची घोषणा झाली नव्हती. त्यामुळे एकप्रकारची धाकधूक त्यांच्या कार्यकर्त्यांमध्ये निर्माण झाली होती. भाजपने लोकसभा निवडणुकीसाठी उमेदवारांची बारावी यादी जाहीर केली आहे. या यादीमध्ये उदयनराजे यांचे नाव आहे. त्यामुळे अखेर उदयनराजे यांच्या कार्यकर्त्यांनी सुटकेचा निश्वास सोडला आहे असं म्हणावं लागेल. उदयनराजे यांच्यासमोर शरद पवार गटाचे शशिकांत शिंदे यांचे आव्हान असणार आहे.

# माजी मंत्री डॉक्टरांची प्रतिष्ठा पणाला

**। नागपूर । प्रतिनिधी ।**

एकेकाळी काँग्रेसचा बालेकिल्ला असलेल्या धुळे लोकसभा मतदारसंघात गेल्या पंधरा वर्षांपासून कमळ फुलल्याने महायुतीतर्फे भाजपकडून सलग तिसऱ्यांदा विद्यमान खा. डॉ. सुभाष भामरे यांची पहिल्याच यादीत उमेदवारी जाहीर करून आघाडी घेतली. तेव्हापासून महाविकास आघाडीकडून कोण उमेदवारी करणार याबाबत मतदारांमध्ये उत्सुकता होती. अनेक नावांच्या चर्चेनंतर नाशिकच्या माजी महापौर, माजी आरोग्यमंत्री डॉ. शोभा बच्छाव यांची काँगेसकडून उमेदवारी जाहीर झाल्याने अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला आहे. एकंदरीत लोकसभा रणसंग्रामामुळे माजी मंत्री असलेल्या दोन्ही डॉक्टरांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे.




आघाडीकडून धुळे लोकसभा मतदारसंघ काँग्रेसला सोडण्यात आल्याने काँग्रेसचा उमेदवार कोण याबाबत अनेक नावांच्या चर्चेबाबत गुऱ्हाळ सुरू होते. त्यात काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ. तुषार शेवाळे, धुळे काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष शामकांत सनेर, मालेगावचे माजी महापौर असिफ शेख, डॉ. सुधीर तांबे, कुपखेडा येथील वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे, धुळे ग्रामीणचे आ. कुणाल पाटील यांच्या पत्नी अश्विनी पाटील आदींच्या चर्चेनंतर डॉ. शोभा बच्छाव यांची उमेदवारी निश्चित झाल्याने काँग्रेस उमेदवाराच्या चर्चेला पूर्णविराम मिळाला आहे.

धुळे लोकसभा मतदारसंघ हा एकेकाळी काँग्रेसचा बालेकिल्ला होता. पण मागील तीन निवडणुकांपासून या मतदारसंघावर भाजपने निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केले आहे. काँग्रेसचा गेलेला हा बालेकिल्ला पुन्हा ताब्यात घेण्यासाठी काँग्रेस नेतृत्वाकडून राजकीय व्यूहरचना सुरू करण्यात आली होती.

### मशालीने हुकुमशाही भस्म होईल

**मुंबई :** देशात हुकुमशाहीविरोधात एक पक्के जनमत तयार झाले आहे. ते फक्त मतदानाची वाट पाहत आहेत. वचननामा जवळपास निश्चित झाला आहे. मशाल चिन्ह नवीन असले तरी सर्वांना आता माहिती झाले आहे. मशाल चिन्हावरच विजयाची सुरुवात झाली. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात मशाल चिन्ह पोहोचले आहे. मशालीच्या रुपाने हुकुमशाही राजवट भस्म होईल, असा एल्गार उद्धव ठाकरेंनी केला. जगातील सगळ्यात मोठा घोटाळा हा आहे. सर्वोच्च न्यायालयाने हे उघड केले नसते तर हजारो कोटी यांना कोणी दिले हे कळले नसते आणि चंदा दो आणि धंदा लो हे काम यापुढेही चालले असते. यामुळे आता त्यांची सत्ता येत नाही आणि हे सगळे उघड झाले.

# ‘लोकशाही वाचवण्यासाठी निवडणूक लढवतोय’

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

भाजपा केवळ जाहीरनामे प्रसिद्ध करत राहतील. कारण या निवडणुकीनंतर भाजपा सत्तेत येणार नाही. त्यामुळे त्यांना काही वाट्टेल ते बोलण्याचा अधिकार आहे. वाट्टेल ते बोलण्याचा अधिकार कायम राहावा, म्हणून आम्ही लोकशाही वाचवण्यासाठी निवडणूक लढवत आहोत, असा एल्गार ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी केला. यांनी भाजपावर जोरदार टीका केली. तसेच अमित शाह यांनी केलेल्या टीकेचा खरपूस समाचार घेतला. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हे उद्धव ठाकरे तसेच शरद पवार यांच्या अपत्य प्रेमामुळे फुटले.

भाजपाने पक्ष फोडले नाहीत, या शब्दांत केंद्रीय मंत्री अमित शाह यांनी हल्लाबोल केला होता. यावर बोलताना, अमित शाह यांना मला सांगायचे आहे की, तुमच्या पुत्रप्रेमामुळे भारत वर्ल्ड कपमधील अंतिम सामना हरला. तसे पुत्रप्रेम मी दाखवलेले नाही.

अमित शाह यांचे पक्षातील स्थान काय, असा सवाल उद्धव ठाकरेंनी केला. काही दिवसांपूर्वी देवेंद्र फडणवीस यांनी मी पुन्हा येईन, असे म्हटले होते. ते दोन पक्ष फोडून आलो, त्यामुळे भाजपाने केलेल्या दाव्यांमध्ये एकवाक्यता दिसून येत नाही. अमित शाह यांची लाज त्यांचेच चेले-चपाटे काढत आहेत. तुमच्या पुत्रप्रेमामुळे भारत अंतिम सामना हरला, यावर अमित शाह बोलले तर अधिक बरे होईल, असे आव्हान उद्धव ठाकरेंनी दिले.

### कोकणात महायुतीमध्ये अद्याप संभ्रम

**रत्नागिरी :** रत्नागिरी सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघात अद्याप महायुतीकडून उमेदवार जाहीर झालेले नाही. नारायण राणे यांनी सभा बैठका कार्यकर्त्यांशी संवाद मेळावे सुरू केले आहेत. शिवसेनेकडून किरण सामंत यांचेही नाव चर्चेत आहे. अशातच महायुतीमध्ये गोंधळ वाढल्याची चर्चा असून रत्नागिरी जिल्ह्यातील समन्वय बैठका रद्द करण्यात आल्या आहेत. भाजपचे राजेश सावंत आणि शिवसेनेचे राहुल पंडित यांच्यामध्ये चांगला समन्वय आहे. पण त्यांना वरिष्ठ पातळीवरुन आदेश नसल्याने आज होणाऱ्या बैठका रद्द करण्यात आल्याचे समजते. महायुतीमध्ये गोंधळ वाढल्याचे म्हटले जात असून अजून उमेदवार जाहीर झालेला नाही. त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे.

# खा. कोल्हे सुसंस्कृत लोकप्रतिनिधी

**। पुणे । प्रतिनिधी।**

शिरुर लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार माजी खा. शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या प्रचारार्थ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मेळावा दोन दिवसांपूर्वी पार पडला. या मेळाव्यात अजित पवार म्हणाले की, तुम्हाला कार्यसम्राट खासदार पाहिजे की, नटसम्राट खासदार? असे म्हणत त्यांनी खा. अमोल कोल्हे यांना टोला लगावला होता. यावर अमोल कोल्हे यांनी ट्विटद्वारे प्रतिक्रिया दिली असून यावर सुप्रिया सुळे यांनीदेखील प्रतिक्रिया दिली आहे.



अजित पवार यांच्या टीकेला प्रतिक्रिया देत कोल्हे यांनी ट्विटर करत उत्तर दिले. कार्यसम्राट की नटसम्राट माहीत नाही, पण स्वकर्तृत्वसम्राट नक्की! असं ट्विट करत माझ्या काकांच्या पुण्याईवर मी डॉक्टर, अभिनेता नाही तर स्वकर्तृत्वावर मी माझी ओळख असल्याचे सांगत अमोल कोल्हे यांनी अजित पवार पवार यांना सुनावले होते. त्यावर सुप्रिया सुळे यांनी देखील विधान केले.

### नारायण राणे अजून वेटिंगवर

**रत्नागिरी :** महायुतीत काही जागांवरचा तिढा काही सुटताना दिसत नाही. नाशिकच्या जागेचा तिढा अद्याप सुटलेला नाही. भाजप पाठोपाठ राष्ट्रवादी काँग्रेसचादेखील या मतदारसंघावर दावा आहे. त्याच प्रमाणे जागेसोबतच रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघाचा तिढा सुटत नाही. कारण शिवसेना आणि भाजप दोन्ही पक्षांकडून या मतदारसंघावर दावा केला जातोय. मंत्री उदय सामंत यांनी आधीच दावा सांगितलाय. त्यांचे बंधू किरण सामंत हे रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघासाठी इच्छुक आहेत.

# इंडिया आघाडीतील पक्षांचा जाहीरनामा जाहीर

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

काँग्रेसने आपल्या नेतृत्वामध्ये भाजपाविरोधी २८ पक्षांची मोट बांधत इंडिया आघाडी उभी केली आहे. दुसरीकडे, भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वातील एनडीए आघाडीने चारशेपार जाण्याचा आत्मविश्वास व्यक्त केला आहे. या दोन्हीही प्रमुख आघाड्यांमधील पक्षांनी आपापले जाहीरनामे घोषित केले आहेत. विरोधक असलेली इंडिया आघाडी सत्तेत आली तर ती नेमके काय काय करेल? ती जुनी पेन्शन योजना पुन्हा चालू करेल का? नागरिकत्त्व सुधारणा कायदा आणि बेकायदा कृत्यविरोधी




प्रतिबंध कायदा रद्द करेल? खासगी क्षेत्रामध्ये आरक्षण लागू करेल? राज्यपाल पद रद्दबातल ठरवेल वा त्यांच्या निवड प्रक्रियेत बदल करेल? कलम ३५६ रद्द करून जम्मू आणि काश्मीरला त्याचा विशेष दर्जा बहाल करेल? असे अनेक प्रश्न आहेत की, ज्यांची उत्तरे भाजपाविरोधी मतदाराला हवी आहेत. मात्र, या सगळ्या प्रश्नांची उत्तरे कशी आणि कुठून मिळतील? कारण तुम्ही इंडिया आघाडीतील कोणत्या पक्षाचा जाहीरनामा वाचत आहात, त्यावर या प्रश्नांची उत्तरे अवलंबून असणार आहेत.

आघाडीतील काँग्रेस, द्रमुक, समाजवादी पक्ष, राष्ट्रीय जनता दल, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष आणि भारतीय कम्युनिस्ट पक्ष यांच्या जाहीरनाम्यामध्ये अनेक साम्यस्थळे आहेत. तसेच ते अनेक वैचारिक आणि राजकीय मुद्द्यांवरदेखील एकमेकांपेक्षा वेगळे ठरतात. इंडिया आघाडीतील प्रमुख पक्ष असलेला काँग्रेस आणि द्रमुक हे दोन्ही पक्ष जुन्या पेन्शन योजनेबाबत मौन बाळगून आहेत, तर समाजवादी पक्ष, राष्ट्रीय जनता दल, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष आणि भारतीय कम्युनिस्ट पक्षाने ही योजना पुन्हा लागू करण्याबाबतचे आश्वासन दिले आहे.

# शिवसेनेला नकली म्हणणाऱ्यांची शैक्षणिक पदवी नकली




**। पालघर । प्रतिनिधी ।**

शिवसेनाप्रमुखाने स्थापन केलेल्याशिवसेनेलानकलीम्हणणाऱ्या भाजपाच्या नेत्यांची शैक्षणिक पदी नकली असल्याचे प्रतिउत्तर उद्धव ठाकरे यांनी बोईसर येथे दिले. देश हुकूमशाहीकडे वाटचाल करत असताना देशाची मजबुती कायम ठेवण्यासाठी इंडिया आघाडीच्या माध्यमातून संमिश्र सरकार आवश्यक असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. तसेच आघाडी प्रणित इंडिया सरकार सत्तेत आल्यास वाढवण बंदर कायमचे रद्द करून पालघर जिल्ह्यात चांगले उद्योग आणून विकास साधला जाईल असे त्यांनी आश्वासन दिले. आघाडीच्या उमेदवाराच्या प्रचारार्थ बोईसर येथे जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी खा. संजय राऊत, आ. विनोद निकोले, आ. सुनील भुसारा, डॉ. अशोक ढवळे, काळूराम धोदडे उपस्थित होते.

# भाजपची कर्नाटकात कसोटी

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

गत निवडणुकीत २८ पैकी तब्बल २५ जागा जिंकून कर्नाटकात काँग्रेसचा सफाया केलेल्या भाजपपुढे यावेळी मात्र संख्याबळ राखण्याचे आव्हान आहे. ‘अब की बार, चारसौ पार’ असा देशपातळीवर नारा देणाऱ्या भाजपच्या जागा कर्नाटकात गतवेळच्या तुलनेत कमी होण्याची शक्यता सद्यःस्थितीत दिसते आहे.कर्नाटकात दुसऱ्या आणि तिसऱ्या टप्प्यात निवडणुका होत आहेत. २६ एप्रिलला १४ जागांसाठी, तर उर्वरित १४ जागांसाठी सात मे रोजी मतदान होईल.

भाजप आणि धर्मनिरपेक्ष जनता दल (जेडीएस) यांची युती विरुद्ध काँग्रेस असा सरळ सामना होत आहे.



त्यामुळे बहुतांश लढती लक्षवेधी ठरणार आहेत.

गेल्या निवडणुकीत उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांचे बंधू डी. के. सुरेश हे काँग्रेसचे एकमेव उमेदवार लोकसभेत गेले होते. भाजपने २५ जागा जिंकल्या होत्या. जेडीएसला एक जागा मिळाली होती, तर एक अपक्ष विजयी झाला होता. भाजपने यावेळी किमान २० जागा जिंकण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे, तर काँग्रेसने दोन अंकी संख्या गाठण्याचा चंग बांधला आहे. असे मानले जाते, की २०१४ मध्ये आलेल्या मोदी लाटेत काँग्रेसची देशभरात वाताहत झाली.

कर्नाटकात मात्र, त्याआधीपासूनच लोकसभेसाठी काँग्रेसची पीछेहाट सुरू झाली होती. १९९९ मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेसने येथे सर्वाधिक १८ जागा जिंकल्या होत्या. त्यानंतर २००४ मध्ये झालेल्या निवडणुकीत काँग्रेसला फक्त आठ जागा मिळू शकल्या होत्या. त्यानंतर २००९ मध्ये सहा, तर २०१४ मध्ये नऊ जागा मिळाल्या होत्या. २०१९ मध्ये तर काँग्रेसला फक्त एका जागेवर समाधान मानावे लागले होते. पण काँग्रेसच्या जागा निश्चित वाढतील, कारण यावेळी परिस्थिती बदलली आहे.

### भाजपचे बिंग फुटले

**मुंबई:**निवडणूक रोखे घोटाळ्यामध्ये भाजपचं बिंग फुटलं आहे सुप्रीम कोर्टामुळे हा सर्व प्रकार समोर आला आहे, जगातील सगळ्यात मोठा घोटाळा हा आहे. सुप्रिम कोर्टाने हे उघड केलं नसतं तर हजारो कोटी यांना कोणी दिले हे कळलं नसतं आणि चंदा दो आणि धंदा लो हे काम यापुढेही चाललं असतं, असा टोलाही उद्धव ठाकरेंनी टोला लगावला. यामुळे आता त्यांची सत्ता येत नाही आणि हे सगळं उघड झालं. हे आधी का झालं नाही याचा विरोधी पक्षांना पश्चाताप होईल, असंही ठाकरे म्हणाले. उद्धव ठाकरे म्हणाले, महाराष्ट्र काय आहे हे यांना आता समजेल. संपूर्ण देशात हुकूमशाहीविरोधात जनमत झालं आहे, असंही ठाकरे म्हणाले.

# मोदींची शक्ती कमी करणे देशाची गरज

**। सातारा । प्रतिनिधी ।**

सातारा जिल्ह्यात यशवंतराव चव्हाणांपासून अनेक कर्तृत्वान लोकांची फळी निर्माण झाली आहे. त्यांच्या विचारांचा पगडा आजही लोकांच्या मनावर आहे. हजारोंच्या संख्येने शशिकांत शिंदेंचा अर्ज भरण्यासाठी आले. देशातील लोकांना परिवर्तन हवं आहे. त्याचे पहिले पाऊल साताऱ्यातून टाकले आहे. आमच्या लोकांचा आत्मविश्वास वाढवण्याचे काम सातारकारांनी केले. सध्या मोदींची शक्ती कमी करणे देशाची गरज आहे असे विधान शरद पवारांनी केले. सातारा येथे महाविकास आघाडीचे उमेदवार शशिकांत शिंदे यांनी उमेदवारी अर्ज भरला. त्यावेळी पवार म्हणाले की, विरोधकांकडे सांगण्यासारखे दुसरे काही नाही. शशिकांत शिंदेंना लोकांचा प्रतिसाद मिळत आहे, हे पाहून त्यांच्यावर आरोप लावले जात आहेत. आपले नाणं खणखणीत आहे. लोकांमध्ये शशिकांत शिंदे यांच्याबद्दल आपुलकी आहे. पुरोगामी विचारांना साताराची जनता नेहमीच पाठिंबा देतात. श्रीनिवास पाटलांनाही सातारकरांनी निवडून दिले. गेल्यावेळी आघाडी नव्हती आता आघाडी आहे. एक एक जागा निवडून आणण्यासाठी इंडिया आघाडी काम करत आहे. मोदींची एक एक जागा कमी करणे, मोदींची संसदेतील संख्या कमी करणे, त्यांची शक्ती कमी करणे ही देशाची गरज आहे असे त्यांनी सांगितले.

# महायुतीतील इच्छुक उमेदवारांची घालमेल

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

लोकसभा निवडणुकीला अवघे पस्तीस दिवस शिल्लक राहिल्याने महाविकास आघाडी व महायुतीच्या तुलनेत नाशिक लोकसभा मतदारसंघांमध्ये महाविकास आघाडीने तुर्त तरी बाजी मारली आहे.

महायुतीमध्ये जागा कुठल्या पक्षाला व उमेदवार निश्चिती अद्याप दूर असल्याने महायुतीमधील इच्छुकांची घालमेल वाढली आहे. पुढील पस्तीस दिवसांमध्ये ग्रामीण भागात पोहोचण्याचे मोठे आव्हान महायुतीच्या उमेदवारासमोर राहणार असल्याचे दिसून येत आहे. लोकसभा मतदारसंघांमध्ये महाविकास आघाडी व महायुतीमध्ये सरळ लढत होणार असल्याचे तुर्त तरी दिसून येत आहे.

२० मे रोजी निवडणूक असल्याने महायुतीचा उमेदवार निश्चित होत नाही. त्यातही भाजप राष्ट्रवादी काँग्रेसची शिवसेनेचा शिंदे गट कोणाला जागा सोडावी याबाबत मात्र, अद्यापही अनिश्चितता आहे.

पारंपरिक पद्धतीने शिवसेनेने जागेची मागणी केली आहे, तर शहरांमध्ये तीन आमदार असल्याने भाजपला नाशिकची जागा हवी आहे. जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे पाच आमदार असल्याने राष्ट्रवादी काँग्रेसला नाशिकची जागा हवी आहे. महायुतीमधील घटक पक्षांमध्ये जागेवरून वाक्‌युद्ध रंगले आहे. इच्छुकांच्या मुंबईच्या फेऱ्या वाढल्या आहेत.

त्यामुळे मुंबईवरून इच्छुक परतताना फक्त आश्वासन घेऊन येतात, ठोस असा निर्णय होत नसल्याने घालमेल वाढली आहे. महायुतीमध्ये शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसकडून सध्या दावे व प्रतिदावे वाढले आहेत.

# सोशल मीडियावरही प्रचाराचा धुरळा

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

आधुनिकीकरणाच्या युगातील बदल स्वीकारत सत्ताधारी होण्यासाठी राजकीय पक्ष आणि उमेदवार आता प्रत्यक्ष निवडणूक प्रचारापेक्षा डिजिटल प्रचारावर भर देत आहेत. त्यामुळेच या लोकसभा निवडणुकीत ढोल-ताशांच्या दणदणाटापेक्षा सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर निवडणूक प्रचार मोठ्या प्रमाणात पाहायला मिळत आहे. डिजिटल निवडणूक प्रचाराच्या संदर्भात, मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाला २९ मार्चपासून २७९ अर्ज प्राप्त झाले आहेत. यामध्ये



भाजपने सर्वाधिक अर्ज दिले आहेत. काँग्रेस दुसऱ्या तर आम आदमी पक्ष तिसऱ्या क्रमांकावर आहे.

मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयातील एका अधिकाऱ्याने सांगितले की, भाजपने आतापर्यंत सर्वाधिक २०० अर्ज दिले आहेत.

काँग्रेसने ७८ तर आपने एकच अर्ज दिला आहे. अर्ज दाखल केल्यापासून ४८ तासांच्या आत त्याला मंजूरी द्यावी लागते. भाजपकडून उमेदवारी जाहीर होण्याआधीच उदयनराजेंनी भरली आहे.

डिजिटलनिवडणूकप्रचारासाठी व्हिडिओ, रील, भाषणे इत्यादी प्रसारित करण्यापूर्वी, ते निवडणूक आयोगाच्या द्वारे प्रमाणित करणे आवश्यक आहे. त्यासाठी राजकीय पक्षांना अर्ज करावा लागतो. ४८ तासांत ते मंजूर केले जातात. सध्या प्राप्त झालेल्या अर्जांपैकी बहुतांश अर्ज मंजूर करण्यात आले आहेत.

### प्रचारात एआयचा वापर

**देशात लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात राजकीय पक्ष विविध नव्या गोष्टींचा अवलंब करत आहेत. दरम्यान, तमिळनाडूच्या धर्मपुरी येथे रोबोट निवडणुकीचा प्रचार करत असल्याचे समोर आले आहे. धर्मपुरी लोकसभा मतदारसंघातील उमेदवार डॉ. अशोकन निवडणूक प्रचारासाठी रोबोटची मदत घेत आहेत. हा रोबो लोकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला आहे. लोक त्याच्या जवळ येऊन कुतूहलाने बघत आहेत.**

## वे|ध|क

# गणेश मुळे यांची जिल्हा माध्यम कक्षास भेट




। रायगड । खास प्रतिनिधी ।

माहिती व जनसंपर्क महासंचालयाचे कोकण विभागीय उपसंचालक गणेश मुळे यांनी जिल्हा माध्यम कक्षास भेट देऊन पाहणी केली. त्यांनी माध्यम कक्षातील इलेक्ट्रॉनिक मीडिया सेलसह विविध दैनंदिन कामकाजाची माहिती घेतली. भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचना व निर्देशानुसार निवडणूक विषयक कामकाज करण्यात यावे, अशा सूचना त्यांनी दिल्या.

जिल्हा माहिती कार्यालयाच्या प्रांगणात मतदान जनजागृतीसाठी उभारण्यात आलेल्या सेल्फी पॉईंटला भेट देऊन सेल्फी घेतली. यावेळी जिल्हा माहिती अधिकारी मनिषा पिंगळे, माहिती अधिकारी किरण वाघ, माध्यम कक्षासाठी नियुक्त अधिकारी तसेच कार्यालयातील विविध शाखांचे कर्मचारी आदी उपस्थित होते.

जिल्हा माध्यम प्रमाणीकरण व संनियंत्रण समिती स्थापन करण्यात आली असून माध्यम कक्षातून उमेदवारांच्या प्रचार जाहिराती याचे प्रमाणीकरण करण्याची कार्यवाही केली जाते. जिल्हा निवडणूक प्रशासनाच्यावतीने लोकसभा सार्वत्रिक निवडणूक संबंधी प्रसार माध्यम व वृत्तपत्र प्रतिनिधी यांच्याशी समन्वय राखला जात असल्याची माहिती त्यांना देण्यात आली.

# शासकीय कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षणाचे आयोजन

। पनवेल । प्रतिनिधी ।

जिल्हाधकिारी व रायगड जिल्हा निवडणूक अधकिारी किसन जावळे यांच्या आदेशानुसार मावळ लोकसभा मतदारसंघाच्या पनवेल



मतदारसंघामधील २ हजार ७९५ मतदान अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी १२ व १३ एप्रिल रोजी चार सत्रात पनवेल शेंडुंग येथील छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठात ऑडिओ व्हिजुअल प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते.

१२ एप्रिल रोजी दोन सत्रात १ हजार ४०० अधिकारी व कर्मचारी यांना मावळ लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी दीपक सिंगला यांच्या उपसथितीत निवडणूक निर्णय अधिकारी राहुल मुंडके यांच्या मार्गदर्शनाखाली अधिकारी, कर्मचारी यांना निवडणूक कर्तव्याबाबत व ईव्हीएम मशीनबाबत तांत्रिक प्रशिक्षण देण्यात आले. या वेळी प्रशिक्षणाच्या ठिकाणी मतदान अधिकारी, कर्मचारी यांची गैरसोय होऊ नये म्हणून जागोजागी दिशादर्शक फलक, हजेरी नियोजन फलक लावण्यात आले होते. तसेच वैद्यकीय पथकाचीदेखील प्रशिक्षणाच्या ठिकाणी सोय करण्यात आली होती. येणाऱ्या प्रशिक्षणार्थींच्या पार्किंगसाठी व्यवस्था करण्यात आली होती. प्रशिक्षण ठिकाणी मतदान अधिकारी, कर्मचारी यांना गरमीचा त्रास होवू नये, म्हणून कुलर व फॅनची व्यवस्था चांगल्या प्रकारे करण्यात आलेली होती. तसेच प्रशिक्षणासाठी आलेल्या सर्व प्रशिक्षणार्थींना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात येऊन चहा, पाणी व नाश्ताची उत्तम सोय करण्यात आली होती. यावेळी सहायक निवडणूक निर्णय अधिकारी राहुल मुंडके यांनी साध्या व सोप्या भाषेमध्ये निवडणूक कर्तव्याबाबत प्रशिक्षण दिले. तसेच ईव्हीएम मशीन हाताळणी कशी करावी, याबाबत सर्व निवडणूक क्षेत्रिय अधिकारी व मास्टर ट्रेनर्स यांनी काम पाहिले.

# महायुतीचा मंडप रिकामा

## तटकरेंविरोधात तटबंदी; मतदार, पदाधिकाऱ्यांमध्ये नाराजीचा सूर

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

लोकसभा निवडणुकीचा प्रचार कळस गाठत असतानांच, रायगड लोकसभा मतदारसंघात अजित पवार गटाचे नेतृत्व करणारे सुनील तटकरे कमी होत असलेल्या गर्दीच्या आव्हानात्मक परिस्थितीशी झुंजत आहेत. तटकरेंच्या सभांना तुरळक उपस्थिती असल्याने तटकरेंचं मनोधैर्यही खचत असल्याची चर्चा सध्या सुरु आहे.

एकेकाळी रायगडमध्ये दबदबा निर्माण करणाऱ्या तटकरेंना मतदारांना आकर्षित करण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. सत्तेत राहण्यासाठी सुनील तटकरे यांनी वेळोवेळी केलेल्या गलिच्छ राजकारणामुळे त्यांच्याबद्दलची विश्वासार्हता कमी झाल्याचे या निवडणुकीतून दिसत आहे. सभेत तटकरे काय बोलणार, यापेक्षा मंडपातील रिकाम्या खुर्च्या लक्ष वेधून घेत असल्याचे चित्र गेल्या अनेक सभांमध्ये पहायला मिळाले. लोकसभा निवडणुकीचे रायगड मतदारसंघाचे उमेदवार जाहीर झाले असून इंडिया आघाडीचे अनंत गीते तर महायुतीचे सुनील तटकरे रिंगणात उतरले आहेत.

शेकाप, काँग्रेस, शिवसेना यांच्या भक्कम पाठिंब्यामुळे अनंत गीते यांचे पारडे जड असून सुनील तटकरेंविरोधात मराठा, ओबीसी, दलित आणि मुस्लिम समाज एकवटला आहे.

अनंत गीते यांच्या तुलनेत तटकरे यांनी कायमच जनतेची फसवणूक केल्याने जनतेला स्वच्छ प्रतिमेचा नेता हवा असल्याचे विविध समाज संघटनांनी जाहिरपणे सांगितले आहे. परिणामी अनंत गीतेंनाच निवडून आणण्यासाठी विविध संघटनांनी चंग बांधला आहे. याशिवाय अलिकडील महायुतीच्या सभा पाहता महायुतीतील अंतर्गत वादामुळे शिंदे, भाजपचे आमदार, पदाधिकारी तटकरेंना कितपत सहकार्य करतील, याबाबतही साशंकता व्यक्त करण्यात येत आहे. महायुतीच्या सभांकडे मतदारांनी पाठ फिरवली आहे.

अनंत गीते यांनी सोमवारी उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी हजारो कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. याशिवाय त्यांच्या सभांना मतदारही आवर्जून उपस्थित राहत आहे. याउलट महायुतीचा मंडप मात्र रिकामाच असल्याचे अनेक संभांमधून समोर आले आहे.




### शिंदेची सेना सहकार्य करणार?

शिवसेना फुटल्यानंतर भरत गोगावले यांनी एकनाथ शिंदे यांना साथ दिली होती. मात्र, तेव्हापासून आजतागायत मंत्रीपदाच्या प्रतीक्षेत असलेल्या भरत गोगावलेंची मनोकामना पूर्ण झाली नाही. त्यांनी रायगडच्या पालकमंत्रीपदासाठी सातत्याने दावा केला होता. मात्र ते सुद्धा त्यांच्या वाट्याला आलं नाही. त्यामुळे महायुतीची ताकद रायगड लोकसभा मतदारसंघात दिसत असली, तरी मनाने ते एकत्र आहेत का? हा मोठा प्रश्न आहे.

### युतीतील नेते, पदाधिकाऱ्यांमध्ये अंतर्गत वाद

रायगड लोकसभा मतदारसंघांमध्ये भरत गोगावले, अलिबागचे महेंद्र दळवी आणि दापोलीची योगेश कदम हे सातत्याने रायगडच्या तत्कालीन पालकमंत्री आदिती तटकरे आणि सुनील तटकरे यांच्या विरोधात भूमिका घेत होते. इतकेच नव्हे तर सातत्याने आरोप-प्रत्यारोप सुद्धा झाले होते. याशिवाय भाजपचे धैयशील पाटील यांनी सुनील तटकरे नको म्हणून भाजपमध्ये प्रवेश केला असल्याचे बोलले जाते. मात्र, अजित पवार गटाच्या सुनील तटकरेंना महायुतीतून तिकिट मिळाल्याने धैर्यशील पाटील यांचा भ्रमनिरास झाला. त्यामुळे तटकरेंविरोधात काम करु पाहणारे धैर्यशील पाटील तटकरेंना कितपत सहकार्य करतील हा देखील प्रश्नच आहे.

# लोकशाहीच्या जागरणासाठी मतदानाची जागृती

। पनवेल । प्रतिनिधी ।

निवडणुकीची धामधूम सुरू आहे. लोकशाहीचा उत्सव आता सुरू झालेला आहे. या उत्सवामध्ये निवडणूक आणि मतदान व मतदार हे समीकरण जुळलेलं असतं. लोकशाहीत मतदानाची टक्केवारी वाढली तरच सकस ,पोषक आणि जनतेला हवे असलेले सरकार मिळू शकत. यासाठी शासनही मतदार मतदान करण्यासाठी सर्वांनी यावे यासाठी आग्रहाची भूमिका घेत आहे. कळंबोली वसाहतीमध्ये मतदारांमध्ये जागृती व्हावी व मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी सुधागड विद्या संकुलातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, कब बुलबुल आर एस पी पथक व विद्यार्थी वर्गाने कळंबोलीतून प्रभात फेरी काढून विविध ठिकाणी पथनाट्य सादर करून व घोषणा फलक हातात घेऊन मतदानाविषयी जनजागृती केली. लोकशाहीतील उत्सवामध्ये निवडणूक प्रक्रियेत सर्वाधिक नागरिकांनी आपला मतदानाचा हक्क बजवावा व अधिकाधिक मतदारांनी मतदानात सहभाग घेण्यासाठी शासनाकडून विविध प्रबोधनाचे मार्ग स्वीकारले जात आहेत. यामध्ये विविध सार्वजनिक संस्था, गणेश मंडळे, विविध शाळा यांच्या माध्यमातूनही विद्यार्थी जनजागृती करीत आहेत. शनिवारी सकाळी कळंबोलीतील सुधागड विद्या संकुलातील कब बुलबुल, आरएसपी पथकातील विद्यार्थी विद्यार्थ्यांनी एका महारॅलीचे आयोजन केले होते. रॅलीमध्ये मतदानाविषयी जनजागृती करण्यात आली.

# जासईत मतदान जनजागृती कार्यक्रमात

। उरण । वार्ताहर ।

उरण मतदार संघात लोकसभा निवडणकीच्या पार्श्वभूमीवर निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रमाद्वारे मतदान जागृती अभियान राबविण्यात आले. या जनजागृती कार्यक्रमात उरण शहरातील युईएस कॉलेजमधील विद्यार्थ्यांना मी मतदान करणार, आपल्या देशाचे भवितव्य घडविणार अशी शपथ देण्यात आली. तसेच मतदान करताना काय करावे आणि काय करू नये या विषयावर नाट्य सादरीकरण करून प्रबोधन करण्यात आले. जासई येथील राजिपच्या शाळेत मतदान जनजागृती कार्यक्रमात मतदान जागृती करण्यात आली.

# नामसाध्यर्म्य उमेदवार उभे करण्यात रायगड अग्रेसर

। रायगड । प्रतिनिधी ।

लोकसभा व विधानसभा निवडणुकीत मुख्य उमेदवारांसमोर नामसाधर्म्य असलेले उमेदवार उभे करण्याचा प्रयोग रायगडच्या राजकारणात सातत्याने केला जात असून या निवडणुकीतही असा प्रयोग पुन्हा केला जाणार का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. निवडणुकीत विकासाचे ठोस मुद्दे, जाहिरनामे यांचा फारसा विचार न करता नामसाधर्म्यातून समोरच्या उमेदवाराची मते कशी विभागली जातील याकडे लक्ष दिले जात असल्याने जिल्ह्यातील या अपयशी ठरलेल्या नामसाधर्म्याला आता मतदारही कंटाळल्याचे दिसत आहेत.

कुलाबा मतदारसंघाचे विभाजन होऊन मावळ व रायगड हे लोकसभेचे दोन मतदारसंघ तयार झाले. कुलाबा मतदारसंघात शेकाप आणि काँग्रेस यांच्यात रस्सीखेच सुरू असे. बॅ. अंतुले आणि शेकापचे दत्ता पाटील यांच्यात राजकिय चुरस सातत्याने निर्माण होत असे. कुलाबा मतदारसंघात नामसाध्यर्म्य असलेले उमेदवार उभे करून मतांचे विभाजन करण्याच्या खेळी काँग्रेस व शेकापने सातत्याने केल्या आहेत. नामसाध्यर्म्याच्या खेळी आजही राजकारणात दिसत आहेत. त्यामुळे प्रचाराचे ठोस मुद्दे, विकासात्मक बाबींवर निवडणूक लढण्याची ताकद राजकिय पक्षांत नसावी का? हा प्रश्न आता निर्माण झाला आहे. नामसाध्यर्म्य असलेले उमेदवार उभे केल्याने कोणत्याही विजयी व मुख्य उमेदवाराला याकामी फटका बसलेला दिसत नाही. कुलाबा मतदारसंघात यापूर्वी १९९१ साली बॅ. अंतुले यांच्या विरोधात शेकापचे दत्ता पाटील उभे होते. त्यावेळी व त्यानंतर १९९६ सालीही दत्ता पाटील नावाचा नामसाधर्म्य असलेला उमेदवार रिंगणात उभा करण्यात आला होता. १९९८ साली शेकापचे रामशेठ ठाकूर यांच्या विरोधात अन्य राम ठाकूर उभे केले गेले. वारंवार लोकसभा निवडणूक लढविणाऱ्या शेकापने २००४ साली बॅ. अंतुले यांच्या विरोधात ए. आर. अंतुले नावाचा उमेदवार उभा केला होता. मागील लोकसभा निवडणुकीतही मावळमधून लक्ष्मण जगताप, श्रीरंग बारणे; तर रायगडमध्ये सुनील श्याम तटकरे असे नामसाध्यर्म्य असलेले उमेदवार रिंगणात उभे केले होते.

### नामसाधर्म्याची खेळी फोल

२०१४ च्या लोकसभा निवडणुकीत रायगड मतदारसंघात सुनील तटकरे याच्या विरोधात सुनील श्याम तटकरे नावाचा उमेदवार रिंगणात होता. २०१९च्या लोकसभा निवडणुकीत शिवसेनेचे अनंत गीते, काँग्रेस आघाडीचे सुनील तटकरे निवडणूक लढवत होते. अनंत गीते यांचे नामसाध्यर्म्य असलेल्या उमेदवाराचा अर्ज छाननीत बाद झाला; परंतु सुनील तटकरे यांचे नाम साधर्म्य असलेले सुनील पांडुरंग तटकरे व सुनील

### अनंत गीतेंच्या विरोधात तीन गीते

इंडिया आघाडीचे अधिकृत उमेदवार अनंत गंगाराम गीते यांनी आज आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. त्याच वेळेस नावात साधर्म्य असलेल्या तीन अनंत गीते यांनी आपला उमेदवारी अर्ज भरला आहे. २०१९ च्या निवडणुकीत सुनील तटकरेंच्या विरोधात सुनील सखाराम तटकरे आणि सुनील पांडुरंग तटकरे या अपक्ष उमेदवारांनी निवडणूक लढवली होती. या दोघांनी अनुक्रमे ९७५२ आणि ४१२६ मते मिळवली होती, याचा फटका राष्ट्रवादीचे अधिकृत उमेदवार सुनील दत्तात्रय तटकरे यांना बसला होता.



# पनवेलमध्ये भाजप-मनसेला झटका

। पनवेल । प्रतिनिधी ।

शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी भाजप आणि मनसेला मोठा झटका दिला आहे. पनवेलमध्ये भाजपच्या ४ माजी नगरसेवकांनी आणि मनसेच्या ४ पदाधिकाऱ्यांनी ठाकरे गटात उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत सर्वांचा पक्षप्रवेशाचा कार्यक्रम पार पडला. या पक्षप्रवेशानंतर ठाकरेंनी एकत्रित पत्रकार परिषद घेऊन याबाबत घोषणा केली. ठाकरेंनी यावेळी सिडकोकडून वसूल केल्या जाणाऱ्या मालमत्ता करावर भूमिका मांडली. निवडणुका जसजशा जवळ येत आहेत तसे केंद्र सरकार बदलण्याच्या जिद्दीने मावळे येत आहेत. संख्या वाढत आहे. या सर्वांचे स्वागत आहे. ही टीम पनवेलमधील आहे. संजोग वाघेरे यांच्या मावळ मतदारसंघातील आहे. यांचा प्रवेश होत असताना काही गोष्टी आवर्जून सांगायच्या आहेत. निवडणुकीच्या तोंडावर जाहीरनामे जाहीर करतात. अशक्यप्राय गोष्टी आम्ही करू सांगत असतात. ते सांगतात मूळचे प्रश्न दूर राहतात. शिवसेनेत आल्यानंतर त्यांच्या ज्या काही व्यथा आहेत, त्या त्यांच्या एकट्याच्या नाहीत. तिथले जे काही प्रश्न आहेत. त्यावर आंदोलन झाले आहेत. अजूनही सुरू आहे, असं ठाकरे म्हणाले.

### ‘पनवेलमधून आम्हाला नवीन ताकद’

‘पनवेलमधून आम्हालो नवीन ताकद मिळाली आहे. आता पनवेलमध्ये आम्ही चार पावलं पुढे जाऊ’, असं उद्धव ठाकरे म्हणाले. तसेच २०१४ आणि २०१९लाही भाजपने जाहीरनामे प्रसिद्ध केले होते. ते जाहीरनामे प्रसिद्ध करत राहतील. पण आता ते सत्तेत येणार नाही. त्यांना काहीही बोलण्याचा अधिकार आहे असे मावळ व रायगड लोकसभा निवडणूक २०२४ च्या पार्श्वभूमीवर रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीची बैठक व पत्रकार परिषद मंगळवारी (दि. १६) शेलघर येथील जोमा घरत सामाजिक संस्थेच्या सभागृहात जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती.
यावेळी व्यासपीठावर रायगड जिल्हा महिला काँग्रेस अध्यक्षा ॲड. श्रद्धा ठाकूर, जिल्हा उपाध्यक्ष मिलिंद पाडगावकर, उरण तालुकाध्यक्ष विनोद म्हात्रे, पनवेल तालुकाध्यक्ष नंदराज मुंगाजी, डॉ. मनीष पाटील, किरीट पाटील, अखलाख शिलोत्री, मार्तंड नाखवा, रेखा घरत, वैभव पाटील आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### विषमतेविरोधात आवाज उठवला पाहिजे

‘पलवा सिटीला’ मात्र करमुक्ती केली आहे. ही विषमता आहे. त्याविरोधात आवाज उठवला जात आहे. मुंबई महापालिकेची २०१७ ची निवडणूक लढवताना ५०० स्क्वेअरफूटापर्यंतच्या मालमत्ता कर रद्द करू, असे सांगितले होते ते केले. राज्यात आणि केंद्रात आमचे सरकार आल्यावर पनवेलमधील कर रद्द करू. कारण नसताना डबल कर भरण्यास आमचा विरोध आहे. वसुली सरकारचा हा विचित्र प्रकार आम्ही थांबवू, असा इशारा उद्धव ठाकरे यांनी दिला.

# ‘मविआच्या उमेदवारांना विजयी करा’

। चिरनेर । प्रतिनिधी ।

हुकूमशाही पद्धतीच्या राजवटीला उलथून टाकण्यासाठी महाविकास आघाडीच्या उमेदवारांना विजयी करा, असे आवाहन रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष महेंद्र घरत यांनी कार्यकर्त्यांना केले.


काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांचे आवाहन

मावळ व रायगड लोकसभा निवडणूक २०२४ च्या प्रचारा संदर्भात काँग्रेसच्या कार्यकर्त्यांची बैठक व पत्रकार परिषद मंगळवारी (दि.१६) शेलघर, उरण येथील समाज मंदिर हॉलमध्ये घेण्यात आली होती. त्यावेळी महेंद्र घरत बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर मिलिंद पाडगावकर, विनोद म्हात्रे, नंदराज मुंगाजी, श्रद्धा ठाकूर, रेखा घरत तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.

यापुढे बोलताना ते म्हणाले की, देशामध्ये मोदी सरकार विरोधात प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. ही निवडणूक हुकूमशाही विरुद्ध लोकशाही आणि संविधान वाचविण्यासाठी आहे. हे सर्वसामान्य जनतेच्या लक्षात आले आहे. त्यामुळे या निवडणुकीत त्यांना त्यांची जागा जनताच दाखवील, असा विश्वासही महेंद्र घरत यांनी व्यक्त केला.

राज्यात असलेल्या गलिच्छ राजकारणा विरोधात ही लढाई आहे. देशात सुरू असलेली हुकूमशाही रोखण्यासाठी या निवडणुकीला आपण सामोरे जात आहोत. महागाई, बेरोजगारीमुळे येथील जनतेच्या जीवन-मरणाचा प्रश्न निर्माण झाला आहे. ही निवडणूक म्हणजे जनतेच्या अस्तित्वाची लढाई आहे. यासाठी इंडिया आघाडीचे हात मजबूत करा. देशामध्ये शंभर टक्के बदल होईल, असेही ते म्हणाले.

देशातील जनता मोदी सरकार हटविण्यासाठी आता सज्ज झाली आहे. त्यामुळे या निवडणुकीत भाजपप्रणित महायुतीचा पराभव घडवून आणण्यासाठी कार्यकर्त्यांनी निष्ठेने कामाला लागावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. तसेच पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांनाही त्यांनी साजेशी उत्तरे देऊन पत्रकारांच्या शंकांचे निरसन केले.

# बारणेंवर वाघेरेंचा घणाघात

। मावळ । प्रतिनिधी ।

मावळ लोकसभेच्या मतदारसंघात महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे आणि महाविकास आघाडीचे उमेदवार संजय वाघेरे यांच्यात आरोप प्रत्यारोपचा कलगीतुरा रंगला आहे. माझ्या विरोधात कोण उमेदवार आहे, हे मला माहीत नाही, असे विधान श्रीरंग बारणे यांनी केल्यानंतर संजोग वाघेरे यांनी देखील बारणे यांना रावणाची उपमा देत त्यांचा अहंकाराचा मतदारच अंत करतील अशी जहरी टीका केली आहे.



महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे हे प्रसारमाध्यमांशी बोलत होते.मावळ लोकसभा मतदारसंघात सध्या महाविकास आघाडी आणि महायुतीचा जोरदार प्रचार सुरू आहे. दोन्ही उमेदवार एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करत आहेत. नुकतीच महायुतीची पत्रकार परिषद पार पडली. या पत्रकार परिषदेत घटक पक्षाचे शहराध्यक्ष आणि पदाधिकारी उपस्थित होते. पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना बारणे यांनी माझ्या विरोधात कोण उमेदवार आहे. हे मला माहीत नाही, असं विधान करत उमेदवारी अर्ज भरल्यानंतरच मला उमेदवार कळेल असे वक्तव्य केले होते. यावरूनच महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे यांनी बारणे यांच्यावर जहरी टीका केली आहे.

श्रीरंग बारणे यांचे विधान हे बालिशपणाचे असून १९८७ पासून मी राजकारणात आणि समाजकारणात कार्यरत आहे. आम्ही दोघेही एकाच मतदारसंघात राहात आहोत, तरी ते मला ओळखत नसतील तर तो त्यांचा अहंकार आहे. वाघेरे यांनी रावणाचे उदाहरण देत रावणाचादेखील अहंकार जळून खाक झाला होता. रावणाची लंका शेवटी जळाली होती हे बारणेंनी विसरू नये. त्याचप्रमाणे बारणेंचा अहंकाराचा मतदार अंत करतील, असा विश्वास वाघेरे यांनी व्यक्त केला.

# मताधिक्य वाढविण्यासाठी महाजने शाळेचा पुढाकार

प्रमोद जाधव
। अलिबाग ।

- जिल्हाधिकाऱ्यांच्या आवाहनाला उत्स्फुर्त प्रतिसाद
- रॅलीच्या माध्यमातून गावांमध्ये मतदान जनजागृती

जिल्हाधिकारी यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत अलिबाग तालुक्यातील महाजने येथील रायगड जिल्हा परिषद शाळेने मताधिक्य वाढविण्यासाठी पुढाकार घेतला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधत गावामध्ये मतदान जनजागृती म्हणून गावामध्ये रॅलीचे आयोजन करण्यात आले.

रायगड लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रशासकिय यंत्रणा कामाला लागली आहे. येत्या ७ मे रोजी मतदान होणार आहे. रायगडचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे यांनी मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी वेगवेगळ्या यंत्रणेला आवाहन केले. त्यांच्या आवाहनाला जिल्ह्यातून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. जिल्ह्यात गावे, वाड्यांमध्ये जाऊन मतदारांशी संपर्क साधून मतदानाचे महत्व पटवून देण्याचे काम केले जात आहे.



अलिबाग तालुक्यातील महाजने येथील रायगड जिल्हा परिषद शाळेनेदेखील मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी पुढाकार घेतल्याचे दिसून आले. भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून गावामध्ये जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले.

सुरुवातीला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून त्यांना अभिवादन करण्यात आले. त्यानंतर गावातून मतदान जनजागृती रॅली काढण्यात आली. मतदानासाठी वेळ काढा आपली जबाबदारी पार पाडा, आद्य कर्तव्य भारतीयांचे पवित्र कार्य मतदानाचे अशा घोषणा देण्यात आल्या. रॅलीमध्ये शाळेतील मुले मोठ्या संख्येने सहभागी झाले.

यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष समीर पाटील, शिक्षण तज्ञ विठोबा खानावकर, मुख्याध्यापक सुशीला सांदणकर, शिक्षक जनार्दन शेळके, अंतरा पारंगे, प्रतिक्षा पाटील तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

महाजने येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये राबविलेल्या या उपक्रमाचे वेगवेगळ्या विभागाकडून कौतुक करण्यात आले.

# फसवणूकनामा

भाजपने आपला निवडणूक जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. गेल्या वेळी भाजपने पहिल्या फेरीचे मतदान सुरू झाल्यावर जाहीरनामा जारी केला होता. जाहीरनामा नावाच्या गोष्टीला भाजप किती किंमत देतो हे यावरून स्पष्ट व्हावे. यंदा तो पाच दिवस आधी आला. मतदानाच्या किमान ४८ तास आधी तो प्रसिध्द केला जायला हवा असे निवडणूक आयोगाचेच आदेश असल्याने भाजपचा बहुदा नाईलाज झाला असावा. यंदाच्या त्याच्या जाहीरनाम्यामध्ये भरमसाठ नवी आश्वासने देण्याचे टाळले आहे हे खरे. पण शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करू अशासारख्या पूर्वीच्या आश्वासनांचे काय झाले याचा हिशेबही देण्यात आलेला नाही. त्या अर्थाने हा सर्व फसवणूकनामाच आहे. देशात सध्या बेकारीचा प्रश्न तीव्र झालेला आहे. २० ते ३० वयोगटातल्या लोकांमध्ये बेकारीचे प्रमाण प्रचंड आहे असे आंतरराष्ट्रीय मजूर संघटनेच्या अहवालात म्हटले आहे. लोकनीतीच्या सर्वेक्षणातही लोकांना सर्वाधिक भेडसावणारा प्रश्न हा बेकारीचाच असल्याचे स्पष्ट झाले आहे. पण भाजपने याबाबत काहीही ठोस भाष्य केलेले नाही. इंजिनिअरिंगपासून इलेक्ट्रॉनिकपर्यंत सर्व प्रकारच्या वस्तूंचे उत्पादन आणि तमाम सर्व प्रकारच्या सेवा याबाबतच्या कंपन्या भारतात सुरू होतील व जगाला वस्तू व सेवांचा पुरवठा करतील असे स्वप्न यात रेखाटण्यात आले आहे. त्यामुळे साहजिकच या सर्व क्षेत्रांमध्ये प्रचंड नोकऱ्या व रोजगार तयार होतील असा दावा करण्यात आला आहे. प्लास्टिकच्या प्लेट्सपासून ते मोटारीपर्यंत आणि बुटांपासून ते आकाशातील उपग्रहांपर्यंत अगणित प्रकारच्या वस्तू सध्या चीनमध्ये तयार होतात. त्याच धर्तीवर येथील विकास करण्याचे हे स्वप्न आहे. मात्र त्यासाठी येथे पुरेशा सुविधा हव्यात. शिवाय, येथील तरुणांमध्ये त्या प्रकारची कौशल्येही असायला हवीत. दुर्दैवाने हे दोन्ही आपल्याकडे नाही. आपले शाळाकॉलेजचे शिक्षण हे कोणत्याही नोकऱ्या वा व्यवसायांसाठी पूर्णपणे निरुपयोगी आहे. ते बदलण्यासाठी काय करणार याचा कोणताही खुलासा या जाहीरनाम्यात नाही.

### वडापावचा रोजगार

शिवाय, अशा कंपन्या आपल्याकडे उभ्या राहतील हे एक स्वप्न आहे. त्याला किती वर्षे लागतील व त्यातून नेमके किती रोजगार मिळतील याचा कोणताही उल्लेख यात नाही. २०१४ मध्ये दरवर्षी एक की दोन कोटी रोजगार देऊ असे आश्वासन भाजपने दिले होते. त्यानंतर हा आकडा दहा लाखांवर आणण्यात आला होता. पण नंतर त्यातही लबाडी करण्यास सुरुवात झाली. नोकऱ्या मिळत नसल्याने तरुणांनी वडापावच्या गाड्या टाकल्या तरीही ते रोजगार जणू आपणच निर्माण केले असा दावा भाजपवाले करू लागले. २०१७ मध्ये झी टीव्हीला दिलेल्या मुलाखतीत खुद्द पंतप्रधानांनी तसे सांगितले होते. पकोड्याच्या गाड्या लावण्यातूनही बराच रोजगार निर्माण होतो असे तर्कशास्त्र त्यांनी शोधून काढले होते. जेव्हा इंजिनिअरिंगचा डिप्लोमा केलेला किंवा पदवीचे शिक्षण घेतलेला तरुण असल्या गाड्या टाकतो तेव्हा त्याला इंग्रजीत अंडरएम्प्लॉयमेंट असे म्हणतात. म्हणजे त्याच्या कौशल्यांना व त्यासाठी झालेल्या खर्चाला न्याय मिळेल असा रोजगार त्याला मिळत नाही. असे रोजगार निर्माण करून अर्थव्यवस्था वाढत नसते. पोळी-भाजी किंवा पापड-चकल्या तयार करण्यातून हजारोंना रोजगार मिळतो आणि समाजाची मोठी गरज भागते हे खरे आहे. पण अर्थव्यवस्था वाढण्यासाठी असे रोजगार फार उपयोगी पडत नसतात. मोदींच्या जाहीरनाम्यात यासाठी शब्दांचे नुसते बुडबुडे आहेत. शेती क्षेत्राबाबतही हेच आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे आश्वासन पाच वर्षांपूर्वी देण्यात आले होते. आत्महत्या रोखल्या जाणार होत्या. यातले काहीही घडलेले नाही. उलट कांदा, सोयाबीन, तांदुळ (धान), गहू इत्यादींचे भाव पाडून शेतकऱ्यांना नफा मिळू नये असा बंदोबस्त मोदी सरकारने केल्याचे वारंवार दिसले आहे. किमान हमी भाव वाढवण्याचे आश्वासन जाहीरनाम्यात आहे. पण हे भाव निरर्थक होतील अशा रीतीने नवीन कायदे आणण्याचा प्रयत्न याच मोदी सरकारने केला होता.

### मतलबी, मानभावी

त्याला विरोध करणाऱ्या शेतकऱ्यांना खलिस्तानी ठरवून त्यांच्या मार्गात खिळे ठोकण्यात आले होते. त्यांच्यावर बुलडोझर आणि अश्रूधूर यांचा वापर केला गेला होता. गरिबांना दरमहा पाच किलो धान्य फुकट देण्याची योजना आणखी पाच वर्षे चालू ठेवण्याचा संकल्प या जाहीरनाम्यात आहे. पण त्यात नवीन काही नाही. घरबांधणीसारख्या सरकारी योजनांनाही इथे आश्वासने म्हणून कोंबले आहे. काळा पैसा देशात परत आणू आणि भ्रष्टाचार समूळ नष्ट करू अशी आश्वासने भाजपने दहा वर्षांपूर्वी दिले होती. त्यांचे काय झाले याचा खुलासाही या संकल्पपत्रात सापडत नाही. निवडणूक रोख्यांमध्ये हजारो कोटींचा भ्रष्टाचार झाला आहे. पण मोदी अजूनही त्याबाबतच्या आरोपांना उत्तरे देत नाहीत. एएनआयला दिलेल्या मुलाखतीत पुन्हा एकवार ते बोलले आहेत. रोखे योजना होती म्हणून देणग्या कोठून आल्या हे अधिकृतपणे कळले तरी असा दावा पुन्हा एकवार त्यांनी केला आहे. यातला मोदींचा खोटारडेपणा पूर्वीही दाखवून झालेला आहे. एक म्हणजे या रोख्यांमध्ये ज्या उद्योगपतींनी देणग्या दिल्या त्यांची नावे जाहीर होऊ नयेत म्हणून मोदी सरकारने आटोकाट प्रयत्न केला. जनतेला या देणगीदारांची नावे माहिती होण्याची काय गरज आहे असा सवाल सरकारी वकिलांनी केला. न्यायालयाच्या दणक्यामुळे ही माहिती उघड करावी लागली. नंतर भाजपने इडीच्या धमक्यांचा वापर करून हजारो कोटी रुपयांच्या देणग्या मिळवल्या असाव्यात असे दाखवणारे पुरावे समोर आले. केजरीवाल प्रकरणात तुरुंगात असलेल्या शरद रेड्डीने भाजपला ५५ कोटींची देणगी दिल्यावर त्याची सुटका झाली व त्याला माफीचा साक्षीदार करण्यात आले हे उघड झाले आहे. पण मोदी त्याविषयी चकार शब्द बोलायला तयार नाहीत. उलट आता ही योजना बंद झाल्यामुळे अधिक काळा पैसा निवडणुकीत येईल अशी धमकी ते देतात. असल्या मतलबी आणि मानभावी नेत्याकडून आणि त्याच्या पक्षाकडून प्रामाणिक संकल्पांची अपेक्षा करणे हे मूर्खपणाचेच आहे, याचा आणखी एक पुरावा म्हणजे भाजपचा यंदाचा जाहीरनामा आहे.

**विचार**

# रामाच्या आदर्शांचे पालन करूया

**रामनवमीच्या यंदाच्या उत्सवाला रामजन्मभूमीवर अतिशय देखणे मंदिर उभे राहण्याची आणि रामलल्ला आपल्या मूळ स्थानी विराजमान झाल्याच्या मंगलमय प्रसंगाची पार्श्वभूमी आहे. राम भारताच्या मातीमध्ये सामावलेला आहेच, पण अलिकडच्या घटनेने मातीतील माणसांना हरवलेल्या अस्मितेचेही दर्शन घडवले आणि अनोख्या पद्धतीने दिवाळी साजरी झाली. रामनवमीच्या निमित्ताने आणखी एक दीप प्रज्वलित होत आहे.**



**उर्मिला राजोपाध्ये**

अलिकडेच देशाने दिवाळी नसतानाही दिवाळी साजरी केली. रामजन्मभूमीचा प्रश्न कायमचा मार्गी लागला आणि रामलल्लाला आपल्या मूळ स्थानी सन्मानपूर्वक प्रतिष्ठापित करण्याचे अनेक वर्षांचे आणि अनेक पिढ्यांनी पाहिलेले स्वप्न साकार झाले. तेव्हापासून सुरू झालेला रामनामाचा गजर थांबलेला नाही आणि थांबणारही नाही. श्रीराम नवमीच्या निमित्ताने रामजप उच्चारवात सुरू आहे.

रामाने आपल्या संपूर्ण जीवितकार्यात कळीकाळाला पुरुन उरतील, अशी तत्वे स्थापित केली. आपल्या आचरणातून अनेक सिद्धांत मांडले. आदर्शांचे अनेक मापदंड या देवतेच्या प्रत्येक कृतीतून दिसतात. म्हणूनच भारतीय समाज अन्नाप्रमाणेच या मौलिक विचारांवर वाढला आणि पोसला आहे असेही आपण म्हणू शकतो. प्रत्येक नातेसंबंधांमधली गुंफण म्हटली तर किती जटील आणि म्हटली तर किती सोपी असते, हे रामचरित्रामध्ये स्पष्टपणे दिसते. स्वत: वनवास भोगूनही दुसऱ्याच्या मदतीसाठी सज्ज असणारा, स्वत: दु:ख, पत्नी आणि अपत्यांचा वियोग सहन करुन जनतेच्या मनातील शंका मिटवणारा, पराजय राहून प्रजेला आश्वस्त करणारा हा राजा आजही समाजाच्या मनात अढळस्थान राखून आहे. म्हणूनच त्याने सांगितलेल्या आदर्शांचे पालन करण्याचा नियम करत उत्साहाने रामनवमी साजरी करु या.

दरवर्षी रामजन्माचा सोहळा म्हणजे आनंदाचा बहर असतो. मंदिरांमध्ये, घराघरांतून दुपारी बरोबर बारा वाजता रामजन्माचा सोहळा आनंदात पार पडतो. तो फारच प्रेक्षणीय असतो. विशेषत: स्त्रीवर्गात उत्साहाला उधाण आलेले असते. रंगीत भरजरी साड्या नेसून, आभूषणे मिरवत, केसांमध्ये गजरे माळलेल्या सर्व वयोगटातल्या स्त्रिया रामजन्माचा सोहळा मोठ्या थाटामाटात साजरा करतात. देवळात मध्यभागी रंगीत पाळणा सुवासिक, रंगीबेरंगी फुलांनी सजवलेला असतो. त्याची दोरीसुद्धा फुलांनी, झिरमिळ्यांनी वेढलेली असते. देवळातल्या रंगीबेरंगी पताका आणि खांबावर सोडलेल्या फुलांच्या माळांमुळे देवळातील मंगल वातावरणात भर पडते. बहुतेक ठिकाणी रामजन्माच्या तास, दोन तास आधी प्रभू रामचंद्रावर कीर्तन सुरू होते. त्यासोबत कौसल्या मातेच्या डोहाळ्यांवरची मधुर गाणी गायली जातात. रामजन्माची वेळ झाली की दुपारी बारा वाजता, देवळात सजवलेल्या पाळण्यात प्रभू रामचंद्रांची मूर्ती ठेवली जाते. पाळण्याची दोरी हलक्या हातांनी मागे-पुढे करत, झोके देत रामजन्माची गाणी म्हणतात! 'राम जन्मला गं सखी, राम जन्मला' हे रामजन्माचे गाणे अत्यंत लोकप्रिय आहे. प्रत्येक ठिकाणी मंदिरांमधून हे गाणे मोठ्या आवाजात लावले जाते. त्यातील आनंदाच्या वात्सल्यपूर्ण भावना आणि मंदिरातल्या पाळण्याची दोरी हलवणाऱ्या सुवासिनी यांचा दृश्य मेळ पाहणाऱ्याच्या मनात आनंदलहरी उठवून जातो. खरेच परमेश्वररुपी राम माणसात जन्माला आला आहे की काय, असा मंगलमय भास होतो. त्यावेळी त्या सुखाचा अनुभव प्रत्येक भाविक घेत असतो. म्हणून आजही राम जन्माच्या सोहळ्याची पूर्वापार आवड उत्सवाच्या निमित्ताने जोपासली जाते.

रामजन्मानंतर मोठ्या आनंदात उपस्थितांना प्रसाद म्हणून सुंठवडा आणि साखरफुटाणे वाटले जातात. विविध सण वेगवेगळ्या प्रकारे, आनंद घेत साजरा करण्याची समृद्ध परंपरा भारताइतकी कुठेही नसेल. प्रत्येक देवदेवतेचा सण वेगवेगळ्या पद्धतीने साजरा होतो. प्रभू रामचंद्रांबद्दल भारतीयांना अमर्याद आत्मियता आहे. याचे मूळ कारण म्हणजे प्रत्येकाला चराचराचा कारभार निर्वेध चालावा असे वाटत असते. किंबहुना, तशी प्रत्येक सजीवाची इच्छा असते. जगात सर्व काही छान चालावे, आदर्शवाद समोर ठेवून जगरहाटी पुढे चालावी, सर्वांच्या पदरात न्यायाचे सारखेच दान पडावे आणि त्यासाठी संरक्षण देणारा दयाळू आणि प्रेमळ राजा असावा, अशी आशा सर्वसामान्यांना असते. असा एक राजा एके काळी अस्तित्वात होता, असे रामायणातल्या कथांमधून, ग्रंथांमधून स्पष्ट झाले आणि प्रत्येक माणूस त्या राजापुढे मनोमन नतमस्तक झाला. त्याच्या चरणस्पर्शासाठी अधीर झाला. अयोध्येचा राजा प्रभू रामचंद्र प्रत्येक भारतीयाच्या हृदयसिंहासनावर कायमचा आरुढ झाला.

काय नव्हते या अलौकिक शक्तीशाली राजाच्या व्यक्तिमत्त्वामध्ये? त्रेतायुगामध्ये कौसल्या राणीच्या पोटी जन्मलेला हा पुत्र महापराक्रमी होता. वसिष्ठ ऋषींच्या आश्रमातल्या यज्ञात अडथळा आणू पाहणाऱ्या राक्षसांचा त्याने कुमारवयात असतानाच संहार केला. त्याच वेळी प्रभू रामचंद्रांच्या पराक्रमी गुणाची ग्वाही पिता दशरथ राजाला मिळाली होती. वास्तविक, प्रभू रामचंद्र हा दशावतारांमधला पाचवा अवतार मानला जातो. पृथ्वीवर एखाद्या दुष्ट शक्तीचे अराजक माजले तर ईश्वर वेगवेगळ्या रूपात अवतार घेऊन दुष्टांचा विनाश करतो. तसेच प्रभू रामचंद्रांनीही लंकेचा उन्मत्त राजा असलेल्या रावणाचा संहार करण्यासाठी जन्म घेतला, अशी कथा सर्वश्रुत आहे. मुलावरील अपार विश्वासापोटी दशरथाने राज्यकारभार प्रभू रामचंद्रांवर सोपवला होता. पण त्याच जनतेने त्यांची प्राणप्रिय पत्नी सीतामाईच्या चारित्र्याला बोल लावले तेव्हा तो जनतेवर किंचितही रागावला नाही; उलट, जनतेच्या मनातील न्यायदानाची भावना सुरक्षित रहावी यासाठी त्याने प्रिय पत्नीचाही त्याग केला! जनतेसाठी स्वत:च्या सुखाचा त्याग करणारा दुसरा राजा पुराणात नाही. एक माणूस म्हणून जन्माला आल्यावर या ईश्वराने माणसाच्या आदर्शवादाच्या मर्यादा प्रसंगी जीवाचे, सर्व सुखांचे मोल देऊन सांभाळल्या. म्हणून माणसातल्या या सर्वोत्तम पुरुषाला 'मर्यादा पुरुषोत्तम' हा सन्मान मिळाला.

हा राजा इतका गुणी असूनही संसारसुखापासून वंचित राहिला. पत्नीविरहाचे दु:ख त्याने अबोलपणे सहन केले. ज्योतिष विद्येच्या दृष्टीने म्हणतात की प्रभू रामचंद्रांच्या जन्माच्या वेळी सूर्य मेष राशीत नवव्या स्थानावर असल्यामुळे प्रभू रामचंद्रांना गृहसौख्य मिळाले नाही. सूर्य दहाव्या स्थानात असता तर रामाला हे सुख मिळाले असते, असा एकवचनी, एकपत्नी आणि एकबाणी राम अत्यंत लोकप्रिय असूनही त्याला वनवासात जावे लागले. माता कैकयी सावत्र असूनही तिच्या एका शब्दाच्या आदेशानुसार त्याने तत्क्षणी वनवासाची वाट धरली. त्यावेळीही त्याने कैकयी मातेला किंचितही दूषण न देता पित्याची समजूत काढली. प्रत्येक वेळी रामाच्या चरित्रात ही गोष्ट प्रकर्षाने जाणवते की स्वत:च्या दुर्दैवी आयुष्याबद्दल त्याने कधीही कोणालाही बोल लावले नाहीत; उलट, स्वत:चे प्रारब्ध समजून प्राप्त परिस्थितीचा आनंदाने स्वीकार केला. विशाल मनाची अन् सहनशीलतेची दिव्य प्रतिमाच जणू ती!

आजची सामाजिक परिस्थिती लक्षात घेता रामचरित्राच्या अभ्यासाची गरज प्रकर्षाने जाणवते. आज चौकटीत अडकणाऱ्या तरुणाईला तत्त्वनिष्ठ रामाच्या आयुष्याचा आदर्श पुढे ठेवण्याची आवश्यकता आहे. जवळ संपत्ती असली की नशेच्या आहारी जाऊन, माता-पित्यांना बदनाम करणाऱ्या तरुणांना प्रभू रामचंद्रांच्या माता-पित्यांप्रती प्रेमाचे उदाहरण द्यायला हवे. आपल्या व्यसनाधिन आयुष्याने आई-वडिलांना चिंतेत टाकणाऱ्या या पिढीला, माता कैकयीच्या एका आज्ञेखातर वनवासात जाणाऱ्या रामाची गोष्ट सांगायला हवी. आई-वडिलांची आज्ञा पाळणे हे मुलांचे कर्तव्य, त्यांचा शब्द मोडणे म्हणजे पाप हे समजून घ्यायला हवे. कारण आई-वडील सांगतात ते हिताचेच असते, याचा प्रत्यय आल्याशिवाय रहात नाही! म्हणतात ना, कैकयीला रामाला वनवासात पाठवण्याची बुद्धी का झाली? तर त्यानंतर वनवासातील सीताहरणाची घटना घडून त्या निमित्ताने रावणाचा विनाश व्हावा, असा ईश्वरी संकेत होता. हे नाट्य ईश्वराने घडवलं.

रामकथेतील बंधूप्रेमाच्या कहाणीचा गोडवाही अवीट आहे. भरताला राज्यभिषेकाचा आग्रह करून, प्रभू रामचंद्रांनी भावंडावर किती प्रेम करावे याचा दाखलाच दिला आहे. आज संपत्तीच्या वाटणीवरून भावाभावांमध्ये दुरावा निर्माण झालेला दिसतो. कित्येकदा तर मारामाऱ्या, खुनापर्यंत मजल जाते. अशा वेळी रामायणातल्या बंधूप्रेमाचा आदर्श स्वीकारण्यात आपण कितपत यशस्वी झालो, असा प्रश्न पडतो. रामायणासारखे आदर्शवादी ग्रंथ पूजनीय म्हणून केवळ डोक्याला लावून नमस्कार करणे पुरेसे नाही. त्यातला आदर्शवाद प्रत्यक्षात आणणे हीच त्या ग्रंथाची खरी पूजा ठरेल. अशा आदर्शवादाची आठवण ठेवण्यासाठीच साजरा करावा हा रामनवमीचा उत्सव ! आधी उल्लेख केल्याप्रमाणे यंदा तर प्रभू रामचंद्र आपल्या मूळ स्थानी विराजमान झाले आहेत! त्या भव्य मंदिराचा लौकिक देश-विदेशामध्ये पोहोचत आहे. भक्तगण मोठ्या संख्येने आपल्या प्रिय देवतेच्या दर्शनासाठी गर्दी करत आहेत. सावळा रामचंद्र त्यांना सुहास्य वदनाने दर्शन देत आहे. खरे सांगायचे तर या घटनेने रामलल्लाला आपले स्थान मिळाले आहेच, पण त्याचबरोबर देशाला आपली हरवलेली अस्मिताही गवसली आहे. त्यामुळेच यंदाची रामनवमी अस्मिताजतनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण म्हणायला हवी.

**आजकाल**

# चंद्रपूर जिंकण्यासाठी काँग्रेसची जय्यत तयारी

गेल्या वेळी राज्यात काँग्रेसने एकमेव जिंकलेला चंद्रपूर लोकसभा मतदारसंघ जिंकण्यासाठी भाजपने सारी ताकद पणाला लावली आहे. यासाठीच भाजपने वनेमंत्री सुधीर मुनगंटीवार यांना रिंगणात उतरविले आहे. काँग्रेसने दिवंगत खासदार बाळू धानोकर यांच्या पत्नी व आमदार प्रतिभा धानोरकर यांना उमेदवारी देऊन सहानुभूती तसेच कुणबी समाजाच्या मतांचे ध्रुवीकरण करण्यावर भर दिला आहे.

तिसरा प्रभावी उमेदवार रिंगणात नसल्याने प्रथमच काँग्रेसचा बालेकिल्ला चंद्रपूर-वणी-आर्णी लोकसभा मतदारसंघात महायुतीचे उमेदवार व राज्याचे वन व सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार व महाविकास आघाडीच्या उमेदवार व आमदार प्रतिभा धानोरकर यांच्यातील लढत चुरशीची ठरण्याची शक्यता आहे. काँग्रेसच्या ताब्यातील हा मतदारसंघ स्वत:कडे खेचून आणण्यासाठी भाजपने राज्याचे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या रूपात तगडा उमेदवार दिला आहे. काँग्रेसने दिवंगत धानोरकर यांच्या पत्नी प्रतिभा धानोरकर यांना रिंगणात उतरवले. या दोन प्रमुख उमेदवारांसह वंचित बहुजन आघाडीचे राजेश बेले व बसपचे राजेंद्र रामटेके यांच्यासह १५ उमेदवार रिंगणात आहेत. मात्र खरी लढत ही महायुतीचे मुनगंटीवार व महाआघाडीच्या धानोरकर यांच्यात आहे. लोकसभा क्षेत्रात चंद्रपूर, बल्लारपूर, राजुरा, वरोरा, वणी व आर्णी हे सहा विधानसभा मतदारसंघ येतात. यामध्ये बल्लारपूर, वणी व आर्णी या तीन मतदारसंघात भाजपचे तर राजुरा व वरोरा या दोन ठिकाणी काँग्रेसचे आमदार आहेत. चंद्रपुरात अपक्ष आमदार असून त्यांनी भाजपला पाठिंबा दिला आहे. भाजपसाठी हा मतदारसंघ प्रतिष्ठेचा आहे. यासाठीच मुनगंटीवार यांची इच्छा नसतानाही त्यांना लोकसभेच्या रिंगणात उतरविण्यात आले आहे. लोकसभेची उमेदवारी मिळू नये अशीच अपेक्षा मुनगंटीवार यांनी उमेदवारी जाहीर होण्याच्या आधल्या दिवसापर्यंत व्यक्त करीत होते.

काँग्रेसमध्ये प्रतिभा धानोरकर आणि विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांची कन्या शिवानी यांच्यात उमेदवारीवरून बराच संघर्ष झाला. शेवटी पक्षाने धानोरकर यांना संधी दिली. गेल्या वेळी वातावरण प्रतिकूल असतानाही बाळू धानोरकर हे विजयी झाले होते. प्रतिभा धानोरकर यांची मदार बहुसंख्य असलेल्या कुणबी समाजाच्या मतांवर आहे.. उमेदवारी अर्ज दाखल करताना काँग्रेसने शक्तिप्रदर्शन केले असले तरी पक्षांतर्गत धुसफूस शमली नाही. पक्षातील अनेक ज्येष्ठ नेते, माजी नगरसेवक, निष्ठावंत कार्यकर्ते अजूनही प्रचारापासून दूर आहेत. विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्यासह महाविकास आघाडीतील घटक पक्षाचे जिल्हाध्यक्ष, तालुकाध्यक्ष नाराज असल्याची चर्चा आघाडीच्या वर्तुळात आहे. भाजपचे सुधीर मुनगंटीवार यांनी जातीपातीच्या राजकारणापेक्षा त्यांनी केलेल्या विकास कामांच्या आधारावर मतदान करण्याचे आवाहन केले आहे. मंत्री म्हणून त्यांनी केलेली कामगिरीही उजवी आहे. याचा फायदा त्यांना होऊ शकतो. मतदारसंघात कुणबी समाजापाठोपाठ आदिवासी, तेली, माळी, मुस्लीम व दलित मतदारांची संख्या मोठी आहे. या शिवाय शिंपी, न्हावी, धोबी, भोई, वाणी, सुतार, सोनार तथा अन्य छोट्या समाज घटकांची मोट बांधण्याचेही प्रयत्न भाजपने सुरू केले आहेत. गुजराती, माहेश्वरी, जैन, सिंधी, मारवाडी, राजस्थानी तथा छत्तीसगडी हिंदी भाषिक समाज हा कायम भाजपच्या पाठीशी राहणारा आहे. पंतप्रधन नरेंद्र मोदी यांच्या जाहीर सभेनंतर भाजप नेते व माजी केंद्रीय राज्यमंत्री, मागासवर्गीय आयोगाचे राष्ट्रीय अध्यक्ष हंसराज अहीर, महायुतीला पाठिंबा देणारे अपक्ष आमदार किशोर जोरगेवार हे दोघेही मुनगंटीवारांच्या प्रचाराला लागले आहेत. मात्र जाहीर सभांमध्ये अहीर-जोरगेवार यांचा सहभाग वाढवावा लागणार आहे. एकूणच चंद्रपूरची लढत आता चुरशीच्या वळणावर गेली आहे. भाजपचे संघटनात्मक कौशल्य कशा पद्धतीने काम करते तसेच काँग्रेसचे निवडणूक व्यवस्थापन किती प्रभावी ठरते यावरच मुनगंटीवार व धानोरकर लढतीचे भवितव्य अवलंबून राहणार आहे. महायुतीचे उमेदवार सुधीर मुनगंटीवार यांच्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची नुकतीच मोरवा येथे जाहीर सभा झाली. सभेनंतरच भाजपच्या बाजूने तयार झालेले वातावरण मतदानाच्या दिवसापर्यंत टिकवून त्याचे मतांमध्ये रूपांतर करण्याचे भाजपचे प्रयत्न आहेत.

**लोकसंसद**

### ऑन ड्युटी पोलीस पुजारी वेशात!

उत्तर प्रदेशातील वाराणसी येथील काशी विश्वनाथ मंदिरामध्ये कर्तव्य बजावण्यासाठी पुजाऱ्याच्या वेशात भगवे कपडे परिधान केलेले पुरुष आणि महिला पोलीस तैनात करण्यात आल्यावरून वादाला तोंड फुटले आहे. या अनुषंगाने गर्भगृहात ऑन ड्युटी असताना भगवे धोतर, कुर्ता, अंगावरचे वस्त्र, गळ्यात रुद्राक्ष जपमाळ, कपाळावर भभूत आणि त्रिकुंड असा पेहराव केलेले पुरुष पोलीस आणि भगव्या रंगाच्या सलवार कमेझ आणि साडी अशा पोशाखातील महिला पोलिसांची छायाचित्रे प्रसारमाध्यमात आणि समाजमाध्यमात वायरल झाली आहेत. भाविकांना सुलभपणे दर्शन करता यावे यासाठी ही व्यवस्था करण्यात आल्याचे सांगण्यात आले. दक्षिण भारतातील पद्मनाभन स्वामी मंदिर, गुरुवायूर मंदिर अशा अनेक मंदिरात देखील ऑन ड्युटी पोलीस कर्मचाऱ्यांना भाविकांप्रमाणे वस्त्रसंहिता पाळावी लागत असल्याचे समजते. त्यामुळे काशी विश्वनाथ मंदिरामधील ऑन ड्युटी पोलीस कर्मचाऱ्यांची पुजाऱ्याच्या वेशातील छायाचित्रे ही काही नवीन गोष्ट नाही. मात्र एकवेळ मंदिरात भाविकांसाठी असलेली वस्त्रसंहिता समजू शकतो. परंतु मंदिरात ऑन ड्युटी पोलीस कर्मचाऱ्यांना पुजाऱ्याच्या वेशात तैनात करणे कितपत योग्य आहे? ते पोलिस नियमावलीत बसते का? हे खरे प्रश्न आहेत.

**- प्रदीप शंकर मोरे,** अंधेरी

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**सतरा एप्रिल**

**१८९१:-** कोशकार यशवंत रामकृष्ण दाते यांचा जन्म. केतकरांच्या ज्ञानकोशाचे काम सांभाळून 'विद्यासेवक' मासिकाचे संपादन त्यांनी केले. पुढे चिं.ग. वैद्य यांच्या सहकार्याने 'महाराष्ट्र शब्दकोश', 'सुलभ विश्वकोश', 'महाराष्ट्र वाक्यसंप्रदाय कोश' आणि 'शास्त्रीय परिभाषा कोश' त्यांनी परिश्रमपूर्वक तयार केले आहे. **१८९५:-** थोर स्वातंत्र्यसेनानी लेखक ग. स. तथा दादासाहेब अळतेकर यांचा जन्म. **१९०३:-** निसर्गकविता आणि शृंगारिक प्रेमकविताही लिहिणारे कवी, नाटककार शंकर बळवंत चव्हाण यांचा जन्म. 'किशोरी', 'भावलहरी', 'मधुमालती' हे काव्यसंग्रह त्यांच्या हयातीत प्रकाशित झाले. 'कुणाचं कोण?', 'इष्काची नशा' आदी दहा सामाजिक ऐतिहासिक नाटके त्यांच्या नावावर आहेत. **१९०४:-** कवी, कीर्तनकार वासुदेव शिवराम कोल्हटकर यांचा जन्म. कीर्तनाच्या निमित्ताने कोल्हटकरबुवांनी भरपूर काव्यलेखन केले. अंदाजे ३५ हजार पदे त्यांनी लिहिली. 'सुलभ कीर्तन संग्रह', 'कीर्तन मंदाकिनी', 'अभंग भागवत', 'योगवासिष्ठामृत' हे या पदांचे ग्रंथ असून 'अभंग भारत' लिहिणारे कोल्हटकर 'राष्ट्रीय कीर्तनकार' म्हणून ख्यातकीर्त होते. **१९१५:-** वृत्तपत्रकार, ग्रंथकार आणि महाभारताचे अभ्यासक दत्तात्रय गोपाळ लिमये यांचे निधन. 'भारतीय युध्द', 'सावित्री चरित्र', 'भारतीय स्त्रिया', 'शकुंतला व दमयंती', 'भारतीय उपकथा आणि शेक्सपिअरच्या 'मर्चंड ऑफ व्हेनिस' चे 'जशास तसे' या नावाने भाषांतर. 'भारतीय श्रेष्ठतव' हा त्यांचा सर्वश्रेष्ठ ग्रंथ. या ग्रंथातून लिमये यांनी 'भारतीय संस्कृती', 'नितिमत्ता', 'कुटूंब व्यवस्था', 'राजव्यवस्था', 'समाज', 'भाषा व लिपी' आदी विषयांचा उहापोह करुन भारतीय संस्कृती नि:संशयपणे पाश्चात्य संस्कृतीपेक्षा श्रेष्ठ असल्याचा निष्कर्ष काढला. **१९१९:-** बखरींचा मोठा संग्रह करुन त्यांतून निवडक 'जुन्या ऐतिहासिक गोष्टी' हे पुस्तक लिहिणारे आचार्य कृष्णाजी विष्णू कालगावकर यांचे निधन. त्यांनी स्वत:चे आत्मचरित्रही लिहिले. यातून त्यांनी आपल्या ऐतिहासिक कागदपत्रकांच्या संग्राहक वृत्तीशी जोपासना कशी झाली याचा आढावा घेतला. याशिवाय काव्येतिहाससंग्रह, विविधज्ञानविस्तार आणि शालापत्रक यातून त्यांचे बरेच लेख प्रसिध्द झाले. **१९२९:-** लेखक बाळ पुट्टेवार यांचा जन्म. 'राष्ट्रीय गीतमाला' हा गीतसंग्रह त्यांच्या नावावर आहे. **१९३०:-** राजकीय विषयांवर लेखन करणारे प्रा. गोविंद वासुदेव आंबेकर यांचा जन्म. ह्यांनी आग्नेय आशियातील राजकीय घटनांचा आढावा 'आग्नेय आशियातील घडामोडी' ह्या ग्रंथातून घेतला. **१९३१:-** लेखक, पेशाने ग्रंथपाल शिवराम अनंत तांबे यांचा जन्म. 'तालिकीकरण प्रात्याक्षिक' हा त्यांनी लिहिलेला ग्रंथ ग्रंथालय प्रशिक्षण परिक्षेसाठी अत्यंत उपयुक्त आहे. **१९३१:-** लेखक प्रा.डॉ.विश्वनाथ सीताराम जोशी यांचा जन्म. ह्यांनी 'जनता पक्ष-राजकारण व आर्थिक धोरण', 'पाश्चात्य राजकीय तत्त्वज्ञान', 'प्रमुख साम्यवादी व्यवस्था' आदी पुस्तक लिहिलीत. **१९४०:-** दूरदर्शन, आकाशवाणीसाठी लेखन करणारे नाट्यलेखक, नाट्यदिग्दर्शक विजय शांताराम मोंडकर यांचा जन्म. ह्यांच्या 'आणि एकदा गंमतच झाली आणि उत्तरार्थ', 'पाच एकांकिका', 'बंद दरवाजा', 'देव तारी त्याला' ह्या एकांकिकेसह 'उभयान्वय कापूस कोंड्याची गोष्ट' हे नाटक अशी साहित्य संपदा. **१९४७:-** आपल्या कादंबऱ्याने मराठी वाचकांना कादंबऱ्यांची गोडी लावणाऱ्या तात्या पांगळ यांचे निधन. जैन धर्माची स्थाने मिळवण्यासाठी त्यांनी भारतभर भटकंती केली आणि मग त्यातून साकारला 'श्रीमान गुणभद्राचार्य उत्तर पुराणाचे सुरस मराठी भाषांतर' आणि 'श्रीमान कुंदकुंदाचार्य यांचे चरित्र व जैनांचा ५०० संक्षिप्त इतिहास.' याशिवाय जैन लेखक कोठारींच्या मदतीने पुण्यात 'सरस वाङ्मयरत्नमाला' सुरु केली. या ग्रंथमालेतून पांगळांच्या अनेक कादंबऱ्या प्रसिध्द झाल्या. त्यात 'लाल गुलाब', 'साठ वर्षापूर्वी अर्थात १८५७ सालचे कानपूर येथील बंड', 'सुलतान रझिया' या ऐतिहासिक, 'नीरजा व भुताटकी', 'परकायाप्रवेश' या सामाजिक कादंबऱ्या प्रसिध्द झाल्या. याशिवाय हिंदी, इंग्रजी कादंबऱ्यांचे रुपांतरही त्यांनी केले. 'कट्टर राजनिष्ठ देशभक्त', 'राठोड दुर्गादास' या अनुवादीत कादंबऱ्या तसेच एक नाटक व काही फुटकळ कथा त्यांच्या नावावर जमा आहेत. 'वंदे जिनवरम्' या मासिकाचे संपादन त्यांनी केले. **१९५०:-** वनशेतीत अनेक प्रयोग करुन त्यावर वृत्तपत्रात लेखन करणारे लेखक, कृषी व उद्यान सल्लागार प्रा. अरुण भीमराव निकम यांचा जन्म. 'वनशेती' हा त्यांचा ग्रंथ प्रसिध्द झाला आहे.




**१९५१:-** लेखिका वीणा कुळकर्णी यांचा जन्म. ह्यांच्या आकाशवाणीवरुन कथाकथन, चिंतन व नाटिका प्रसारित झाला आहे. याशिवाय त्यांचा 'बोन्साय' हा कथासंग्रह, 'ऋतुरंग' हे ललित तर 'लाडवाचे लग्न' हे मुलांसाठी अशी साहित्य संपदा. **२०१५:-** जेष्ठ पत्रकार आणि कुलाबा समाचार या साप्ताहिकाचे संपादक माधवराव मंडलिक यांचे निधन.

**संजय वझरेकर**
९९७५५७६६७५

**निवडक**

## शहीदांना श्रद्धांजली

**पनवेल :** मुंबईतील गोदीमध्ये उभ्या असलेल्या लंडनच्या फोर्ट स्टायकिन या जहाजावर प्रचंड मोठा बॉम्बस्फोट झाला होता. या स्फोटामुळे संपूर्ण मुंबई हादरली होती. ही आग विझवताना मुंबईशमन दलाचे ६६ जवान शहीद झाले. गोदीमधील विविध व्यवस्थापनात काम करणाऱ्या २३१ जणांचा मृत्यू झाला. दरवर्षीप्रमाणे मुंबई बंदरातील अग्निशमन सेवा केंद्रात उभारलेल्या स्मृतीस्तंभासमोर सर्व शहीद जवानांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

## साईबाबा पालखी सोहळा

**नागोठणे :** नागोठण्यातील गवळ आळी येथील शिवसह्याद्री मित्र मंडळ व ग्रामस्थ मंडळ गवळआळी यांच्यावतीने श्री साईबाबा उत्सव व पालखी सोहळा रामनवमीच्या दिवशी आयोजित करण्यात आल्याची माहिती शिवसह्याद्री मित्रमंडळाकडून देण्यात आली. गवळ आळीतील श्री साईबाबा उत्सव व पालखी सोहळ्याचे हे सलगपणे १४ वे वर्ष आहे. श्री साईबाबा मंदिरात आयोजित करण्यात आलेल्या उत्सव सोहळ्याची सुरुवात दुग्धाभिषेकाने होणार आहे.

## शाळा पूर्वतयारी मेळावा

**सुतारवाडी :** प्राथमिक शाळा सुतारवाडी येथे शाळा पूर्व तयारी मेळावा १ चे आयोजन कुडली केंद्र प्रमुख उमेश महाडेश्वर यांनी केले होते. या प्रशिक्षण मेळाव्यास कुडली केंद्रातील शिक्षक शिक्षिका मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. प्रथम प्रार्थना घेण्यात आली. त्यानंतर मार्गदर्शक तज्ञ शिक्षिका स्वाती मगर यांनी अंगणवाडीमध्ये दाखल झालेल्या मुलांना कोणत्या गोष्टीचे ज्ञान देणे आवश्यक आहे. तसेच शाळा आनंददायी कशी ठेवायची याची माहिती सांगितली

## महिलेचा मोबाईल लंपास

**कर्जत:** कर्जत शहरातील मुद्रे परिसरात राहणाऱ्या स्वाती वनगे यांचा वीस हजार रुपये किमतीचा मोबाईल श्री ब्युटी पार्लरमधून अनोळखी महिलांनी पर्ससह लंपास केला. स्वाती वनगे श्री ब्युटी पार्लरमध्ये गेल्या असता चार महिला तेथे येऊन विचारपूस करत वनगे यांना बोलण्यात गुंतवून त्यांनी पर्ससह मोबाईल तसेच क्रेडिट कार्ड, महत्वाची कागदपत्र चोरून नेली. याबाबत स्वाती वनगे यांनी कर्जत पोलीस ठण्यामध्ये फिर्याद दाखल केली आहे.

## भीमगीतांचा कार्यक्रम

**कामोठे :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त पनवेल महापालिकेने मिरवणुकीसह निबंध व वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले होते. नवीन पनवेल येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव समितीच्या वतीने आनंद शिंदे यांच्या गायनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१७ एप्रिल

१) श्रीम. आशा अरविंद घारपुरे
१७-०४-१९४३
मारुती-नाका, अलिबाग

२) श्रीम. शैलजा मनोहर पवार
१७-०४-१९५०
रामनाथ, अलिबाग

३) श्रीम. मंगला मधुकर घरत
१७-०४-१९५०, वरसोली, अलिबाग

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

# आरटीई प्रवेशाला प्रारंभ

**। रायगड । प्रतिनिधी ।**

आरटीई प्रवेशप्रक्रियेसाठी २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील ऑनलाइन अर्ज करण्याची प्रक्रिया मंगळवार (ता. १६) पासून सुरू झाली आहे. यंदाच्या या प्रवेशप्रक्रियेत सरकारी अनुदानित आणि खासगी व्यवस्थापनांच्या शाळांमध्ये हे प्रवेश केले जाणार असल्याचे यंदा तब्बल नऊ लाख ७६ हजार ६१९ आरटीई प्रवेशाच्या जागांवर प्रवेश केले जाणार आहेत. यामध्ये पूर्व प्राथमिक आणि पहिल्या वर्गातील प्रवेशाच्या जागांचा समावेश असल्याची माहिती प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी दिली.

आरटीई प्रवेशासाठी मुंबई विभागात पहिलीच्या प्रवेशासाठी एक हजार ३८३ शाळांमध्ये ३३



हजार ५१७ जागा उपलब्ध आहेत. तर पूर्व प्राथमिकच्या प्रवेशासाठी ३१ शाळांमध्ये ७८२ जागा तर पूर्व प्राथमिकच्या पुण्यात २१४ शाळांमध्ये दोन हजार ७५० सर्वाधिक अशा आणि पहिलीसाठी पाच हजार १५३ शाळांमध्ये ७६ हजार ६४२ जागा आहेत. यंदाच्या शैक्षणिक वर्षांत आरटीईच्या प्रवेशासाठी अनुदानित, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांचाही समावेश करण्यात आल्याने यासाठीच्या जागा मुबलक प्रमाणात उपलब्ध झाल्या आहेत. या आरटीईच्या २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेशासाठी पालकांना प्राथमिक शिक्षण संचालनालयाच्या https://student.maharashtra.gov.in/adm_portal या संकेतस्थळावर प्रवेशासाठी नोंदणी करता येईल, ही नोंदणी करण्यासाठी ३० एप्रिलपर्यंत मुदत देण्यात आली आहे. पालकांनी अर्ज कसा करावा, यासाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांची सर्व माहिती या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

> **आरटीईच्या प्रवेशासाठी यंदा ७५ हजार ९६० शाळांमध्ये नऊ लाख ७६ हजार ६१९ इतक्या जागा विक्रमी जागा उपलब्ध आहेत. पालकांनी वेळोवेळी दिलेल्या सूचना आणि प्रवेशासाठीची माहिती पाहून आपल्या पाल्यांच्या प्रवेशासाठी नोंदणी करावी.**
> **- शरद गोसावी, संचालक, प्राथमिक शिक्षण संचालनालय**

### अशा आहेत जागा

| आरटीई पहिलीसाठी | शाळा उपलब्ध जागा |
|---|---|
| मुंबई - १३८३ | ३३५१७ |
| ठाणे - २६१६ | ४३७८२ |
| पालघर - २४१९ | ३२०६७ |
| रायगड - २९०९ | २३६६९ |
| **पूर्व प्राथमिकसाठी** | **शाळा उपलब्ध जागा** |
| मुंबई - ३१ | ७८२ |
| ठाणे - १५ | २९२ |
| पालघर -१ | १० |
| पुणे - २१४ | २७५० |
| नागपूर - १८ | ४४२ |

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर पतपेढीचा वर्धापनदिन सोहळा संपन्न



**। खांब । वार्ताहर ।**

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर माध्य व उच्च माध्यमिक शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी पतपेढी रोहा तालुका मर्यादीत या पतपेढीचा १७ वा वर्धापनदिन सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आला. चेअरमन सुरेश जंगम यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या वर्धापनदिन सोहळ्याप्रसंगी सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून व पुष्पमालिका अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी नितिन गोरिवले, संजीव शेरमकर, सुनील थिटे, तात्यासाहेब जाधव, रविंद्र ठाकूर, मुरलीधर कोंजे, ,बाळू गाडे, देवळेकर, शेळके, शशिकांत महाडिक आदी संचालक व सदस्य उपस्थित होते.

### ग्राम जल संचय योजनेतून आर्थिक उन्नती

# शेतकरी वर्गाचे उजळले भाग्य

**। खांब । वार्ताहर ।**

ग्रामीण भागातील शेती व शेतकरी वर्गांच्या हिताचे दृष्टीने दीपक फाऊंडेशन आणि दीपक नायट्राईट यांच्या वतीने प्रकल्प ग्राम जल संचय योजनेचा गतवर्षी रोहा-रायगड येथील ग्रामीण भागात करण्यात आलेल्या योजनेमुळे शेतकरी वर्गाचे भाग्य उजळले असल्याचे पहावयास मिळत आहे.



प्रकल्प ग्राम जल संचय एप्रिल २०२३ मध्ये १४ ग्रामपंचायतींमधील २० गावांमध्ये सुरू करण्यात आला आहे. तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणात पडणारा पाऊस आणि दुसरीकडे जानेवारी नंतर जाणवणारी पिण्याच्या पाण्याची भीषण टंचाई, एकल पीक पध्दतीचा विचार करून पाणी साठविण्यासाठी विविध गावामध्ये जलकुंडांची उभारणी करण्यात आली आहे. या प्रकल्पांतर्गत ९० शेतकऱ्यांना ९० जलकुंड करून देण्यात आले आहेत. यामध्ये ९० लाख लिटर पाण्याची साठवण झाली आहे. तसेच, या शेतकऱ्यांना २७०० आंबे, १८०० नारळ, २२५० बांबू, २२५० सागवण रोपे देऊन ९० एकर जमीन लागवडीखाली आली आहे. झाडांना पाणी देण्यासाठी ९० सौरऊर्जा आणि ९० मोटार देण्यात आले आहे. यामुळे मोठ्या प्रमाणात विजेची बचत झालेले दिसून येत आहे. याव्यतिरिक्त ९० शेतकऱ्यांना पडीक शेती पाण्याखाली आणण्यासाठी व बागायत शेती करण्यासाठी ठिबक सिंचन संच देण्यात आले होत.

या अंतर्गत ४५ एकर जमीन लागवडीखाली आली आहे. शेतकऱ्यांनी भेंडी, मिरची, दोडका, वांगी, कोबी, टोमॅटो, कलिंगड, रताळी अशी विविध पिकांची लागवड केली होती, या सर्व पिकांचे २०११६० किलो उत्पादन झाले असून ४८,५२९२४ रुपये एवढे उत्पन्न शेतकरी बांधवांना मिळाले आहे.

# नेरळ कळंब राज्यमार्गावर साईड पट्टी नसल्याने अपघात

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नेरळ कळंब राज्यमार्गावर अपघात घडतात. त्या अपघातांना प्रामुख्याने रस्त्याच्या दोन्ही बाजूला साईड पट्टी नसल्याने अपघात होत असल्याचे बोलले जात आहे.त्यामुळे नेरळ कळंब राज्यमार्ग रस्त्यावर सार्वजनिक बांधकाम विभागाने तत्काळ मुरूम मातीची साईड पट्टी टाकावी अशी मागणी विजय हजारे यांनी केली आहे.

### मुरूम माती टाकण्याची मागणी



माथेरान कळंब या राज्यमार्गावर मुरूम माती टाकून साईड पट्टी बनविण्यात आलेली नसल्याने या रस्त्यावर सातत्याने अपघात होत असतात. त्यामुळे या रस्त्यावर अनेक वर्षे डांबरीकरण कामे करणाऱ्या ठेकेदाराने साईड पट्टी टाकण्याचे बंधन असताना साईड पट्टी बनविली नाही. त्याचा फटका वाहनचालकांना बसत असून साईड पट्टी टाकण्याची मागणी होत असते. हे लक्षात घेवून सार्वजनिक बांधकाम विभागाकडून या रस्त्यावर तत्काळ मुरूम मातीची साईड पट्टी टाकण्यात यावी अशी मागणी कोल्हारे ग्रामपंचायत सदस्य विजय हजारे यांनी केली आहे.

## तळा बसस्थानकातून नालासोपारा बस सुरू

**तळा :** तळा बसस्थानकातून तळा ते नालासोपारा बस सुरू करण्यात आली आहे. तळा तालुक्यातील बहुतांश तरुण पिढी तसेच बरीचशी कुटुंबे कामधंद्यासाठी विरार,नालासोपारा या ठिकाणी स्थलांतरित झाली आहेत.त्यामुळे या नागरिकांची आपल्या गावी सतत ये-जा असते.मात्र गावाहून पुन्हा नालासोपाराला जाण्यासाठी बस उपलब्ध नसल्याने या नागरिकांना जास्तीचे पैसे खर्च करून प्रवास करावा लागत होता. मात्र आता तळा बसस्थानकातून नालासोपारा बस सुरू करण्यात आली असल्याने नालासोपारा येथे जाणाऱ्या नागरिकांचा प्रवासातील वेळ व जास्तीचा होणारा खर्चही वाचणार आहे. नालासोपारा ही बस तळा बसस्थानकातून सकाळी साडे दहा वाजता सुटणार आहे.व पुन्हा नालासोपाराहुन ठाणे, इंदापूर मार्गे तळा साठी रात्री साडे नऊ वाजता सुटणार आहे.

## काँग्रेस महिला पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र प्रदान!

**। उरण । वार्ताहर ।**

उरण तालुका महिला काँग्रेस अध्यक्षा रेखा घरत यांच्या पुढाकाराने रायगड काँग्रेस जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांच्या हस्ते महिला पदाधिकाऱ्यांना शेलघर येथे नियुक्तीपत्र देण्यात आले.



होऊ घातलेल्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रायगड जिल्ह्यातील महिला काँग्रेस पदाधिकाऱ्यांना पद देऊन त्यांना कार्यरत करण्यासाठी तसेच महिलांचा आत्मसन्मान वाढावा, महिलांना समाजात मानाचं स्थान मिळावे यासाठी महिलांना जबाबदारी देण्यात आली. यामध्ये चिरनेर विभागीय महिला काँग्रेस अध्यक्षपदी सारिका पाटील, जासई विभागीय महिला काँग्रेस अध्यक्षपदी विद्या पाटील, उरण तालुका महिला काँग्रेस उपाध्यक्षपदी प्रतिभा पाटील, उरण तालुका महिला काँग्रेस चिटणीसपदी विजया पाटील यांची नियुक्ती करण्यात आली.

## ‘संविधान वाचवण्यासाठी मोदी सरकारला हद्दपार करा’

**। तळा । वार्ताहर ।**

संपूर्ण लोकसभा मतदार संघात भेटी गाठी घेऊन समायोजन विचारमंथन समविचारी मित्र पक्षाच्या कार्यकर्त्याबरोबर असुन सद्य परिस्थिती ही आपले उमेदवार अनंत गीते यांच्या बाजूने कौल मिळत असून विरोधी उमेदवार तटकरे यांना कंटाळले असून घराणे चालवली आहे.मोदी संविधान बदलत आहेत.ते वाचवण्यासाठी इंडीया आघाडीला निवडून आणण्यासाठी शेकाप, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार), उबाठा शिवसेनाप्रमुख पक्ष कार्यकर्त्यांनी संघटीत होऊन गीतेंना केंद्रात पाठवण्याची गरज आहे. पक्षातील अंतर्गत हेवेदावे बाजुला सारा आणी हुकुमशाहीला हद्दपार करा. सविंधान वाचवण्याची हिच संधी आहे, असे प्रतिपादन शिवसेना (उबाठा) गटाचे जिल्हा संपर्क प्रमुख संजय कदम यांनी केले.

कार्यकर्ता समविचार मंथन आढावा बैठकीचे आयोजन शाखा कार्यालयात करण्यात आले होते. यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. तटकरेंच्या बालेकिल्ला तळा असला तरी पाच वर्षात किती जणांच्या घरात गेले.विकास हा त्यांचाच होतोय जनता मात्र तशीच राहिली आहे.अब मोदी ४०० सो पार मोडीत काढा.दिवसरात्र गाव बैठका घ्या.मोदी सरकार पुन्हा आले तर शेजारच्या देशांप्रमाणे हुकुमशाही येईल संविधान बदलेल तर आपल्या हातात काहीच रहाणार नाही यासाठी मित्रपक्षाने कार्यकर्त्यांनी पक्षाची निशाणी मशाल चिन्हाचा घरोघरी प्रचार करा आज लोकांना धनुष्यबाण डोक्यात आहे तो मतदारांच्या डोक्यातून काढून मशालीचा प्रचार करा. अशा सूचना कार्यकर्त्यांना दिल्या. यावेळी उप जिल्हाप्रमुख नंदू शिर्के, तालुका संघटक विलास ठसाळ ,महिला अध्यक्षा लता मुंढे, बेबी उतेकर, शहर प्रमुख नझीर पठाण, उप तालुका प्रमुख भगवान शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

पान १ वरुन

## लग्नाचे आमिष दाखवून अतिप्रसंग

वेगवेगळ्या ठिकाणी नेवून तिच्याबरोबर जबरदस्तीने शारिरिक संबंध प्रस्थापित केले. काही वेळेस शितपेयांतून तिला मद्य प्राशन करायला लावून तिच्यावर अतिप्रसंग केला. त्यातून ती गर्भवती राहिली. त्यानंतर मात्र आरोपीने तिच्याशी लग्न करण्यास नकार दिला. याबाबतची तक्रार पीडितेने महाड पोलिसात दिली.

## प्रचार केंद्राचे स्थलांतरण

(अजित पवार) उमेदवार सुनील तटकरे आहेत. या दोघांमध्येच खरी लढत होणार आहे. प्रचाराच्या रणधुमाळीला सुरुवात झाल्याने राजकीय धुरळा उडू लागला आहे. विविध सभांमधून आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झाडत आहेत. कार्यकर्ते कामाला लागले आहेत.

याआधी भाजपा आणि शिंदे गटाच्या विरोधात राष्ट्रवादीचे कार्यकर्ते राजकीयदृष्ट्या भिडले आहेत. प्रत्येक पक्षातील नेत्यांनी एकमेकांवर खालच्या पातळीवरील टीका केली आहे. आता याच सर्वांना एकमेकांच्या गळ्यात गळा घालून तटकरेंचा प्रचार करावा लागणार आहे. त्यामुळे महायुतीमधील भाजपा, शिंदे गटातील कार्यकर्त्यांची मात्र चांगलीच अडचण होत आहे. निवडणुकीच्या कामानिमित्त त्यांना सातत्याने राष्ट्रवादी भवनमध्ये जावे लागत आहे. परंतु या आधी आपले कट्टर विरोधक असणाऱ्या तटकरेंच्या कार्यालयात कसे जायचे, असा संकोच कदाचित कार्यकर्त्यांच्या मनात येत असावा. म्हणून या कार्यालयात कोणी फिरकत नसल्याने येथे सामसुम असल्याचे दिसत होते. महायुतीमधील कार्यकर्त्यांना एकसंघ राहावे, यासाठी आणि सर्वांची होणारी गैरसोय टाळण्यासाठी तटकरे यांना बायपास मार्गावरील चर्चसमोरील गाळ्यांमध्ये आपले संपर्क कार्यालय थाटावे लागले आहे. या ठिकाणी आता महायुतीमधील पदाधिकारी आणि कार्यकर्ते एकत्र बसतील, विचारविनिमय करतील, अशी आशा करायला हरकत नाही.

दरम्यान, महायुतीमधील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते यांना एकत्र बसण्यासाठी मध्यवर्ती ठिकाण असावे, अशी सर्वांचीच इच्छा होती. त्यामुळे बायपास येथे संपर्क कार्यालय सुरु करण्यात आल्याचे राष्ट्रवादीच्या एका कार्यकर्त्याने सांगितले.

## रायगड तापला

वातावरणात अचानक उकाडा वाढल्याने नागरिकांचे चांगलेच हाल होत आहेत. उन्हाच्या झळांपासून संरक्षण करण्यासाठी नागरिक टोपी, स्कार्फ, गॉगलचा वापर करताना दिसत आहेत. उन्हाच्या झळांनी नागरिकांच्या अंगाची लाही-लाही होत असल्याने घशाला लवकर कोरड पडत आहे. आपली तहान भागवण्यासाठी लिंबू सरबतासारखी थंड पेय मिळण्याला पसंती दिले जात आहे.

पुढील दोन दिवसांत राज्याच्या काही भागात कमाल तापमानात वाढ होण्याची शक्यता आहे. विदर्भ, मराठवाड्यासह महाराष्ट्रातील अन्य ठिकाणी गेल्या चार-पाच दिवसात पावसाने हजेरी लावली आहे. पुढील २४ तासातही मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. उत्तर कोकणातील काही भागात आज उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे. दक्षिण मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भाच्या जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळी वाऱ्यासह हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता आहे.

विदर्भासह मराठवाड्यात अवकाळी पावसाचा शेती पिकांना आणि फळबागांना मोठा फटका बसला आहे. दरम्यान, राज्यात पुन्हा अवकाळी पावसाची शक्यता असल्याने बळीराजाची चिंता वाढली आहे. महाराष्ट्रासह अन्य काही राज्यामध्येही अवकाळी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, उत्तर प्रदेश, हरियाणा, पंजाब, मध्य प्रदेश, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड आणि कर्नाटकमध्ये जोरदार वाऱ्यासह पावसाची शक्यता आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, दिल्ली, हिमाचल, हरियाणा, पंजाब, चंदीगड आणि पश्चिम मध्य प्रदेशमध्ये जोरदार वाऱ्यासह पाऊस पडू शकतो. कर्नाटकातही १७ एप्रिलपर्यंत पाऊस पडण्याची शक्यता आहे.

**कोणत्या उपाययोजना कराल**

**उष्णतेच्या लाटेदरम्यान लहान मुले व वृद्ध यांकडे लक्ष देण्याची गरज आहे. आपल्या आरोग्याची काळजी घेताना या काळात सैल, हलके, फिक्या रंगाचे आणि सुती कपडे परिधान करावेत, हलका आहार करवा, फळे आणि सलाड सारखे पचायला हलके असणारे अन्न खावे, पुरेसे पाणी प्यावे, गॉगल, छत्री, टोपी, बूट, चप्पल घालूनच घराबाहेर पडावे. प्रवास करताना पाण्याची बाटली आपल्याजवळ बाळगावी. थंड पाण्याने आंघोळ करावी. घराबाहेरील उपक्रम, मैदानी उपक्रमादरम्यान थोड्या-थोड्या वेळाने विश्रांती घ्यावी व विश्रांतीची वारंवारता वाढवावी.**

## तीन अपघातात एकाचा मृत्यू

जाणाऱ्या कारला धडक दिली. या अपघातात मोटरसायकलस्वार गंभीर जखमी झाला आहे. नानोसे गावाच्या हद्दीत नायरा पेट्रोलपंप जवळ एका मोटारसायकलस्वाराने रिक्षाला ओव्हरटेक करताना विरुद्ध बाजूने जात खोपोली बाजूकडून जाणाऱ्या मोटरसायकलला जोरदार धडक दिली. यामध्ये मोटरसायकलस्वाराचा मृत्यू झाला आहे. तर दुसऱ्या मोटरसायकलवरील मोटर सायकलस्वार व त्यांची पत्नी गंभीर जखमी झाली आहे. या अपघातामुळे रिक्षादेखील कलंडली आणि रिक्षातील प्रवासी जखमी झाले आहेत. तर भालगुल येथे पालीकडून खोपोलीकडे जाणाऱ्या कारला मोटरसायकलने धडक दिली. या अपघातात मोटरसायकलस्वार व त्याची पत्नी जखमी झाली आहेत.

## पिस्तुल, पाच काडतुसांसह एक अटक

संशयित तरुण रेल्वेस्थानकाच्या दिशेने जाताना दिसून आला. यामुळे त्याला चौकशीसाठी ताब्यात घेऊन त्याच्या बॅगची झडती घेतली असता त्यामध्ये एक पिस्तुल व पाच काडतुसे आढळून आली. पवन जयवंत सागर (१८) असे त्याचे नाव असून त्याच्यावर पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

## उरणकरांसाठी खासदार बारणे ठरले निष्क्रिय

मैदान नाही. साडेबारा टक्केचा प्रश्न आजही प्रलंबित आहे. सेफ्टीझोन, वाळवीग्रस्त हनुमान कोळीवाड्याचा प्रश्न, नोकरभरती, वाहतूक कोंडी, अनधिकृत केमिकलयुक्त यार्ड, वाढीव गावठाण, पाणी प्रश्न, तसेच सीएसआर फंडापासून उरणकर वंचित आहेत. अशा अनेक समस्यांचा सामना येथील मतदारांना करावा लागत आहे. तसेच जेएनपीएचे खासगीकरण होऊ देणार नाही अशा वल्गना करूनही खासगीकरणाचे वारे सुसाट सुटले आहेत. हे सोडवण्यासाठी आपण किती प्रयत्न केलेत असा सवालही मतदार करीत आहेत. उरणमधील नेतेमंडळी महायुतीबरोबर आहेत. ते मोठमोठ्या बढाया मारून खुश करण्याचा प्रयत्न करीत आहेत. अशा बढाया मारणाऱ्यांची गेली कित्येक वर्षांपासून कामे निधीअभावी अपुरी आहेत. मात्र उरणमधील विकास करण्यात गेली १० वर्षे खासदार बारणे हे निष्क्रिय ठरले असल्याने यावेळी बदल अटळ असल्याचे सांगतात.

## ‘जय’साठी राजकीय दबाव

उरण पोलीस वर्दीमध्ये उपस्थित आहेत. त्यावेळी आरोपी चालक जय चंद्रहास घरत हा ही तिथे असल्याचे व्हिडीओमध्ये सरळसरळ दिसत आहे. मग आरोपी पळून जाण्यात यशस्वी झालाच कसा असा संशय निर्माण होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी चालक जयचे वडील हे आमदार महेश बालदी यांच्या मर्जीतील असल्याने आरोपीस अटक करण्यास टाळाटाळ केली जात असल्याचे बोलले जाते.

आरोपी जर जखमी असेल तर त्याला पोलिसांनी ताब्यात घेऊन दवाखान्यात दाखल करणे आवश्यक असताना परस्पर त्याचे मित्र किंवा इतर जण कसे काय घेऊन जाऊ शकतात. तरी व्हिडीओमध्ये जे त्याच्याबरोबर दिसतात त्यांच्यावरही गुन्हे दाखल करण्याची मागणी उरणच्या जनतेकडून जोर धरू लागली आहे. त्यामुळे यापुढे इतरांना वचक बसेल अशी चर्चा सुरू आहे. नशा करणाऱ्या पदार्थांचा अंश पोटामध्ये काही तास असतो. तो उघड होऊ नये म्हणून तर त्याला पळविण्यात आले नाही ना. तो नॉर्मल झाल्यानंतर आरोपीस अटक होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तरी या सर्व प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करण्याची मागणी उरणच्या जनतेकडून जोर धरू लागली आहे.

अपघातानंतर पोलिसांकडून फरार आरोपीला पकडण्यासाठी दोन पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली एक पथक तयार करण्यात आले आहे. परंतु शनिवार दि. ६ एप्रिल रोजी अपघात घडल्यानंतर आज ८ दिवस उलटूनही आरोपीस अटक करण्यात आलेली नाही. दोन दिवसांपूर्वी उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतीश निकम यांनी आरोपी जय चंद्रहास घरत यास अटक केली नसून त्याच्यावर रेगणार हॉस्पिटल सेक्टर २३, उलवे येथील हॉस्पिटलमध्ये अतिदक्षता विभागात उपचार सुरू असल्याची माहिती दिली. मात्र अजूनही आरोपीस अटक केली जात नसल्याने आरोपीस वाचविण्यासाठी हा सर्व अट्टहास सुरू असल्याची चर्चा उरणच्या नाक्यानाक्यावर दबक्या आवाजात सुरू आहे.

आरोपी जय घरत यास अटक दाखवून त्यास जामिनावर सुटका करण्यासाठी किंवा अटकपूर्व जामीन मिळविण्यासाठी सर्व बाजूनी प्रयत्न सुरू असल्याचे समजते.

## कांदळेपाडा ग्रामस्थांचा गाव बंदीचा एकमुखी ठराव

करण्यात येत असल्याने अखेर संतप्त गावकऱ्यांनी राजकीय पुढाऱ्यांना गावबंदीचा निर्णय घेतला आहे. जोपर्यंत कांदळेपाडा ग्रामस्थांच्या सांडपाणी व सर्व्हिस रस्त्याचा प्रश्न सोडवत नाही, तोपर्यंत राजकीय पक्षाच्या पुढाऱ्यांना गावात घ्यायचे नाही आणि मतदान करायचे नाही, असा एकमुखी ठराव कांदळेपाडा ग्रामस्थांनी घेतला आहे.

**निवडक**

## चिरनेरला रामनवमीचा उत्सव

**नवी मुंबई :** एनएमएमएस शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला आहे. या परीक्षेत अविष्का महेश घरत हिने ठाणे जिल्ह्यात पहिला क्रमांक पटकाविला आहे. अविष्का ही ज्ञान विकास संस्था कोपरखैरणे या विद्यालयाची विद्यार्थिनी आहे. यापूर्वी तिने प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत ८७.३३% गुण मिळवून नवी मुंबई विभागात प्रथम क्रमांक पटकाविला होता. एनएमएमएस स्कॉलरशिप परीक्षेत अविष्का घरतने मिळविलेल्या या घवघवीत यशात सारिका देशमुख यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे.

## कर्मचाऱ्यांसाठी ओपन जिम

**पनवेल :** सीबीडी पोलीस ठाणे येथे पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या आरोग्यासाठी पोलीस ठाणे परिसरात मोकळ्या झालेल्या जागेमध्ये ओपन जीमचे मांडणी करण्यात आली असून त्याचा लाभ पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी घेण्यास सुरूवात केली आहे. मिलिंद भारंबे यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचा पदभार स्वीकारल्यानंतर पोलीस आणि नागरिकांसाठी अनेक वेगवेगळे उपक्रम सुरू करून आपल्या कामाचा वेगळा ठसा निर्माण केलेला आहे.

## कोपरा परिसरात मृतदेह

**पनवेल :** सायन-पनवेल महामार्गावरील मध्यभागी असलेल्या फुटपाथवर अनोळखी व्यक्तीचा मृतदेह निदर्शनास आला आहे. या मृत इसमाचे वर्णन अंदाजे वय-३५, उंची ५.५ इंच, रंग निमगोरा, अंगाने मध्यम, चेहरा गोल, नाक सरळ, दाढी बारीक, डोक्याचे केस काळे-पांढरे, अंगात पिवळ्या रंगाचा टी- शर्ट, कंबरेला राखाडी फूल पॅन्ट परिधान केलेली आहे. या इसमाबाबत अधिक माहिती असल्यास खारघर पोलिस ठाणे (०२२-२७७४२५००) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## आपट्यात पालखी मिरवणूक

**रसायनी :** रविवारी सायंकाळी एकविरा आईची पालखी आपटा पूर्ण गावातून फिरविण्यात आली. आपटा कोळीवाड्याची पालखी परंपरेप्रमाणे पाटलाच्या घरातून वाजता गाजत नविन कोळीवाड्यातून सोसायटी अशी जयघोषात काढण्यात आली. मंगळवारी (दि.१६) सकाळी आरती झाल्यानंतर मानपानाचा कार्यक्रम पार पडला. हा सोहळा आपटा कोळीवाड्यातील ग्रामस्थ व महिला वर्ग तसेच लहान मुले व मुली सर्वांनी एकत्र येऊन मोठ्या उत्साहात पार पडला.

## चालकांना सुरक्षिततेचे धडे

**पनवेल :** कामोठे परिसरातील दुचाकी व चारचाकी वाहनांवरील चालकांना वाहतूक शाखेतर्फे सुरक्षिततेचे धडे देण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने दुचाकी वाहन चालकाने डोक्यात हेल्मेट घालावे, दुचाकीवरुन दोघा जणांनी प्रवास करावा, वाहतुकीचे नियम पाळावे, त्याचप्रमाणे चारचाकी वाहन चालकांनी सिट बेल्ट लावावा, वाहनांवर नियंत्रण ठेवावे आदी प्रकारचे प्रबोधन व सुरक्षिततेचे धडे वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक शैलेश भादरे व त्यांच्या सहकाऱ्यांनी दिले.

# विशेष मोहिमेतून होणार जात पडताळणी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

शिक्षणासाठी जात वैधता प्रमाणपत्र मागासवर्गीय विद्यार्थ्यांना वेळेवर मिळावे यासाठी जात प्रमाणपत्र पडताळणी समिती मार्फत विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त हा नाविन्य उपक्रम हाती घेतला असून ही मोहिम २५ एप्रिलपर्यंत असणार आहे.

एससी, ओबीसी, एसबीसी, व्हीजीएनटी या वर्गातील विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र दिले जाते. रायगड जिल्ह्यातील अलिबागमधील चेंढरे येथे जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे कार्यालय आहे. या समितीच्या माध्यमातून तपासणी करून जात वैधता प्रमाणपत्र वितरीत केले जाते.





रायगड जिल्ह्यामध्ये २०२३- २०२४ या कालावधीत चार हजार ३२२ जणांना जात वैधता प्रमाणपत्र देण्यात आले आहेत. त्यात सेवा २५१ आणि तीन हजार ८९१ विद्यार्थ्यांना हे प्रमाणपत्र वितरीत केले आहेत. वेगवेगळ्या उपक्रमातून जात वैधता प्रमाणपत्र तातडीने देण्याचा प्रयत्न या समितीचा राहिला आहे. त्याचाच एक भाग म्हणून भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधत २५ एप्रिलपर्यंत समता पंधरवड्याचे आयोजन केले आहे. या विशेष मोहिमेतून जात वैधता प्रमाणपत्र तातडीने कसे मिळेल याकडे लक्ष दिले जाणार आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत या उपक्रमाला सुरुवात करण्यात आली आहे.

मागासवर्गीय घटकातील विद्यार्थी जात वैधता प्रमाणपत्रापासून वंचित राहू नये यासाठी ही विशेष मोहिम सुरु केली आहे. समितीच्या अध्यक्षा डॉ. ज्योत्स्ना पडियार, उपायुक्त तथा सदस्य विशाल नाईक, संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव सुनील जाधव यांच्या पुढाकाराने ही मोहीम यशस्वी होणार आहे. अकरावी व बारावीमधील विज्ञान शाखेत शिक्षणा घेत असलेल्या, अभियांत्रिकी, पदविका तसेच पुढील उच्च शिक्षणासाठी व्यावसायिक अभ्यासक्रम प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र दिले जाणार असल्याची माहिती जिल्हा जात पडताळणी समितीचे उपायुक्त तथा सदस्य विशाल नाईक यांनी दिली.

> जात वैधता प्रमाणपत्र विद्यार्थ्यांना वेळेवर मिळावे, ते शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी विशेष मोहिम राबविण्यात येत आहे. जिल्ह्यातील मागासवर्गीय घटकातील विद्यार्थ्यांनी या मोहिमेत सहभागी होऊन वैधता प्रमाणपत्रासाठी अर्ज तातडीने करावे
> – विशाल नाईक
> – उपायुक्त तथा सदस्य

ज्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी अद्याप जात वैधता प्रमाणपत्र मिळणेसाठी त्वरीत अर्ज सादर करावेत. ज्या विद्यार्थ्यांनी अर्ज सादर केले आहेत, परंतु अद्याप वैधता प्रमाणपत्र मिळाले नाही. अशा विद्यार्थ्यांनी दि.२२ ते २६ एप्रिल २०२४ या कालावधीत समिती कार्यालयात हजर राहून त्रुटींची पूर्तता करावी.

# सुशोभीकरणाचे काम प्रगतीपथावर

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**



मुरुड-जंजिरा या ठिकाणी दरवर्षी लाखो पर्यटक देश-विदेशातून येत असतात. याठिकाणी पर्यटकांची संख्या वाढावी, यासाठी मुरुड समुद्रकिनारा सुशोभीकरणासाठी शासनाकडून कोट्यवधी रुपयांचा निधी प्राप्त झाला होता. ते काम प्रगतीपथावर असुन या कामाचा पाहणी मुरुड जंजिरा नगरपरिषदेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी पंकज भुसे यांनी कामाचा आढावा घेऊन लवकरात लवकर काम चांगल्या पद्धतीने करावे, असे आदेश देण्यात आले.

मुरुड समुद्रकिनारा सुंदर असुन या ठिकाणी पर्यटकांना सुविधा मिळत नसल्याने पर्यटकांची संख्या दिवसेंदिवस कमी होत होती. पर्यटकांच्या दृष्टीकोनातुन मुरुड समुद्राकिनारा सुशोभिकरण केल्याने पर्यटकांची संख्येत नक्कीच वाढ होईल. आणि या मधून स्थानिकांना चांगला रोजगार मिळेल. या नगरपरिषदेच्या वैशिष्ट्यपूर्ण योजनेतून मुरुड समुद्रकिनारा सुशोभीकरण करण्याकरिता ११ कोटी ४३ लाख १२ हजार ७१६ रुपये मंजूर करण्यात आले होते. या निधीतून सुशोभीकरण, वॉक वे, फुड जॉईट करणे, वाहनतळ व अनुषंगिक सुविधा करणे आदी सुविधांचा समावेश आसणार आहे. त्यामुळे पर्यटकांचा ओघ वाढून यामधून स्थानिकांना रोजगार उपलब्ध सुविधा उभारण्यात येणार आहेत.

# नागेवाडीची पाणी समस्या दूर

**। नेरळ । प्रतिनिधी ।**



कर्जत तालुक्यातील नागेवाडीमध्ये पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष्य निर्माण झाले होते. तेथे पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणारी विहिर आटली असून ग्रामस्थांना वाडीपासून चार किलोमीटर अंतरावरून पाणी आणावे लागत होते. भास्कर दिसले यांनी आदिवासी ग्रामस्थांची पिण्याच्या पाण्याची समस्या कायमची सोडवली आहे. तेथे ग्रांमस्थांसाठी बोअरवेल खोदून देत वाडीमध्ये पिण्याचे पाणी उपलब्ध केले आहे.

साडेपाचशे लोकांची वस्ती असलेल्या नागेवाडीमध्ये दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण झाली होती. स्थानिक आदिवासी ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्याची सोय करून देणाऱ्या विहिरींमध्ये असलेल्या पाण्याने तळ गाठला आहे. त्यामुळे पिण्याच्या पाण्यासाठी स्थानिक आदिवासी लोकांना दूरवर जावून पाणी आणावे लागत आहे. त्यात कर्जत पंचायत समितीने नागेवाडीसाठी टँकरने पाणी पुरवठा सुरू केलेला नव्हता. त्यामुळे यावर्षी अचानक उद्भवलेल्या पाणी समस्येवर कशी मात करायची, असा प्रश्न निर्माण झाला होता.

मात्र, गावावर आलेली परिस्थिती लक्षात घेउन भास्कर दिसले यांनी स्वखर्चाने बोअरवेल खोदून दिली. या निमित्ताने नागेवाडी मधील पिण्याच्या पाण्याची समस्या दूर झाल्याने स्थानिक आदिवासींची पायपीट थांबली असून यावेळी ग्रामस्थांनी भास्कर दिसले यांचे आभार मानले.




## महादेववाडीत अखंड हरिनाम सप्ताह

**। कोलाड । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील महादेववाडी कोलाड येथे रामनवमी निमित्ताने बुधवार दि.१७ ते शनिवार दि.२० पर्यंत आलिबागकर महाराज, गोपाळ वाजे, धोंडू कोल्हाटकर, सिताराम दाजी खामकर, बाबु बाईत, श्रीधर बाईत यांच्या कृपाआशिर्वादामुळे अखंड नाम यज्ञ सोहळा नारायण वाजे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला आहे. यानिमित्त बुधवार दि.१७ रोजी सकाळी बबन वांजळे यांचे किर्तन, रात्री नित्यानंद मांडवकर यांचे किर्तन. गुरुवार दि.१८ रोजी रात्री पुरुषोत्तम पाटील यांचे किर्तन. शुक्रवार दि.१९ रोजी रात्री पुरुषोत्तम पाटील यांचे किर्तन. शनिवार दि.२० रोजी सकाळी विजयानंद तेलंगे यांचे काल्याचे किर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे.

# नेरळ येथील १९३८ साली बांधलेले श्रीराम मंदिर

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नेरळ येथे बदले कुटुंबाच्या मालकीचे श्रीराम मंदिर असून या मंदिराची उभारणी १९३८ साली झाली आहे. अयोध्या येथे श्रीराम मंदिराचे लोकार्पण होत असताना नेरळ येथील मंदिरात मोठ्या प्रमाणावर धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.



१९३८ साली भालचंद्र गणपत बदले आणि अनिल कृष्णाजी बदले यांनी बदले कुटुंबाच्या जमिनीवर मंदिराची उभारणी केली. नेरळ गावात त्यावेळी याच भागात बाजारपेठ होती आणि देश पारतंत्र्यात असताना श्रीराम मंदिराची उभारणी केली गेली होती. श्रीराम, लक्ष्मण आणि सीता यांच्या संगमरवरी मूर्ती अशी मंदिरातील गाभाऱ्याची रचना असून कौलारू दुमजली वास्तू उभारली आहे. या मंदिराच्या उभारणीसाठी सागवान लाकडे वापरण्यात आली होती. मंदिराचे व्यवस्थापन श्रीराम देवस्थान ट्रस्टकडून केले जाते. सध्या मंगेश बदले आणि सुशांत बदले हे मंदिराचे व्यवस्थापन पाहत असून हे मंदिर नेरळ ग्रामस्थांसाठी कायम खुले असते. यावेळी दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

# चित्रलेखा पाटील यांनी दिल्या रमजानच्या शुभेच्छा

**। सोगाव । वार्ताहर ।**

अलिबाग तालुक्यातील सोगाव येथे शेकाप रायगड जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांनी मुस्लिम बंधु व भगीनींना रमजान ईदच्या भरभरून शुभेच्छा दिल्या. यावेळी सोगाव येथील मुस्लिम बांधवांनी चित्रलेखा पाटील यांचे स्वागत केले. तसेच, रमजान महिन्यात पूर्ण तीस दिवसांचे उपवास (रोजे) करणाऱ्या लहानग्यांचे कौतुक करत शुभेच्छा दिल्या.



यावेळी वसीम कुर, मुद्स्सर कुर, मजीद कुर, अश्रफ सोंडे, रब्बानी कुरेशी, शफी वाकनिस, साहिल शिरगावकर, साजीद शिरगावकर, माहीद कुर, असीम कुर, जमीर वाकनिस, हाफिज कैस कुर, आसिफ वाकनिस व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जितेंद्र सोनवणे महाराष्ट्रात अव्वल

**पनवेल :** नवीन पनवेल येथील पंढरीनाथ महारू सोनवणे हे एस.टी महामंडळ मुंबई विभागात वाहतूक नियंत्रक पदावर कार्यरत होते. त्यांचा मुलगा जितेंद्र सोनवणे याने २०२२ मध्ये पोलीस उपनिरीक्षक पदाची परीक्षा दिली. त्याने महाराष्ट्रात प्रथम क्रमांक पटकावून या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले. त्यांनी आपल्या शहीद मामाचे स्वप्न पूर्ण केले.

# मतदान जनजागृतीसाठी सेल्फी पॉईंटचे उद्‌घाटन



**। म्हसळा । वार्ताहर ।**

लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू असून रायगड लोकसभा मतदारसंघामध्ये ७ मेला मतदान होणार आहे. या निवडणुकीमध्ये जास्तीत जास्त मतदारांनी मतदान करावे, यासाठी प्रांताधिकारी महेश पाटील, तहसीलदार समीर घारे यांच्या मार्गदर्शनाखाली मतदारांमध्ये जनजागृती करण्यासाठी विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. त्या अनुषंगाने मतदारांमध्ये जनजागृती करण्यासाठी म्हसळा तहसील कार्यालयाच्या आवारात सेल्फी पॉइंट साकारण्यात आले आहे.

## सावरोलीत मतदान जनजागृती

**। खरोशी । प्रतिनिधी ।**

लोकसभा मतदान २०२४ च्या अनुषंगाने मतदान जनजागृती कार्यक्रमांतर्गत रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक केंद्र शाळा सावरोली यांच्यावतीने मतदान जनजागृती कार्यक्रम अत्यंत उत्साहाच्या वातावरणात संपन्न झाला.

या कार्यक्रमाची सुरुवात सायकल रॅली काढून प्रभात फेरीने करण्यात आली. शाळेतील सर्व मुलं व मुली त्याचप्रमाणे मुख्याध्यापक बळीराम चव्हाण, सहशिक्षक जगदीश मोहने व ग्रामस्थांनी सहभाग घेतला होता.

# वावेमध्ये आज श्रीराम जन्मोत्सव

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील वावे येथील ग्रामस्थ मंडळ, महिला मंडळाच्या वतीने बुधवारी (दि.१७) श्रीराम जन्मोत्सवाचे आयोजन केले आहे. यानिमित्त धार्मिक, सामाजिक कार्यक्रम होणार आहेत. गेल्या ७५ वर्षाची परंपरा जपण्यात आली आहे.



वावे येथील मंदिरात सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास श्रीराम जन्माचे पोथीवाचन होणार आहे.त्यानंतर दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास जन्मोत्सवाला सुरुवात होणार आहे.सकाळी नऊ वाजल्यापासून संध्याकाळी सात वाजेपर्यंत विविध धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. त्यामध्ये वावे येथील श्री राम प्रासादिक भजन मंडळ तसेच बेलोशी, महाजने, आंदोशी, उसर, वळवली, आंबेपुर येथील भजनांचा समावेश आहे. रात्री नऊनंतर श्रींची पालखी, मिरवणुक संपूर्ण गावातून काढली जाणार आहे. पालखीसोबत वारकरी भजने, लेझीम पथक आदींचा समावेश असणार आहे.

# दिव्यांगांना मतदानाविषयी जनजागृती

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मध्ये मतदारांमध्ये मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी प्रबोधन करणे व निवडणूकीमध्ये निर्भयपणे कोणत्याही प्रलोभनाच्या प्रभावाखाली न येता मतदान करणे या दृष्टीने स्वीप अंतर्गत शहरभर विविध अभियान राबविण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून मुरूड जंजिरा नगरपरिषदेमार्फत नगरपरिषद हद्दीतील दिव्यांग मतदारांच्या घरी भेट देऊन तसेच कार्यालयामध्ये येणाऱ्या दिव्यांग मतदारांना मतदान यंत्र विषयी जनजागृती करण्यात आली.




याप्रसंगी प्रशासक तथा मुख्याधिकारी-पंकज भुसे, नगरपरिषदेचे आरोग्य निरीक्षक - राकेश पाटील, प्रशासकीय अधिकारी- परेश कुंभार, लिपीक मनोज पुलेंकर, सिटी को-ऑर्डीनेटर - सचिन कोरके, दिपक शिंदे, इ.नगरपरिषदेचे कर्मचारी व अधिकारी उपस्थित होते. लोकसभा सार्वत्रिक निवडणूक करीता भारत निवडणूक आयोगाच्या वतीने दिव्यांग मतदारांची विशेष काळजी घेऊन मतदाना विषयी प्रोत्साहन देण्याकरीता विविध उपक्रम घेण्यात येत आहेत. त्या दृष्टीकोनातून प्रत्येक मतदान केंद्रावर व्हिल चेअरची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधील अडचण फोन नं. ९९६०४५६९८६/८८०६४७९१७३, अलिबाग
- बोअरवेल-विहिरीसाठी मशीनद्वारे अचूक भूजल संशोधन-९२२६७६६१२९
- अलिबागमध्ये ब्लॉक व दुकानाचे गाळे भाड्याने देणे आहे. संपर्क : मोबाईल ९८२२०३१०१७/९०२८५६५९१७
- गाळा भाड्याने देणे आहे. साबू हॉस्पिटल बिल्डींग पी.एन. पी.मध्ये गाळा नं.१६ कलावती भाजी भंडारच्या बाजूला contact No. 7304852315/9604138826
- हॉस्पिटलमध्ये कामासाठी अनुभवी स्टाफची आवश्यकता आहे. नर्स (ANM/GNM) वॉर्डबॉय, मावशी) अनुभव असल्यास प्राधान्य दिले जाईल. मो. ९३२१३०३९३८, ९११९५६५०२२, ७७४५०५००२५

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# बँक ऑफ महाराष्ट्र शाखेत सुविधांची वानवा

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील आनंदनगर येथील बँक ऑफ महाराष्ट्र शाखेत नागरिक, जेष्ठ महिला, आबाल वृद्ध, विद्यार्थी यांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. हि बाब ॲड. नवाळे यांच्या निदर्शनास येताच त्यांनी बँक ऑफ महाराष्ट्र शाखा आनंदनगरमध्ये मिळणाऱ्या अपुऱ्या सेवा सुविधांबाबत आवाज उठवला आहे. यावेळी त्यांनी बँकेत नागरिकांना चांगल्या व त्वरित सेवा-सुविधा मिळाव्यात यासाठी संबंधित

बैंक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक

प्रशासनाशी पत्रव्यवहार केला आहे.

गेल्या सहा महीन्यांपासुन आनंदनगर येथे ही शाखा स्थलांतरीत करण्यात आली आहे. यापुर्वी या शाखेत १५ ते २० कर्मचारी कार्यरत होते. परंतु, आता तेथे फक्त ५ कर्मचारी काम करीत असल्याने ग्राहकांना वेगवेगळ्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. गर्दीच्या वेळी शाखेमधे उभे राहण्यास सुद्धा जागा नसते. बँकेत रक्कम देणे व घेण्याकरीता एकच कांऊटर उपलब्ध आहे. त्यामुळे ग्राहकांना एकाच रांगेत अर्धा ते पाऊण तास उभे रहावे लागते. तेथे बसण्याची सोयसुद्धा उपलब्ध नाही. त्यामुळे ग्राहकांना एटीएम मशीनकडे धाव घ्यावी लागते. परंतु, बँकेने लावलेल्या एटीएम मशीनमध्ये कधी २ ते ३ दिवस रक्कमच उपलब्ध नसते. त्यामुळे ग्राहकांना बाहेरील बँकांच्या एटीएमकडे धाव घ्यावी लागते. त्याचा ग्राहकांना आर्थीक भुरदंड बसतो. त्यामुळे बँक ऑफ महाराष्ट्र ही बँक जनतेच्या हितासाठी आहे की जनतेला लुटुन धंदा करण्यासाठी आहे, असा प्रश्न सध्या येथील ग्राहकांना पडला आहे.

# चिरनेर शाखेत पैशांचा तुटवडा




**। उरण । वार्ताहर ।**

बँक ऑफ महाराष्ट्र चिरनेर शाखेतून खातेदारांना गरजेच्या वेळी पैसेच मिळत नाही. त्यामुळे खातेदारांना बँक व्यवस्थापनाच्या ढिसाळ कारभारामुळे हात हलवत घरी परतावे लागत असल्याने खातेदारांमध्ये नाराजीचा सूर उमटत आहे. चिरनेर पंचक्रोशीतील हजारो गरीब गरजू खातेदार रहिवाशांनी आप आपल्या पैशाची सुरक्षित ठेव म्हणून तसेच गरजेच्या वेळी ठेव केलेले पैसे वेळेवर मिळावे यासाठी बँक ऑफ महाराष्ट्र शाखा चिरनेर येथे जमा केली आहे. परंतु, बँक व्यवस्थापनाच्या ढिसाळ कारभारामुळे खातेदारांना गरज असताना वेळेवर स्वतःचे पैसेच मिळत नाहीत. त्यामुळे अनेक खातेदारांना बँकेतून हात हालवित घरी परतावे लागत आहे.

# पेण तालुका यात्रांनी गजबजणार

## ग्रामीण भागात यात्रांची जय्यत तयारी सुरु

**। हमरापूर । वार्ताहर ।**

चैत्र महिना सुरु झाला असून, लोकसभा निवडणुकीची धामधूमदेखील सुरु झाली आहे. तर गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तानंतर सर्वत्र यात्रांचा हंगाम सुरू झाला आहे. महाराष्ट्रात मानाची समजली जाणारी आगरी-कोळी बांधवांची इष्टदेवता असणारी कार्ला येथील एकविरा देवीची यात्रा उत्सव झाल्यानंतर स्थानिक ग्रामदेवतांच्या यात्रांना सुरुवात होते.

पेण तालुक्यातील यात्रांना रामनवमीपासून सुरुवात होत आहे. तालुक्यातील वाशी, वढाव, बोरी, कळवा, रावे, दादर, जिते यांच्यासह अनेक ठिकाणच्या ग्राम यात्रा होत असून, मोठी गर्दी उसळणार आहे. यानिमित्ताने कोट्यवधींची उलाढाल दरवर्षी होते.

तालुक्यातील महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या व प्रति अयोध्या म्हणून ओळखली जाणारी बळवली गावातील प्रभू श्रीरामांचे मंदिर असलेलली बळवली गावची यात्रा बुधवार, दि. १७ एप्रिल रोजी भरते. तालुक्यातून भाविक या दिवशी येथे मोठी गर्दी करतात.

वढाव येथील काळभैरव देवाची यात्रा ही दि. २१ एप्रिल रोजी भरणार आहे. तर, तालुक्यातील सर्वात मोठी असणारी वाशी येथील नवसाला पावणाऱ्या वरसूबाय जगदंबा भवानी देवीची यात्रा सोमवारी २२ एप्रिल रोजी भरत असून, ही यात्रा तालुक्यातील सर्वात मोठी यात्रा मानली जाते. आकाश पाळणे, इतर मनोरंजन करणारे खेळ तसेच मेवा-मिठाईची दुकाने यांनी संपूर्ण परिसर गजबजलेला असतो. याच दिवशी गडब येथील



काळबादेवीची येथील यात्रा भरणार आहे. बोरी येथील आक्कादेवीची यात्रा मंगळवारी दि. २३ एप्रिलला भरणार आहे. तसेच पांडापूर येथील यात्रादेखील याच दिवशी आहे. तर कळवे येथील यात्रादेखील हनुमान जयंतीच्या दिवशी आहे. तर, वरेडी येथील काळभैरव देवाची यात्रा २५ एप्रिलला आहे. तर कोलेटी येथील यात्रा २८ एप्रिल रोजी भरणार आहे.

रावे गावच्या आई रायबादेवीची यात्रा बुधवार, दि. ८ मे रोजी भरत असून, ही यात्रादेखील मोठी मानली जाते. भव्य काठ्या हे या यात्रेचे वैशिष्ट्य मानले जाते. काठ्या उभ्या करतानाचे दृश्य पाहण्यासाठी येथे मोठी गर्दी उसळते.

जिते गावची सत्यनारायण देवाची यात्रा ही अक्षयतृतियेच्या दिवशी शुक्रवार, दि. १० मे रोजी भरत असून, ही तालुक्यातील शेवटची यात्रा आहे. या यात्रेनंतर यात्रोत्सवाची समाप्ती होते.

# थंडपेयाच्या सेवनामुळे आरोग्यास धोका

**। उरण । वार्ताहर ।**

महिन्याभरापासून उन्हाचे चटके बसायला सुरुवात झाली. तेव्हापासून लोकांचा कल थंड पेयांकडे वायू लागला आहे. याचा गैरफायदा काही जणांनी घ्यायला सुरुवात केली आहे. अनेक शीतपेय विकणाऱ्या दुकानांमध्ये खुलेआम भेसळ केली जात असून, वापरण्यात येणारा बर्फही अशुद्ध पाण्यापासून बनविण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे. याकडे प्रशासन सोयीस्करपणे दुर्लक्ष करीत आहे, असा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे.

गेल्या काही दिवसांपासून शहरात जागोजागी थंड पेयाची दुकाने थाटली आहेत. उसाचा रस, सरबत, पेप्सी आदी गोष्टींसाठी वापरण्यात येणारा बर्फ अशुद्ध पाण्यापासून बनवला जात आहे. लस्सी, बदामशेक, आईस्क्रीम, कुल्फी यासाठी खवा वापरण्यात येतो. तसेच या पदार्थामध्ये दुधाची मलाईसुद्धा वापरली जाते. खवा व दूध यात भेसळ होत असल्यामुळे ही शीतपेये पिण्यासाठी हानिकारक असतात. त्यांच्यामुळे बालके व नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होऊ शकतो. अन्न व भेसळ प्रतिबंधक विभागाचे प्रशासनं मात्र या दुकानदारीकडे जाणीवपूर्वक डोळेझाक करीत असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे.

शीतपेये विकणाऱ्या गाडीवाल्यांनी नगरपरिषदेचा परवाना काढलेला नाही. अन्न व भेसळ प्रतिबंधक विभागाचा परवाना नाही. या थंडपेयाच्या सेवनामुळे बालके व नागरिकांच्या आरोग्यास काही धोका निर्माण झाल्यास जबाबदार कोण, हा प्रश्न नागरिकांतून विचारला जात आहे. या गंभीर प्रकाराकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

# समुद्रकिनारी पर्यटकाने मांडले ठाण

## सुशोभित बंधाऱ्यावर तंबू टाकून केले वास्तव्य

**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**

कोकणात पर्यटनासाठी येणाऱ्या पर्यटकांकडून अनेक प्रकारच्या शक्कल लढविल्या जात असतात. श्रीवर्धन समुद्रकिनारी एका पर्यटकाने अशाच प्रकारे शक्कल लढवून चक्क सुशोभिकरण केलेल्या बंधाऱ्यावर तंबू टाकून रात्रभर वास्तव्य केल्याची घटना समोर आली आहे.



> सदर प्रकार माझ्या लक्षात आल्यानंतर तातडीने समुद्रकिनारी नगरपरिषदेची माणसे पाठवलेली आहेत. तसेच नगरपरिषदेचे असलेले जीवरक्षक व सफाई कामगार यांनादेखील अशाप्रकारे कोणी वास्तव्य करताना आढळल्यास वरिष्ठांना कळविण्याच्या सूचना दिल्या आहेत.
>
> –विराज लबडे, मुख्याधिकारी तथा प्रशासक, श्रीवर्धन नगरपरिषद

पर्यटकाच्या कृतीने व्यावसायिकांमध्येनाराजीपसरल्याचे पाहायला मिळत आहे. तरी, श्रीवर्धन नगरपरिषदेने अशा प्रकारे पर्यटक समुद्रकिनाऱ्यावर वास्तव्य करीत असतील, तर त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याची मागणी केली जात आहे.

दरम्यान, या सुशोभिकरण केलेल्या बंधाऱ्यावर पर्यटकांना किंवा समुद्रकिनारा पाहण्यासाठी येणाऱ्या नागरिकांना बसण्यासाठी झोपड्या तयार करण्यात आलेल्या आहेत. विविध प्रकारची शोभेची झाडे, फुलांची झाडे समुद्रकिनाऱ्यावरील बंधाऱ्यावर लावण्यात आली आहेत. त्याचप्रमाणे कोळंबी, खेकडा यांची प्रतिकृतीदेखील समुद्रकिनारी नुकतीच लावण्यात आली आहे. अनेक वेळा पर्यटकांकडून श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्याच्या बाजूलाच असलेल्या मठाच्या गवंडातील अवधूत मंदिराजवळ अन्न शिजवण्याचे प्रकारदेखील घडत असतात. तर, काही पर्यटक पिकअप किंवा टेम्पो घेऊन आल्यानंतर आपापल्या गाड्यांमध्येदेखील जेवण बनवताना दिसतात.

अशाचप्रकारेरविवारीरात्रीएका पर्यटकानी श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावर बांधण्यात आलेल्या सुशोभिकरण केलेल्या झोपडीमध्ये चक्क तंबू टाकून वास्तव्य केल्याची घटना घडली आहे. मात्र, पर्यटकाच्या या कृतीमुळे श्रीवर्धनमधील पर्यटनाशी निगडित असलेल्या व्यावसायिकांमध्ये नाराजी पसरल्याचे पहायला मिळत आहे.

# कच्छ युवक संघाच्यावतीने रक्तदान शिबीर

**। पनवेल । वार्ताहर ।**

कच्छ युवक संघाच्या माध्यमातून नियमितपणे रक्तदान शिबिरांचे आयोजन केले जाते. त्यांची प्रगती अशीच होत राहो आणि आगामी काळात १५० वर पार पडत राहो, अशा शुभेच्छा उद्योजक संजय जैन यांनी कच्छ युवक संघ पनवेल शाखेच्यावतीने आयोजित रक्तदान शिबिरावेळी दिल्या.

शहरातील मिडल क्लास हौसिंग सोसायटी येथील गणपती मंदिर येथे कच्छ युवक संघ पनवेल शाखा तसेच पनवेल सराफ अँड ज्वेलर्स असोसिएशन यांच्या माध्यमातून अँकरवाला रक्तदान अभियान राबवण्यात आले होते. यावेळी मोठ्या प्रमाणात तरुणवर्ग सहभागी झाला होता. कच्छ युवक संघाचे हे ८५ वे मेगा रक्तदान शिबीर होते. या शिबिराला मान्यवरांनी उपस्थिती लावल्याचे बिपीन शहा यांनी सांगितले.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. - **मुख्य संपादक**


## PNP EDUCATION SOCIETY

### Required Teaching Staff

PNP Education Society is one of the leading Education society working since 2001. For our various English medium schools (affiliated to CBSE and State Board) located at Nagaon, Sambari(Kurdus), Veshvi, Vavoshi and Khalapur we require Principals and teachers.

**Subjects -** Mathematics, Science, English, Social Studies, Hindi, Marathi, Computer Science, Art & Craft, French, Drawing and Physical Education Teachers

**Qualification -** As per the norms.

**Pay scale - For the post of the Principals Rs. 50,000/- to 1,00,000/-**

**For the post of the teachers Rs. 15,000/- to 30,000/-**

**Note :** Pay scale depends on the qualification, experience, teaching skills and previous CTC. / Fluency in English is a must.

**For more details please contact**

Rajashree Patil : 9892150116 / Shruti Sutar : 9673371587

**Please mail your CV on**

shrutisutar154@gmail.com

pnp.rajashree@gmail.com / pnpedusoc@gmail.com

**Dates :** 18th April 2024

**Timing :** 11 a.m. to 3 p.m.

**Venue :** PNP Ganga Vishnu jakhotia memorial English medium School khalapur.. near by panchayat samiti. Tal -Khalapur, Dist- Raigad.


JSW Steel Limited
Dolvi Works: Geetapuram,
Dolvi, Taluka Pen,
Dist. Raigad - 402 107. Maharashtra, India.
CIN : L27102MH1994PLC152925
Phone: +91 2143 663000/ 3100/3200
Fax : +91 2143 277533/42
Website: www.jsw.in

**जाहीर नोटीस**

दिनांक : १७.०४.२०२४

नाव : सचिन गंगाधर पाटील
एम्प्लॉई आयडी : १०१४४६४ विभाग : बी एफ १

आपणास या सुचनेद्वारे कळविण्यात येते कि दिनांक १८.१२.२०२३ रोजीच्या आरोपपत्राच्या अनुषंगाने आपल्याविरूद्ध चौकशी सुरू असून आपण सुरुवातीला चौकशीमध्ये हजर होता. परंतु त्यानंतर कोणतीही सुचना किंवा कारण न देता व्यवस्थापनाने नोटिस पाठविल्यानंतर देखील आपण चौकशीमध्ये गैरहजर राहिलात. तरी आपली चौकशी दिनांक १९.०४.२०२४ रोजी दुपारी ०१:३० वाजता ग्लास हाऊस या ठिकाणी ठेवली आहे. आपण आपल्या बचाव प्रतिनिधीसह चौकशी मध्ये उपस्थित रहावे. अन्यथा आपली चौकशी एकतर्फे करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**जे.एस. डब्ल्यु. लि. डोलवी**
**सही/-**
**अधिकृत हस्ताक्षर**

**Regd. Office: JSW Centre, Bandra Kurla Complex, Bandra (East), Mumbai - 400 051. Phone : +91 22 4286 1000 Fax : +91 22 4286 3000**

**जाहीर सुचना**

सर्व संबधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मौजे वरसोली, ता. अलिबाग, जि. रायगड, येथील खाली नमुद केलेल्या वर्णनाची बिनशेती जमिन मिळकत विनायक प्रमोटर्स तर्फे अतुल महादेव भगत, राहणार १९१, महात्मा गांधी रोड, कॅम्प, पुणे ४११ ००१, यांच्या मालकीची असून, सदरील बिनशेती जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझे अशिलांनी कायम स्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची बोलणी सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान झाली आहेत. सदर बिनशेती जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतींमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तहेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास व नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (चौ.मी.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| वरसोली, ता. अलिबाग. | १६६/१९०/१९६/१९७/१९८/१०७ | ४-५०-००एकूण | ४५-०० |

अलिबाग,
दिनांक : १६/०४/२०२४.

सही/
**(अॅड. संजय म. भगत )**
हिराबाग सोसायटी,
अे विंग, टिळक रोड,
अलिबाग-रायगड.खरेदीदारांचे वकील


## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

*१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स*



**मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.**

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


**जाहिर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णनाच्या मौजे खारपेढांबे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील मिळकतीचे विद्यमान मालक चारूलता प्रकाश पाटील हे असून यांचेकडून विकत घेणे संदर्भात बोलणी चालु असुन सदर मिळकतींचा व्यवहार करण्याचा ठरलेले आहे. सदर त्या मिळकतींचे वर्णन पुढील प्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | विदयमान मालक | गट नंबर | क्षेत्र (हे.आर) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|---|
| खारपेढांबे, ता. अलिबाग, जि. रायगड | चारूलता प्रकाश पाटील | १२१ | जिरायत ०-२१-८०<br>वरकस ०-०१-५०<br>एकुण क्षेत्र०-२३-३० | ४.०६ |

सदरच्या मिळकती निर्वेध असल्याबाबत मालकांनी हवाला दिलेला आहे. तरी सदर वर वर्णन मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्र पुराव्यासहीत सादर करावी.

मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून कुणाचीही तक्रार अगर हरकत राहिल्यास ती विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वास कळावे.

अलिबाग
तारीख : १७/०४/२०२४

**अॅड. पुनित रविंद्र पाटील**
मु. पो. हाशिवरे, ता. अलिबाग, जि. रायगड
८१४९५१६०३५

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांना कळविण्यात येत की आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली शेती मिळकत विद्यमान मालकाकडून कायम खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. सदरहू शेती मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे - सावेळे, तालुका - कर्जत, जिल्हा-रायगड**

| जमिन मालकाचे नाव | स.न. | हि.न | क्षेत्र हे.आर.प्रति | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| गिरिश दिंगबर जगे | ६ | ४अ | ००-१९-५०<br>पो.ख ०-००-५० | १=९७ |
| | | | एकूण क्षेत्र ००-२०-००<br>हे. आर. प्रति | |

सदरहू वर नमूद केलेली शेती मिळकत ही त्या मिळकतीचे विद्यमान मालक यांचे मालकीची व ताबे कब्जा वहीवाटीची आहे असे ते सांगतात व विद्यमान ७/१२ उताऱ्यावरून तसेच दिसते. सदर शेती मिळकत त्यांचेकडून आमचे अशिलांनी तदंगभूत सर्व हक्कांगासह कायमस्वरूपी खरेदीखताव्दारे विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर शेती मिळकतीत कोणाचा काही गहाण, दान, साठेकरार, बक्षिस, फरोक्तखत, लिज वगैरे प्रकारचा हक्क वा कुळ हक्क, अन्न वस्त्र बोजा असल्यास त्याने तसे ही नोटीस प्रसिद्ध झाले पासून १४ दिवसाचे आत खालील पत्यावर लेखी कळवावे. वरील मुदतीत कोणाची काहीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध असल्याचे समजून सदरहू खरेदीखताचा व्यवहार पूर्ण केला जाईल. व मागाहून येणारी कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही.

ता. १६/०४/२०२४

सही
**अॅड सतीश अर्जुन शेळके**
(बी.ए.एल.एल.बी) मुंबई हायकोर्ट
ऑफीस पत्ता-नारायण देशमुख
हाऊस दगडे आळी कर्जत पूर्व
कर्जत-रायगड मो. न.९८८११३२२४८

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, खालील वर्णनाची जमिन मिळकत या मिळकतीच्या विद्यमान मालक श्रीमती वैशाली राजेश चव्हाण, रा. मुंबई, यांचेकडुन कायम खरेदीने विकत घेण्याचा माझे अशिलांचा मानस आहे. याकरिता सदर मिळकत विकत घेणेबाबत माझे अशिलांनी या मिळकतीचे विद्यमान मालकांशी तशी बोलणी सुरू केली आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. / उपविभाग | क्षेत्र हे. आर. | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|
| भायमळा, ता. अलिबाग, जि. रायगड | ९२ | ०-२१-०० | ०.३८ |

सदर वर नमुद मिळकतीपैकी विद्यमन मालकांचा ७/१२ सदरी नमुद असलेली ०-१०-१० हे. आर ही मिळकत व सदर मिळकतीमध्ये जाणेयेणेकरीता गट नं. ९१/१ मधुन सदर विद्यमान मालकांनी घेतलेला सुमारे १.२५ गुंठे क्षेत्राचा वहिवाटीचा रस्ता.

सदर मिळकत ही पुर्णपणे निर्वेध व बोजारहित असुन या मिळकतीवरील आपली मालकी अबाधित आहे. तसेच सदरची मिळकत ही आपले प्रत्यक्ष ताबे, कब्जा, वहिवाटीत आहे असा निर्वाळा मिळकतीचे विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

सबब, या मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, अथवा गहाण, दान, लिज, लिन, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, कर्ज वगैरे बाबत कसलाही हक्क अथवा हरकत असल्यास अथवा यांचे सोबत माझे अशिल करत असलेल्या व्यवहारांस कोणाची काही हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्यासंबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार खरेदीदारांचे वकील यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसांचे आत आणुन द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व विद्यमान मालकांना या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, व या प्रकारे मागाहुन आलेली अशी कोणाचीही कसलीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक देखील राहणार नाही याची सर्वानी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक :-

स्वाक्षरीत/-
**अॅड. सविता शं. पिंगळे**
२०१, सुष्टी बिल्डींग, वेधशाळेसमोर
अलिबाग, रायगड

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या नोटिशीने कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे महसूल दप्तरी वर्णन केलेली शेती मिळकत आमचे अशिलांनी खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे सावरोली, ता. मुरुड, जि. रायगड**

| नाव | भुमापन नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|---|
| श्री. नितीन जनार्दन ठाकुर वगैरे | १४ | १/क/२ | ०-७७.००<br>०-०१.०० | ०=८९ |
| | | एकुण | ०-७८.०० | |
| | १४ | १/क/३ | ०-९३.००<br>०-०२.०० | १=०७ |
| | | एकुण | ०-९५.०० | |

सदरहू मिळकतीबद्दल कोणाचाही दान, गहाण, बक्षिस, फरोक्त अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे प्रथम दर्शनीय कागदोपत्री पुराव्यासह आपल्या हरकती नोंदवाव्यात.

वरील मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास सदरहू मिळकती बोजारहीत असल्याचे स्पष्ट झाल्यास त्याबाबत मालकी हक्काचा दाखला देण्याची तजविज करु व सदरहु मिळकती नर्वेध, निर्दोष व बोजारहीत असल्याचे गृहित धरुन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल,
दि.१७/०४/२०२४

**श्री. संकेत नामदेव मोहीते** (वकील)
**पत्ता :**१०४, आदित्य विहार को-ऑप. हौसिंग सोसायटी, पहिला मजला, महात्मा फुले मार्ग, पनवेल ४१० २०६, जि. रायगड. मोबाईल नं. ९९३०११४२४२

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांना कळविण्यात येत की आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली शेती मिळकत विद्यमान मालकाकडून कायम खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. सदरहू शेती मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे -वडवली, तालुका-कर्जत, जिल्हा - रायगड**

| जमिन मालकाचे नाव | स.न. | हि.न | क्षेत्र हे.आर.प्रति | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| जयराम चिंधू घुडे | ६ | ७/अ | ००-१६-०० | १=५४ |

सदरहू वर नमूद केलेली शेती मिळकत ही त्या मिळकतीचे विद्यमान मालक यांचे मालकीची व ताबे कब्जा वहीवाटीची आहे असे ते सांगतात व विद्यमान ७/१२ उताऱ्यावरून तसेच दिसते. सदर शेती मिळकत त्यांचेकडून आमचे अशिलांनी तदंगभूत सर्व हक्कांगासह कायमस्वरूपी खरेदीखताव्दारे विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर शेती मिळकतीत कोणाचा काही गहाण, दान, साठेकरार, बक्षिस, फरोक्तखत, लिज वगैरे प्रकारचा हक्क वा कुळ हक्क, अन्न वस्त्र बोजा असल्यास त्याने तसे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसाचे आत खालील पत्यावर लेखी कळवावे. वरील मुदतीत कोणाची काहीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध असल्याचे समजून सदरहू खरेदीखताचा व्यवहार पूर्ण केला जाईल. व मागाहून येणारी कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही.

ता. १६/०४/२०२४

सही
**अॅड. सतीश अर्जुन शेळके**
(बी.ए.एल.एल.बी) मुंबई हायकोर्ट
ऑफीस पत्ता-नारायण देशमुख
हाऊस दगडे आळी कर्जत पूर्व
कर्जत-रायगड मो.न.९८८११३२२४८

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे हालिवली, ता. कर्जत, जि. रायगड येथिल खालील वर्णनाच्या मिळकती, त्या मिळकतींचे मालक ताटीपल्ली मोहनराज यांचेकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे. आर. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| २४ | २/अ | ०-०४-०० | ०-०२ |
| २४ | २/ब | ०-१०-०० | ०-०६ |

सबब सदर मिळकतींच्या व्यवहाराबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, ताबेकब्जा अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार अॅडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी.

वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार आमचे पक्षकारांकडून त्या मिळकतींचे मालकांबरोबर पुर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : १७/०४/२०२४

**अॅड. सी. बी. ओसवाल**
बी.कॉम.एल.एल.बी.
दिनकर-निमकर अपार्टमेन्ट बाजारपेठ
कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१.

**जाहिर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे चौल, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या बागायत मिळकतीचे विद्यमान मालक १. भी. मुरली रामन मेमन व २. श्री. जयशंकर रामन मेमन दोघे रा. चौल चौकी, पो. चौल, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या नांवे असलेली बागायत मिळकत माझे स्नेही श्री. राकेश मधुकर राऊत व सौ. नम्रता राकेश राऊत दोघे रा डी २, गोराई १, स्वप्नसाकार को. हौ.सो. लि., बी.एम.सी. गॅरेचच्या बाजूला, बोरीवली पश्चिम, मुंबई ४०० ०९१ यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. तसा साठेकरार विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | जु. स.नं. | क्षेत्र (आर.चौ.मी.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| चौल ता. अलिबाग | १३५९ | - | ०-१६-०० | ९.४० |
| | | पो.ख. | ०-०१-४० | |
| | | एकूण | ०-१७-४० | |

**वर नमूद बागायत मिळकतीपैकी १. भी. मुरली रामन मेमन यांच्या मालकीहक्कातील ०-०५-३० हे. आर. मिळकत व श्री. जयशंकर रामन मेमन यांचे मालकीहक्कातील ०-०२-३० हे.आर. मिळकत या बागायत मिळकतीचे**

सदर मिळकत निर्वेध असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. सबब सदरहू मिळकतीवर अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खाली पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे गृहीत धरुन माझे स्नेही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझे स्नेही यांचेवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : १६/०४/२०२४

सही/-
**जयवंत दत्तात्रेय म्हात्रे**
पत्ता : रा. थेरोंडा (धाकलीवाडी),
पो. चौल ता. अलिबाग, जि. रायगड.

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीस व्दारे कळविण्यात येते की, मौजे-ममदापूर ता. कर्जत जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आमचे अशिलांनी खालील नमूद विद्यमान मालक यांचेकडून कायम स्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे.

| मालकांचे नांव | स.नं./प्लॉट नं. | क्षेत्र चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| ए झेड रियालटी भागीदारी संस्थेतर्फे भागीदार हसन शब्बीर अहमद करोलिया | १६२/७ | २०९ चौ.मी. | २०.९० |
| | १६२/६ | २४१ चौ.मी. | २४.१० |

तरी वरील बिनशेती मिळकती संदर्भात कोणाचाही विकी, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिध्द झालेपासून चौदा (१४) दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील बिनशेती मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वास कळावे.

**अॅड. अशोक पालू डुकरे**
रा. प्रभातदर्शन अपार्टमेंट, ब्लॉक नं १०१,
ममदापुर रोड, नेरळ ता. कर्जत,
जि. रायगड फोन नं. ९८८१२७९८१७

निवडक

## पोलार्डकडून पाठराखण

**मुंबई :** संघाच्या पराभवास एका खेळाडूला लक्षकरणे योग्य नाही. तसेच, सततच्या विरोधाचा हार्दिकच्या मानसिकतेवर परिणाम होत आहे. त्यामुळे पराभवास त्याला सर्वस्वी जबाबदार धरू नये, असे सांगत कायरन पोलार्डने हार्दिकची पाठराखण केली. क्रिकेट हा सांघिक खेळ आहे. त्यामुळे प्रत्येक खेळाडूचे कमी-जास्त प्रमाणात योगदान होत असते. त्यामुळे पराभवास केवळ एकाच खेळाडूला जबाबदार धरून त्याला लक्ष करणे योग्य नाही, असे पोलार्डने पत्रकार परिषदेत सांगितले.

## मुस्तफिजूर परतणार

**नवी दिल्ली :** आयपीएल स्पर्धेत चेन्नईने आत्तापर्यंत चांगली कामगिरी केली असून ६ पैकी दोनच सामन्यात पराभव स्विकारला आहे. त्यामुळे चेन्नई सातत्याने पहिल्या चार संघात स्थान टिकवून आहे. दरम्यान, चेन्नईकडून गोलंदाजीत सातत्याने चांगली कामगिरी करणाऱ्या बांगलादेशचा वेगवान गोलंदाज मुस्तफिजूर यंदाच्या संपूर्ण हंगामासाठी उपलब्ध नसेल. तो एप्रिलच्या अखेरीस राष्ट्रीय संघाप्रती असलेल्या वचनबद्धतेमुळे मायदेशी परतणार होता. परंतु, आता बांगलादेशने त्याच्या ना हरकत प्रमाणपत्रात एका दिवसाची वाढ केली आहे.

## कार्तिकने मोडला रेकॉर्ड

**बेंगळुरू :** सामन्याच्या पहिल्या डावात क्लॉसेनने फर्ग्युसनच्या १७ व्या षटकात १०६ मीटर गगनचुंबी षटकार मारला. जो या हंगामातील सर्वात लांब षटकार होता. क्लासेनपूर्वी लखनौच्या निकोलस पुरन आणि कोलकाताचा व्यंकटेश अय्यर यांनीही १०६ मीटरचा षटकार मारला होता. यादरम्यान, बेंगळुरूच्या दिनेश कार्तिकने अप्रतिम पराक्रम केला. कार्तिकने टी नटराजनच्या १६ व्या षटकातील पहिल्याच चेंडूवर क्लासनचा विक्रम मोडला. त्याने १०८ मीटर लांब षटकार ठोकत नविन विक्रम केला.

## विदितचा रोमहर्षक विजय

**नवी दिल्ली :** भारताचा अनुभवी ग्रँडमास्टर विदित गुजराथी याने रविवारी मध्यरात्री झालेल्या लढतीत अमेरिकेचा स्टार खेळाडू हिकारु नाकामुरा याच्यावर रोमहर्षक विजय संपादन केला. विदितने नऊ फेऱ्यांनंतर ४.५ गुणांची कमाई करताना अजिंक्यपदाच्या शर्यतीत आपण कायम असल्याचे दाखवून दिले. डी. गुकेश, आर. प्रज्ञानंद या भारतीय युवा खेळाडूंमधील लढत ड्रॉ राहिली. आव्हानवीरांच्या बुद्धिबळ स्पर्धेत डी. गुकेश व इयान नेपोनियात्ची हे दोघेही ५.५ गुणांसह संयुक्तपणे अव्वल स्थानावर कायम आहेत.

## सर्वाधिक पाहिलेला सामना

**मुंबई :** आयपीएलच्या कोणत्याही हंगामात सर्वात महत्वाचा सामना कोणता, असा प्रश्न विचारला तर त्याचं उत्तर हे सहाजिकच मुंबई विरूद्ध चेन्नई असे येतं. मात्र, काही असे सामने झाले ज्यांच्याबद्दल फार चर्चा झाली. यात रोहित अन् हार्दिक प्रकरणामुळे मुंबई विरूद्ध गुजरात सामना, गंभीर आणि विराटच्या वादामुळे आरसीबी विरूद्ध केकेआर होता. मात्र, मुंबई विरूद्ध चेन्नई सामना अपवाद ठरला नाही. या सामन्याला जिओ सिनेमावर ७१.५ कोटी व्ह्यूज मिळाले आहेत. असं जिओच्या अधिकृत वेबसाईटवरवरून सांगण्यात आले आहे.

# मैदानी खेळात रमली बच्चे कंपनी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

**सतत मोबाईलमध्ये मग्न असणारी बच्चे कंपनी मैदानी खेळात रमू लागली आहेत. परिक्षा संपल्याने विद्यार्थ्यांना सुट्टी पडली आहे. त्यामुळे सुट्टीचा आनंद घालविण्यासाठी अनेक मुले मैदानात क्रिकेट व फुटबॉलसारखे खेळ खेळत असल्याचे दिसून येत आहेत. त्यामुळे ग्रामीण व शहरी भागातील मैदाने खेळामुळे मुलांनी बहरू लागले आहेत.**



वर्षभर अभ्यास व शिकवणीमध्ये मग्न असणाऱ्या मुलांना खेळण्यास वेळच मिळत नव्हता. रविवार किंवा अन्य सुट्टीच्या दिवशी घरचा अभ्यासात विद्यार्थी मग्न असायचे. त्यात फावल्या वेळेमध्ये मोबाईलवरील कॅन्डी क्रश, फ्री फायर सारखे खेळ खेळला जात होता. त्यामुळे मैदानापासून अनेक मुले दुर होण्यावची स्थिती पहावयास मिळत आहे. मात्र, गेल्या पंधरा दिवसापूर्वी शाळांमधील परीक्षा संपल्या आहेत. विद्यार्थ्यांना सुट्टी पडली आहे. सुट्टीचा आनंद मोबाईलमध्ये घालविणारी मुले आता मैदानी खेळात रमत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

रायगड जिल्ह्यातील ग्रामीण भागातील मोकळ्या जागेत तसेच, शहरी भागातील गार्डनमध्ये लहान मुले मैदानी खेळ खेळत आहेत. त्यामध्ये क्रिकेट, फुटबॉलसारखे खेळ खेळण्यावर अधिक भर दिला जात आहे. मोबाईलमध्ये रमणारी ही मुले मैदानी खेळात रमत असल्याने पालक वर्गाकडूनदेखील मैदानी खेळ खेळण्यास प्रोत्साहन दिले जात आहे.

> **मोबाईलच्या युगात मैदानी खेळांपासून मुले दुर होण्याची भिती निर्माण झाली होती. सुट्टीमध्येदेखील अनेक मुले बाहेर खेळण्यास न जाता, घरातच मोबाईलवर ऑनलाईन खेळ खेळत होती. परंतु, आता बदल होऊ लागला आहे. मोबाईलमध्ये रमणारी ही मुले मैदानी खेळ खेळण्यावर भर देत आहेत. पालकांकडून त्यांना चांगला प्रोत्साहन मिळत आहे. त्यामुळे सुट्टीच्या दिवशी मुले मैदानी खेळ खेळत असल्याचा आनंद आहे.**
>
> **- श्रीकांत पेढवी, पालक**

शाळांना सुट्टी पडल्याने सुट्टीचा आनंद वेगवेगळे खेळ खेळण्यामध्ये मुले घालवित आहेत. एक वेगळा उत्साह यावेळी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसून येत आहे. सध्या उन्हाचे चटके जाणवत आहेत. त्यामुळे अनेक गावे, शहरी भागातील मुले उन्हात न जाता घराजवळ असलेल्या सावलीच्या ठिकाणी मैदानी खेळ खेळत आहेत.

## बेंगळुरू संघाला प्ले-ऑफची आशा

**बेंगळुरू :** आयपीएलमधील ३० वा सामना बेंगळुरू आणि हैदराबाद विरुद्ध खेळला गेला. जो हैदराबादने जिंकला. बेंगळुरूचा या हंगामातला हा सहावा पराभव आहे. त्यामुळे त्यांच्या चाहत्यांना असे वाटते की, आता बेंगळुरू प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर गेली. पण चाहत्यांनो आशा सोडू नका. बेंगळुरू अजून पण प्लेऑफच्या शर्यतीतून पूर्णपणे बाहेर पडलेला नाही. आता प्रश्न असा आहे की, जर बेंगळुरूला प्ले ऑफमध्ये पोहोचायचे असेल तर काय करावे लागेल. पहिली गोष्ट म्हणजे प्लेऑफच्या आशा जिवंत ठेवण्यासाठी बेंगळुरूला त्यांचे उर्वरित सर्व सामने मोठ्या फरकाने जिंकावे लागतील आणि सध्या टॉप चारमध्ये असलेल्या संघांच्या पराभवासाठी प्रार्थना करावी लागेल. तरच बेंगळुरूसाठी काही समीकरण तयार होऊ शकेल.

# पांड्याची निवड गोलंदाजीवर अवलंबून

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

टी-२० विश्वचषकात हार्दिक पांड्याच्या निवडीबाबत एक मोठी माहिती समोर आली आहे. हार्दिकला टी-२० चषकासाठी भारतीय संघात स्थान मिळवायचे असेल, तर त्याला आयपीएलमध्ये सातत्याने चांगली गोलंदाजी करावी लागेल. कर्णधार रोहित शर्माची निवड समितीसोबत बैठक झाली आणि त्यानंतरच हा निर्णय घेण्यात आला आहे. यानुसार हार्दिक पांड्याची निवड त्याच्या आयपीएलमधील गोलंदाजीवर अवलंबून असणार आहे.

भारतीय कर्णधार रोहित शर्मा, मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड आणि मुख्य निवडकर्ता अजित आगरकर यांच्यात गेल्या आठवड्यात बीसीसीआयच्या मुख्यालयात बैठक झाली. या बैठकीत हार्दिक पांड्याने आयपीएलच्या उर्वरित सामन्यांमध्ये चांगली गोलंदाजी करत सलग षटके टाकली तरच त्याला टी-२० चषकात स्थान मिळू शकेल, असा निर्णय घेण्यात आला. दोन तास चाललेल्या बैठकीत हार्दिकला पुनरागमन करायचे असेल तर त्याला सतत गोलंदाजी करावी लागेल, असा निर्णय घेण्यात आला. अशा परिस्थितीत हार्दिकसाठी आयपीएलचे महत्त्व अधिक आहे.



# झुंझार पोयनाड प्रीमियर लिग

**। पोयनाड । क्रीडा प्रतिनिधी ।**

झुंझार युवक मंडळ पोयनाड संस्थेच्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन मंडळातर्फे केले जाते. या वर्षी झुंझार युवक मंडळाच्यावतीने झुंझार पोयनाड प्रीमियर लिग टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. दि.२७ व २८ एप्रिल रोजी संपूर्ण पोयनाडकरांसाठी हि स्पर्धा असणार आहे. या स्पर्धेत एकूण ९७ खेळाडूंनी ऑनलाईन फॉर्म भरून नोंदणी करून आपला सहभाग नोंदवला होता.



स्पर्धेत सहा संघ सहभागी झाले आहेत. प्रत्येक संघाला संघमालक व एक आयकॉन खेळाडू देण्यात आला. श्री स्वामी समर्थ ओमसाई फार्म हाऊस (शैलेंद्र गायकवाड, राजेंद्र जाधव, आयकॉन खेळाडु विशाल निषाद), आर.जे रॉयल्स (राज जैन, आयकॉन खेळाडू चैतन्य राऊत) जय मल्हार संघ (विकी कामठे, आयकॉन खेळाडू प्रणय साळवी) पोयनाड सुपर जायंट्स (निहाल चवरकर, आयकॉन खेळाडू पार्थ गावडे), नंदा बिल्डर्स (जय पाटील, आयकॉन खेळाडू मृण्मय पालव), वीर रायगड (शैलेश पाटील, आयकॉन खेळाडू ओम साळवी) अश्या सहा संघांमध्ये झुंझार पोयनाड प्रीमियर लिग क्रिकेट स्पर्धा रंगणार आहे. संपूर्ण स्पर्धा पोयनाड व्यापारी असोसिएशनच्या अनेक व्यापारी सदस्यांनी पुरस्कृत केली आहे. प्रत्येक संघातील खेळाडूंना रंगीत कपडे मंडळातर्फे देण्यात येणार आहेत.

स्पर्धेच्या अगोदर सर्व नोंदणीकृत खेळाडूंचे लिलाव (ऑक्शन) करण्यात आले. सर्व खेळाडूंना विविध संघांमध्ये लिलावातून विभागून देण्यात आले. या सोहळ्यासाठी पोयनाड व्यापारी असोसिएशनचे सदस्य, ग्रामस्थ आणि खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आरसीबी नव्या मालकाला विका

**। बेंगळुरू । वृत्तसंस्था ।**

इंडियन प्रीमियर लीग २०२४ स्पर्धेतील ३० व्या सामन्या रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू संघाला सनरायझर्स हैदराबादविरुद्ध २५ धावांनी पराभवाचा सामना करावा लागला. या सामन्यानंतर भारताचा टेनिस स्टार महेश भूपतीने बेंगळुरू संघाबाबत एक पोस्ट शेअर केली आहे, ज्याची सध्या जोरदार चर्चा होत आहे.

बेंगळुरूने आयपीएल २०२४ मध्ये आत्तापर्यंत ७ सामने खेळले असून त्यातील ६ सामन्यात पराभव स्विकारला आहे. तसेच, सोमवारी झालेला पराभव बेंगळुरूचा सलग पाचवा पराभव होता.

दरम्यान, या सामन्यातील बेंगळुरूच्या पराभवानंतर भूपतीने पोस्ट करत बीसीसीआयला विनंती केली आहे की, बेंगळुरूला एका चांगल्या संघमालकाला विका. भूपतीने लिहिले की, खेळाच्या, आयपीएलच्या आणि चाहते व अगदी खेळाडूंच्या भल्यासाठी बीसीसीआयने आरसीबीची विक्री एका नव्या मालकाला करणे गरजेचे आहे, जो दुसऱ्या संघांप्रमाणे या संघालाही एक चांगली स्पोर्ट्स फ्रँचायझी बनवण्याची काळजी घेईल.





# हैदराबादचा दणदणीत विजय

**। बेंगळुरू । वृत्तसंस्था ।**

बेंगळुरूच्या चिन्नास्वामी स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या सामन्यात आरसीबीने टॉस जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना हैदराबादने २० षटकात ३ गडी गमावून २८७ धावा केल्या. ट्रेविस हेडने १०२ धावा करत आपले आयपीएलमधील पहिले शतक पूर्ण केले. आरसीबीकडून लॉकी फर्ग्युसनने २, तर रीस टोपली याने १ विकेट घेतली.

आरसीबीला २० षटकात हे आवाहन पूर्ण करण्यात अपयश आले. आरसीबीला २० षटकात केवळ २६२ धावा करता आल्या. आरसीबीकडून दिनेश कार्तिकने ८३, तर कर्णधार फाफ डु प्लेसीसने ६२ धावा केल्या. हैदराबादकडून पॅट कमिन्सने ३ आणि मयंक मार्कंडेयने २ विकेट्स घेतल्या.

हैदराबादने आयपीएल २०२४ मध्ये ६ सामने खेळले आहेत, त्यापैकी दोन सामन्यात संघाला अपयश आले आहे. संघ आपल्या चार विजयांसह गुणतालिकेत चौथ्या क्रमांकावर आहे, तर आरसीबी गुणतालिकेत दहाव्या क्रमांकावर आहे. आरसीबीला या आयपीएलमध्ये काही खास कामगिरी करता आली नाही. संघ ७ पैकी ६ सामने हारला आहे.

## मॅक्सवेलने उचललं मोठं पाऊल

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आयपीएल २०२४ दरम्यान एक मोठी बातमी समोर आली आहे. लागोपाठच्या पराभवांमुळे अडचणीत आलेल्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूला मोठा धक्का बसला आहे. खराब फॉर्ममध्ये झगडत असलेल्या स्टार अष्टपैलू खेळाडू ग्लेन मॅक्सवेलने आयपीएल २०२४ हंगाम-१७ मधून ब्रेक घेतला आहे. यामागचे कारणही त्याने दिले आहे.



ब्रेक घेण्यापूर्वी ग्लेन मॅक्सवेल म्हणाला की, कदाचित आता वेळ आली, माझ्या जागी संघात दुसऱ्याला संधी देण्याची. हा निर्णय माझ्यासाठी सोपा होता. मला स्वतःला थोडी मानसिक आणि शारीरिक विश्रांती देण्याची गरज आहे. याबाबत मी प्रशिक्षक आणि कर्णधाराशी बोललो होतो. जर संघाला माझी आणखी गरज भासली तर मी निश्चितच ठोस मानसिकतेने पुनरागमन करेन. पॉवरप्लेनंतर संघासाठी माझ्याकडून अपेक्षित कामगिरी करता आली नाही.

# रोहितची मस्करी ठरणार खरी?

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

शाबास डीके, वर्ल्ड कप खेळायचा आहे... दिनेश कार्तिक मुंबईविरुद्ध खेळत असताना रोहित शर्मानि गंमतीत हे वक्तव्य केले होते. आता दिनेश कार्तिकने ते गांभीर्याने घेतल्याचे दिसत आहे. निदान आयपीएल २०२४ मधील त्याची कामगिरी पाहून तरी असे म्हणता येईल.



हैदराबादविरुद्धच्या सामन्यात दिनेश कार्तिकने ३५ चेंडूत ८३ धावांची स्फोटक खेळी केली. आणि जोपर्यंत तो क्रीजवर होता तोपर्यंत आशेचा किरण होता. पण तो आऊट झाल्यानंतर मावळला. जरी बेंगळुरू हा सामना हरला असला तरी कार्तिकने जे काही केले त्याचे सर्वजण कौतुक करत आहेत.

२०२२ मध्ये जेव्हा टी-२० विश्वचषक झाला, त्याआधीही आयपीएलमध्ये कार्तिकने अप्रतिम फलंदाजी केली. जवळपास संपुष्टात आलेल्या त्याच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीला त्या आयपीएलमध्ये नवसंजीवनी मिळाली. आता त्या वर्षातील त्याच्या कामगिरीबद्दल बोलायचे झाले तर दिनेशने १६ सामन्यात ३३० धावा केल्या होत्या. त्याची सरासरी ५५ होती, तर त्याने १८३.३३ च्या स्ट्राइक रेटने फलंदाजी केली. त्यावर्षी आरसीबी संघ प्लेऑफमध्ये पोहोचला होता आणि त्यात कार्तिकचे मोठे योगदान होते. कार्तिकने जवळपास गमावलेल्या काही सामन्यांमध्ये विजय मिळवून देण्याचे काम केले होते.

आतापर्यंत फक्त सात सामने झाले आहेत. आरसीबी संघ जरी प्लेऑफमध्ये पोहोचला नसला तरी त्यांचे ७ सामने बाकी आहेत. त्याचवेळी, २०२४ च्या टी-२० विश्वचषकासाठी संघाची घोषणा होण्यापूर्वी, तो आणखी तीन ते चार सामने खेळला असता. अशा स्थितीत त्याची कामगिरी लक्षात घेऊन बीसीसीआयची निवड समिती त्याला टी-२० विश्वचषकात पाठवण्याचा विचार करणार का, हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.

# गावसकरांकडून पांड्याचा समाचार

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

चेन्नईविरुद्ध रविवारी झालेल्या सामन्यात मुंबईच्या पराभवासाठी खलनायक ठरलेल्या हार्दिक पांड्यावर सर्वत्र टीका होत आहे. माजी दिग्गज खेळाडू सुनील गावसकर यांनी तर हार्दिकची क्षुल्लक अशा शब्दांत गणना केली आहे. हार्दिकची गोलंदाजी अतिशय सुमार आणि नेतृत्वही तेवढेच साधारण असल्याचे गावसकर यांनी म्हटले आहे. इंग्लंडचा माजी कर्णधार केविन पीटरसन याच्यासह समालोचन करताना वानखेडे स्टेडियम वरील सामन्यानंतर गावसकर यांनी खडे बोल सुनावले.

**हार्दिक पंड्याच्या चुका**

**- वेगवान गोलंदाज आकाश मधवालचे एक षटक शिल्लक होते**

**- फिरकी गोलंदाज श्रेयस गोपालने आपल्या पहिल्या षटकात विकेट मिळवल्यानंतरही त्याला गोलंदाजी नाही.**

**- धोनीला बॅटच्या पुढ्यात चेंडू (एक चेंडू तर फुलटॉस)**



# इनडोअर क्रिकेट स्पर्धेत भारत अव्वल

**। कोलंबो । क्रीडा प्रतिनिधी ।**

**जागतिक इनडोअर क्रिकेट महासंघाच्या मान्यतेने सिलोन इनडोअर क्रिकेट असोशिएशन यांच्या पुढाकाराने इंग्लंड-एशिया कप इनडोअर क्रिकेट स्पर्धेला सुरुवात झाली आहे. या स्पर्धेत भारतीय पुरुष संघाच्या चमकदार कामगिरीने भारत गुणतालिकेत अव्वल स्थानावर आहे. भारतीय पुरुष संघाने श्रीलंका डेव्हलपमेंट व सिंगापूरला दणका देत हे स्थान काबीज केले आहे.**



इनडोअर क्रिकेटमध्ये ८ खेळाडू मैदानात खेळतात व प्रत्येक जोडीला ४ षटके फलंदाजी करावी लागते. तर या दरम्यान बाद झालेल्या प्रत्येक खेळाडू बदल्यात संघाला ५ धावा गमवाव्या लागतात. रविवारी रात्री उशिरा झालेल्या सामन्यात भारतीय संघ श्रीलंकेवर विजय मिळवेल असे वाटत असताना श्रीलंकेने जोरदार मुसंडी मारत सामना बरोबरीत सोडवला. दोन्ही संघांनी ९९-९९ धावा केल्या व या सामन्यात दोन्ही संघांना ३.५ गुण मिळाले.

श्रीलंका विरुध्दच्या सामन्यात भारताने श्रीलंका डेव्हलपमेंट संघाचा ५२ धावांनी पाराभाव केला. या सामन्यात भारताने प्रथम फलंदाजी करताना ११५ धावा केल्या तर श्रीलंका डेव्हलपमेंट संघाला भारताने १६ षटकात ६३ धावांत रोखत या सामन्यात ७ गुणांची कमाई केली. या सामन्यात भारताच्या दैविक राय व एम. मल्लिकार्जुन प्रत्येकी (१६ धावा, २ बळी), विजय गौडा (१५ धावा व २ बळी), अफरोज पाशा (२१ धावा), धनुष भास्कर (१२ धावा व ३ बळी) तर अधिराज जोहरी (१२ धावा ) यांनी विजयात धमाकेदार कामगिरी केली.

सिंगापूर विरुध्द झालेल्या सामन्यात भारताने पहिल्या १६ षटकात सिंगापूरला १३ धावांत रोखत सहज विजयाचे ध्येय ठेवले. मात्र, भारताने १६ षटकात १४३ धावा चोपून काढत १३० धावांनी विजय साजरा केला. या सामन्यात ७ गुणांची कमाई करत गुणतालिकेत प्रथम स्थान मिळवले आहे. सामन्यात विजय गौडा (१६ धावा व ४ बळी), अफरोज पाशा (२७ धावा, २ बळी), दैविक राय(२२ धावा, १ बळी), अधिराज जोहरी (२२ धावा, १ बळी) यांनी जोरदार कामगिरी केली.

भारताने आत्तापर्यंत या स्पर्धेत १७.५ गुण मिळवत निर्विवाद वर्चस्व सिध्द केले असून श्रीलंका १६.५ गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे. तर १३ गुणांसह इंग्लंड तिसऱ्या स्थानावर आहे.

# पनवेल येथे गावदेवी प्रिमीयर लीग



**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल शहरातील सुप्रसिद्ध अशा २०२४ गावदेवी प्रिमीयर लीग क्रिकेट स्पधर्मध्ये अत्यंत अटीतटीच्या झालेल्या सामन्यामध्ये देविका जीएस सुपर किंग हा अंतिम विजेता झाला आहे. तर, द्वितीय पारितोषिक आर. आर. स्मॅशर्स या संघाला मिळाले आहे.

शहरातील गावदेवी मंदिरासमोरील प्रांगणात यंदाच्या दहाव्या वर्षी २०२४ गावदेवी प्रीमियर क्रिकेट लीग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्याचे उद्घाटन सुधाकर घरत, संजय कदम, संदीप पाटील, शंतनु घरत, विकी काळे, ऋतिक बताले, अनुराग घरत, आदेश घरत, जागृत भोईर, अरुण मढवी, अवधूत घरत, ओमी भोपी, हर्षु घरत, पुष्कर भावेश घरत, स्पर्श शेंडे, ओंकार मढवी आदींच्या उपस्थितीत करण्यात आले. या स्पर्धेत आठ संघ उतरले होते. त्यातील प्रथम विजेता म्हणून देविका जीएस सुपर किंग, तर द्वितीय विजेता म्हणून आर.आर. स्मॅशर्स संघाला घोषित करण्यात आले. यावेळी बक्षिस समारंभ शशिकांत घरत, के.डी. पाटील, विनोद पाटील, मंगेश भोईर, संदीप पाटील, प्रेमल सुतार, देवांशू प्रभाळे, अभिजीत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
**■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)